शिक्षण प्रसारक मंडळी

# सर परशुरामभाऊ महाविद्यालय

पुणे ४११ ०३०

# परशुरामीय

१९८४–८५

---

**संपादक**

प्रा. श्या. म. आफळे / प्रा. सुहास पळशीकर / प्रा. सु. दा. गोरे / प्रा. एन. एस. जोशी
प्रा. दिलीप राजगुरू / प्रा. अरुण भागवत / प्रा. डॉ. श्रीलेखा साने / प्रा. मीरा सिद्धपाठक
प्रा. विनय रमा रघुनाथ / श्री. निळकंठ अंबादास गुरव

**विद्यार्थी प्रतिनिधी**

राजेंद्र सखदेव / महेश देशमुख / मिलिंद संगोराम / सुबोध दांडेकर
मनीष गोडबोले / सुप्रिया साठे

---

# ॥ अनुक्रम ॥


संपादकीय
आपले महाविद्यालय आणि भावना / उपप्राचार्य प्रा. आ. गो. मोडक
Reflections / Prin. B. N. Kulkarni
आनंदयात्री मी आनंदयात्री / मेधा बापट १
शंभरातील पंच्चाणव ( कविता ) / राजेंद्र सखदेव २
भारताचे अंदाजपत्रक कसे तयार केले जाते ? / उषा नाईक ३
इलेक्ट्रॉनिक्स – जग व भारत / जयंत मेहेंदळे : मिलिंद केळकर ६
काय वसलंय ? ( कविता ) / कविता नेरकर ७
काय हे विचार ? ( कविता ) / म. वा. प्रभुणे ७
मिथेल आयसोसायनेट / शेखर वैद्य ८
दु:खमापक यंत्र / ज्योती कुलकर्णी ९
मी आणि टेबलटेनिस / सुजाता बापट १०
अर्भक मृत्यू – सामाजिक समस्या / कांचन झाडबुके ११
एका लघुउद्योजकाची मुलाखत / मकरंद कुलकर्णी १४
देवाशपथ ( कविता ) / शशी वाघ १५
साथ हवी मज नृत्याची / जयश्री पाटणकर १६
मोफत स्त्रीशिक्षण : एक चर्चा – शब्दांकन / शुभदा सिद्धपाठक १८
बातचीत एका वधुपित्याशी / राजश्री काणे २०
जाहिरात व संख्याशास्त्र / सुबोध श्रीराम दांडेकर २२
महागाई : कारणे व उपाय / सुहास र. कुलकर्णी २५
यादे ( कविता ) / वृंदा गुपचुप २७
क्या है यह जिंदगी ( कविता ) / वैशाली गोडबोले २७
इये मराठीचिये नगरी / अश्विनी सुरेश केंजळे २८
हिंदी चित्रपट संगीत : काही प्रश्न / मिलिंद संगोराम ३०
संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती / रवींद्र इथापे ३३
Fiery Wheels / Swanand R. Arole 36
The Number 'e' / Bhushan Bapat 37
Anton Chekhov : Personal Glimpses / Manjiri Padiyar 39
Seek And You Will Find ( Poem ) / Naina Agarwal 41
जल रही है आज नारी ( कविता ) / कालिंदी काळे ४२
महाविद्यालय वृत्त ४५
विविध उपक्रम ४५
व्याख्याते व समारंभ ४७
प्राध्यापकांचे विशेष कार्य ४९
विद्यार्थ्यांचे नैपुण्य ५२
जिमखाना अहवाल ५६
मुखपृष्ठाविषयी ६३
श्रद्धांजली ६४

## ॥ संपादकीय ॥

मित्रहो,

१९८४ या वर्षावर दुःखद घटनांचे सावट पडले !

कालाच्या ओघात सामजजीवनावर अनेक आघात होत असतात, त्या आघातांना धैर्याने सामोरा जाणारा समाजच संस्कृती संवर्धित करतो. भारतीय समाजजीवनाने आघातांना धैर्याने तोंड दिले आणि संस्कृतीची वाटचाल पुढे चालू ठेवली.

१९८५ हे वर्ष युवक वर्ष म्हणून साजरे होत आहे. त्यानिमित्ताने समाजात काम करताना, आपले छंद जोपासताना, एखाद्या क्षेत्रात विशेष प्राविण्याप्रत पोचताना विद्यार्थ्यांना आलेले अनुभव त्यांनी लिहावे असा आम्ही प्रयत्न केला. त्याला विद्यार्थी लेखकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. असे लेख अंकाचे वैशिष्टच ठरावे, शिवाय आजच्या समस्या, शैक्षणिक लेख आणि सहजस्फूर्त साहित्य अंकात समाविष्ट केले आहे. प्राथमिक अवस्थेत बरेच लेख व्याकरण, तपशील, शैली या बाबतीत कच्चे होते. संबंधित विद्यार्थी लेखकांनी चिकाटीने लेखांचे पुनर्लिखाण केले. दुसरे सत्र सुरू झाल्यावर आम्ही दररोज किमान एक तास बसून सर्व लेखांचे सामूहिक वाचन केले. त्यावर त्या त्या विद्यार्थी लेखकाशीही चर्चा केली.

अंकाच्या निर्मितीत मा. प्राचार्य, अनेक शिक्षक, सेवक, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. आता, हा अंक आपल्या हाती देतांना आम्हास आनंद होत आहे.

'परशुरामीय' चे माजी संपादक, प्रा. डॉ. गो. रा. कामतकर, एप्रिल अखेर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या संपादकत्वाखाली संपादित झालेल्या 'परशुरामीय १९८३–८४' ह्या अंकास पुणे विद्यापीठाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यातील "वैरी" कथेबद्दल अंजली जोगळेकरला पुरस्कार मिळाला, त्याबद्दल अभिनंदन ! धन्यवाद.

**संपादक मंडळ**

---

**संपादकीय सल्लागार :**

प्राचार्य बी. एन. कुलकर्णी / उपप्राचार्य प्रा. आ. गो. मोडक / उपप्राचार्य प्रा. वा. म. दाते
कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख : प्रा. डॉ. न. रा. शेटचे / उपप्रमुख : प्रा. पु. श्री. घैसास

**जाहिरात विभाग :**

श्री. आनंद गोपाळ क्षीरसागर ( रजिस्ट्रार )

**विशेष सहाय्य**

प्रा. शोभा पवार / प्रा. डॉ. पद्मजा घोरपडे / प्रा. व. र. हरिश्चंद्रकर / प्रा. डॉ. अ. म. पेंडसे
प्रा. अ. वा. नाईक / प्रा. प्र. पां. शिरोळे / प्रा. ह. वि. शित्रे / प्रा. श. श्री. पंडित / प्रा. अतुल फडके
प्रा. हेमंत पाकणीकर / श्री. पां. वा. केळकर ( कार्यालय अधीक्षक ) / श्री. वसंत गोविंद गाडगीळ ( ग्रंथालय विभाग ) / श्री. अष्टेकर ( जिमखाना )

---

प्रकाशक : **प्राचार्य बी. एन. कुलकर्णी,** स. प. महाविद्यालय, पुणे ४११ ०३०

मुद्रक : **अनिल किणीकर,** अक्षय्य मुद्रणालय, १६७५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# आपले महाविद्यालय आणि भावना

**उपप्राचार्य प्रा. आ. गो. मोडक**

### विद्यार्थीसंख्या

| | | |
|---|---|---|
| **एकूण विद्यार्थीसंख्या** | : | ४३१९ |

**वरिष्ठ महाविद्यालय**

| | | |
|---|---|---|
| १) साहित्य शाखा | : | ६८६ |
| २) शास्त्र शाखा | : | ६५४ |
| ३) वाणिज्य शाखा | : | ११९३ |

**कनिष्ठ महाविद्यालय**

| | | |
|---|---|---|
| १) साहित्य शाखा | : | ३६४ |
| २) शास्त्र शाखा | : | ८३९ |
| ३) वाणिज्य शाखा | : | ५८३ |

### स्टाफ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय | : | प्राध्यापक सख्या | : | १२६ |
| कनिष्ठ महाविद्यालय | : | प्राध्यापक संख्या | : | ५८ |
| एकूण शिक्षकेत्तर कर्मचारी संख्या | | | : | १६७ |

### विद्यापीठ परीक्षा निकाल १९८३-८४

| | साहित्य | शास्त्र | वाणिज्य |
|---|---|---|---|
| तृतीय वर्ष | ८१ टक्के | ५१ टक्के | ८८ टक्के |

| | | |
|---|---|---|
| एम. ए. अर्थशास्त्र | : | १४.४ टक्के |
| एम. ए. मानसशास्त्र | : | ७० टक्के |
| एम. एस्सी. रसायनशास्त्र | : | ८२ टक्के |
| एम. एस्सी. भूगोल | : | ८४ टक्के |

### विशेष यश

१) कु. वर्षा क्षीरसागर – तृतीय वर्ष साहित्य १९८३-८४ एप्रिलच्या पुणे विद्यापीठाच्या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या.

२) कु. अनुराधा गोडबोले ह्या विद्यार्थिनीला पुणे विद्यापीठाच्या (तृतीय वर्ष वाणिज्य) ॲडव्हान्सड कॉस्टिंगमध्ये सर्वोच्च गुण मिळाले.

३) कु. सुधा विश्वनाथ म्हैसूरकर ही विद्यार्थिनी एम. एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री या विषयात पुणे विद्यापीठाच्या एप्रिल १९८४ च्या परीक्षेमध्ये सर्वप्रथमआली.

### अनुदान

१) सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये बेसिक असिस्टंन्स-साठी तिसरा व शेवटचा हप्ता रु. ३१,०००।– महाविद्यालयास मिळाला.

२) सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पदव्युत्तर वर्गाच्या विकासासाठी रु. २ लाख विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळाले.

३) सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पदवीपूर्व वर्गाच्या विकासासाठी रु. ८१,०००।– विद्यापीठ अनुदान

### कनिष्ठ महाविद्यालय - बोर्डाच्या परीक्षेतील विशेष यश

| अ. क्र. | नाव | शाखा | प्राविण्य |
|---|---|---|---|
| १. | कु. जयश्री हरि जोशी | साहित्य | साहित्य शाखेत बोर्डात दुसरी, लॉजिकमध्ये बोर्डात पहिली. (गुण ९९ / १००) |
| २. | कु. मंजिरी गुरुराज पडियार | साहित्य | बोर्डात ९ वी |
| ३. | ऋषिकेष भास्कर जोशी | शास्त्र | वास्तवशास्त्र विषयात प्रथम (गुण १०० / १००) |
| ४. | मिलिंद विजय पेंडसे | शास्त्र | स्कूटर-मोटार सायकल सर्व्हिसिंग या विषयात प्रथम. (गुण १८३ / २००) |

मंडळाकडून महाविद्यालयास मिळाले आहेत.]

वरील तिनही अनुदाने ही पुस्तके व साहित्य या साठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळालेली आहेत.

### ४) इमारत अनुदान

रसायनशास्त्र, मानसशास्त्र व भूगोल या विषयांच्या पदव्युत्तर वर्गाच्या इमारतीसाठी रु. १,७५,०००।- अनुदान विद्यापीठ अनुदान मंडळाने मंजूर केले आहेत.

### कै. सुधा विठ्ठल भिडे हॉल

श्री. विठ्ठल महादेव भिडे यांनी त्यांच्या पत्नी कै. सुधा भिडे यांच्या स्मरणार्थ महाविद्यालयाला नवीन वास्तू बांधण्यासाठी रु. १ लाख देणगी दिली. या देणगीतून वास्तवशास्त्र इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर कै. सुधा विठ्ठल भिडे हॉल बांधण्यात आला. दिनांक ४-१०-१९८४ रोजी कै. सुधा विठ्ठल भिडे हॉलचे मा. मोहनराव गवंडी, अध्यक्ष, नियामक मंडळ, शिक्षण प्रसारक मंडळी यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

### मनाली येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग

मनाली येथे हिमाचल प्रदेश शासनाच्यावतीने दिनांक १० फेब्रुवारी, १९८५ ते १३ फेब्रुवारी, १९८५ या काळात अखिल भारतीय पातळीवर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमात स. प. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या २३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला व शास्त्रीय संगीत स्पर्धेमध्ये श्री. चारूदत्त आफळे यास प्रथम व श्री. अविनाश तायडे यास द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले. व्होकल लाईट स्पर्धेमध्येही श्री. चारूदत्त आफळे यास प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या राजस्तानी बंजारी या समूह नृत्यास विशेष गुणवत्ता पारितोषिक मिळाले.

मनालीहून परत मुंबईला आल्यानंतर सदर कार्यक्रम विद्यार्थ्यांनी मा. मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी सादर केला. मा. मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### जिमखाना डे

दिनांक २६ फेब्रुवारी, १९८५ रोजी स. प. महाविद्यालयाचा जिमखाना डे साजरा झाला. या प्रसंगी भारताचे प्रख्यात टेनिस पटू श्री. नंदन बाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा. बाळासाहेब पंडित हे या प्रसंगी अध्यक्ष होते.

### कनिष्ठ महाविद्यालय - तपासणी

दिनांक ९ जानेवारी १९८५ रोजी स. प. महाविद्यालयाची तपासणी झाली. या तपासणीसाठी मा. चांदेकर, उप संचालक, उच्च माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह महाविद्यालयाला भेट दिली. मा. चांदेकर यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे सव कामकाज पाहून समाधान व्यक्त केले.

### यूथ रॅली

दिनांक १२ जानेवारी १९८५ रोजी युवक वर्षानिमित्त पुणे विद्यापीठाने एक युवक पदयात्रा आयोजित केली होती. ही पदयात्रा मा. कुलगुरू डॉ. भिडे यांच्या नेतृत्वाखाली स. प. महाविद्यालयापासून निघून टिळक रस्ता, लक्ष्मी रस्ता व बाजीराव रस्ता या मार्गाने पुनः स. प. महाविद्यालयावर आली. त्यानंतर पदयात्रेचे सभेत रूपांतर होऊन प्रा. शिवाजीराव भोसले यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. या पदयात्रेत विद्यार्थ्यांबरोबर पुण्यातील अनेक महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर वर्ग सहभागी झाला होता.

### नवीन अभ्यासक्रम

स. प. महाविद्यालयाने एम. कॉम. च्या अभ्यासक्रमासाठी पुणे विद्यापीठाकडे अर्ज केला आहे.

२) बी. एस्सी. अॅडव्हान्स्ड इलेक्ट्रॉनिक्स हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज केला आहे.

### गणकयंत्र
### ( कॉम्प्युटर )

चालू युगाचा कॉम्प्युटर युग म्हणून उल्लेख केला जातो. भविष्य काळातील कॉम्प्युटरचे महत्त्व ओळखून महाविद्यालयाने संख्याशास्त्र विभागात, गणित विभागामध्ये कॉम्प्युटरचा अभ्यासक्रम आधीच सुरू केले आहेत. फिजिक्स केमेस्ट्री या विषयातही कॉम्प्युटरचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार आहे. त्यासाठी नजिकच्या भविष्यकाळात महाविद्यालयामध्ये कॉम्प्युटर घेण्याची महाविद्यालयाची योजना आहे.

## परिसंवाद

दि. १९-३-१९८५ रोजी प्राचार्य वि. ना. ढवळे यांच्या 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या ग्रंथावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या परिसंवादात ४ निबंधाचे दोन सत्रात वाचन होऊन पुण्यामधील महाविद्यालयातील इंग्रजी, मराठी, हिंदी या विषयातील अनेक नामवंत प्राध्यापकांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

## महाविद्यालयाचे विद्वत सभेवर प्रतिनिधित्व

ऑक्टोबर १९८५ पासून प्राचार्य बी. एन. कुलकर्णी हे पुणे विद्यापीठाच्या विद्वत सभेचे सदस्य झाले.

## छत्रपती पुरस्कार

स. प. महाविद्यालयातील कु. माधुरी सोनालीकर (ज्युडो) व श्री. अनिरूद्ध कुमठेकर (मल्लखांब) यांचा १९८५ मध्ये महाराष्ट्र राज्याने छत्रपती पुरस्कार देऊन गौरव केला.

## पुणे विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. भिडे

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून डॉ. राम ताकवले यांच्यानंतर डॉ. व्ही. जी. भिडे यांनी ऑगस्ट १९८५ मध्ये कुलगुरूपदाची सूत्रे हाती घेतली. डॉ. व्ही. जी. भिडे यांची पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. भिडे याच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठ हे एक भारतातील अग्रेसर विद्यापीठ म्हणून नावलौकिक मिळवेल याची खात्री आहे.

## मा. मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांचे अभिनंदन

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. वसंतरावदादा पाटील यांची चौथ्यांदा मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

आज महाराष्ट्र राज्य औद्योगिक व सामाजिकदृष्टया जे पुढारलेले आहे त्याचे मोठे श्रेय कै. यशवंतराव चव्हाण व नामदार वसंतरावदादा पाटील यांनाच आहे.

## मा. अनंतराव थोपटे : अभिनंदन

मा. अनंतराव थोपटे यांचा महाराष्ट्र राज्याच्या नव्या मंत्रिमंडळामध्ये पुनः समावेश झाला आहे. मा. अनंतराव थोपटे हे स. प. चे माजी विद्यार्थी आहेत. मा. अनंतराव थोपटे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

फर्ग्युसन महाविद्यालयास १०० वर्षे पूर्ण झाली. त्याबद्दल शुभेच्छा.

## श्रद्धांजली

१) भारताच्या नेत्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या दुःखद निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करणारा संदेश मा. पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे पाठविण्यात आला.

२) महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांचे दि. २५-११-८४ रोजी दिल्ली येथे दुःखद निधन झाले.

दि. ६ डिसेंबर १९८४ रोजी महाविद्यालयातर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

३) डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे दिनांक ४-३-१९८५ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एका विद्वान व्यासंगी प्राध्यापकास, थोर नवचिंतकास समाज मुकला आहे. दिनांक १६-३-१९८५ रोजी सभा घेऊन डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांना महाविद्यालयाने श्रद्धांजली अर्पण केली.

४) फर्ग्युसन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक दे. द. वाडेकर यांचे दि. ५-३-१९८५ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने एका व्यासंगी विद्वानास महाराष्ट्र मुकला आहे.

५) स. प. महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील एक निवृत्त सेवक श्री. विष्णू गोविंद दिवाकर यांचे दिनांक ४-३-१९८५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने महाविद्यालय एका जुन्या निष्ठावंत कर्मचाऱ्यास मुकला आहे.

६) स. प. महाविद्यालयातील एक शिपाई-सेवक श्री. स. रा. कदम यांचे दि. ३०-११-१९८४ रोजी दुःखद निधन झाले. श्री. कदम हे मनमिळावू, कष्टाळू व कार्यक्षम सेवक होते. कै. कदम यांना दि. ६ डिसेंबर १९८४ रोजी झालेल्या शोकसभेत श्रद्धांजली वाहण्यात आली.

## क्षमस्व

यंदाच्या अंकाची पृष्ठसंख्या कमी असल्यामुळे अनेक चांगल्या लेखांचा अंतर्भाव करता आला नाही. त्याबद्दल क्षमस्व.

# REFLECTIONS

**Prin. B. N. Kulkarni**

Orwell's **1984** presents a nightmarish view of things. The book has us worried about man's destiny. Things, however, have not turned out as predicted. The year, 1984, gave a lie to the futuristic fantasy. In most of the countries, men and women continue to be free from the menace of the ubiquitous thought police and double think.

The year, however, left us gasping for breath-our beloved Prime Minister Mrs. Gandhi lost her life at the hands of those whose bounden duty it was to guard and protect her. The news stunned and disoriented us and yet, there was at least one man who did not lose his bearings amidst the confusion. He kept his cool and steered the nation out of danger. By rallying round Mr. Rajiv Gandhi, the country too demonstrated integrity and foresight. Well, there are winds of change–there is a feeling that the common man would get his due.

In the educational field, our ' home ground ', we have to face several challenges. Higher education, in particular, is fast becoming a ' park for contending orators '. The common pursuit of judgement is nowhere in sight. The demand-supply principle is in evidence in its crudest form. Happily, the new educational policy would soon be announced for public debate.

Liberal education is a butt of ridicule today. ' A philosophical habit of mind ' is dismissed as a luxury. It does not help us to keep the wolf from the door. And yet, what abysmal depths does one sink into when one's basic needs are well looked after ! Aldous Huxley blamed it on man's instinct for acquisition, which, he observed, is never sated–as nothing cloys it.

Kothari Commission Report spells out the aims and objectives of education in clear terms. Granting that education is the most powerful instrument of social change, the Commission points out that its effective use requires ' strength of will, dedicated work and sacrifice '. Further, Education must aim at social re-orientation of the student. The individual fulfilment should come, not through selfish and narrow loyalties to personal interests, but through the dedication to the wider loyalties of national development. Finally, education is to provide the widest opportunities for developing the student's potentialities.

These are, indeed, noble objectives–not to be lost sight of, no matter how distant they seem amidst the encircling gloom.

A pragmatist would, however, suggest that Education to be meaningful must train the young mind in the art of reading texts closely. The discipline is necessary for grasping the essentials from both discursive and imaginative writings. A habit has to be formed with a view to coming to grips with conceptual as well as imagistic aspects of knowledge.

In the meanwhile, we continue to alternate between slackness and strain, examinations being the only occasion when we put into gear the machinery of recall and narrative. Learning and reflection never get a chance.

The situation may worsen with a growing accent on vocationalization. The

last bastion would fall. Liberalism will meet its end.

In his widely discussed **The Two Cultures,** C. P. Snow observed, " I believe the intellectual life of the whole of Western Society is increasingly being split into two polar groups—. Literary intellectuals at one pole – at the other scientists. —, Between the two a gulf of mutual incomprehension – sometimes – hostility and dislike, but most of all lack of understanding. Their attitudes are so different that, even on the level of emotion they cannot find much common ground— ".

Well, here, in our institutions of learning, C. P. Snow may be still irrelevant.

A complaint is often voiced that in most of the seminars or class rooms, there is no meaningful dialogue, much less, effective communication. The technical jargon, instead of pinning down meaning, has a clogging effect on the arteries of communication. No wonder, it is only a mediocre mind that seeks shelter in verbiage. Ideas burgeon in silent shadows. In the words of Robert Graves, " — the only relevant standard by which to judge any straightforward piece of prose is the ease with which it conveys its full intended sense to the readers to whom it is addressed— " Graves points out how a writer of Whitehead's eminence could sometimes fail to express ideas concisely. As against this, where there is a facile expression, only inanities seem to be exchanged.

Such is the complexity of the problem of effective communication in an age that boasts of information explosion. Indeed, these are larger issues and need much pondering over. Let me turn to the immediate concern – our College.

During the academic year, our achievements in all the fields have been impressive. The teachers have proved that, given freedom and opportunity, they could do their academic best. An M. Phil., even a Ph. D., is well within reach with hard work and perseverence.

In the B. A. Examination, our student topped the University list of honours; on the playgrounds, our spirited boys and girls have won laurels and our N. S. S. contingent received a privileged treatment from the Chief Minister. These things certainly augur well.

We should not, however, rest on the oars – cannot afford to - in a world with motorized boats and electronic submarines.

Swami Vivekananda's words should guide us here as well as elsewhere. He said, " Put yourself to work and you will find such tremendous power coming to you that you will feel it hard to bear it. Even the least work done for others awakens the power within, (and) gradually instils into the heart the strength of a lion ".

## ॥ स्मरण ॥

समर्थ भारताचे स्वप्न



श्रीमती इंदिरा गांधी

आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते



श्री. यशवंतराव चव्हाण

## ॥ शुभेच्छा ॥

२१ व्या शतकाची तयारी



पंतप्रधान राजीव गांधी



परशुरामीय संपादक मंडळ



सायन्स असोशिएशन ८४–८५ प्रमुख पाहुणे : शि. द. फडणीस



वादसभा

# आनंदयात्री मी आनंदयात्री

**मेधा बापट**
बारावी वाणिज्य

' वाटेवर काटे वेचीत चाललो,
वाटले जसा फुलाफुलात चाललो '

माझं जीवन असू दे लाख काटयांवरून चाललेलं ! माझे पाय असू देत लाल, रक्ताळलेले ! माझं शरीर असू देत झाडवेलींनी ओरबाडलेलं ! अनंत भयानक जखमा असू देत त्यावर ! दाही दिशांनी अनेक शाप येवोत ! या अफाट निळ्या आभाळातून दगडांचा वर्षाव होऊ देत! **दाट, पांढऱ्या धुक्यानं** माझा मार्ग अडवलेला असू दे ! **आणि या काळ्या** कभिन्न काजळ रात्री उभारू देत माझ्याभोवती अभेद्य दगडी भिंती ! माझ्या या प्रवासात येवोत हजारो अडचणी ! माझी ही आनंदयात्रा कधीच संपणार नाही जोपर्यंत माझं हे वेडं सौंदर्यशोधक मन थकत नाही, थांबत नाही- ही आनंदयात्रा हे माझं वेडं मन सारखीच चालू ठेवणार आहे.

सौंदर्यपूजा हा या आनंदयात्रेकरूचा स्थायीभाव आहे, प्राण आहे. ह्या यात्रेत वाटेतले काटेही मला फुलांप्रमाणे भासतील. माझ्या रक्ताळलेल्या पायांना सुखवेल ती मऊशार, गार गार तांबडमाती आणि काळ्या मातीची ओली ढेकळं ! वृक्षवेलींच्या दाट सावलीतून उन्हाचे कवडसे अंगावर घेत जेव्हा मी या हिरव्यागार, मखमली गवतावर पहुडतो तेव्हा या अमर्याद आभाळाच्या नीलिम्यातून ओसंडत असतं ते अपार कौतुक, माझ्याबद्दलचं ! या माझ्या जखमी शरीरावरून प्रेमाने आपले मुलायम हात फिरवतील या चिंब श्रावणधारा ! माझ्या अंगावर रोमांच उठवीत दाही दिशा माझं सुयश चिततील ! आकाशातलं पिठूर चांदणं माझ्यावर स्नेहाची, शीतलतेची बरसात करेल! ही सोनेरी कोवळी उन्ह मला कुरवाळतील ! हा गार वारा त्याचं मधुर संगीत माझ्या कानात सांडत, माझ्या केसांना खटयाळपणे उडवत, माझ्या अंगाअंगावरून वत्सलतेनं हात फिरवून जाईल !

या आनंदयात्रीच्या जीवनात जसे सुखाचे क्षण येतात तसे दुःखाचेही ! कधी या यात्रेतून मधेच परत आलो तो निसर्ग मला साद घालत राहतो! म्हणतो, 'वेड्या! हरलास ? इतक्यातच ? अरे अजून तुला किती तरी पहायचंय्, सोसायचंय् ! किती किती अनुभवायचंय ! अरे आनंदयात्री ना तू ? सुखंदुःखं समान मानून, अव्याहत चालत राहणं, पूर्णत्वाच्या शोधात, हे तर तुझं ध्येय ! अशा या अपूर्व यात्रेला तू नाही येणार ? करंटया, ह्या यात्रेचं नेतृत्व करण्यासाठी तर बुद्धिमान मानवाच्या जन्माला घातलं विधात्यानं तुला ! अन् त्याच्या या विश्वाचं रहस्य, त्याच्या अंतिम गूढ सत्याचा शोध घेण्यासाठी चालत रहायचं सोडून, मनाची आपल्या पचेंद्रियांची कवाडं घट्ट बंद करून भ्याडासारखा पळून गेलास ? अरे कितीतरी साथीदार तुझी वाट बघतायत, चल नीघ, लवकर ये !'

मग माझं नि या निसर्गाचं अतूट नातं मला स्मरतं, त्याची–त्याच्या सौंदर्याची अपूर्व ओढ मला खेचत राहते, पुन्हा पुन्हा त्या यात्रेकडे ! नवीन साहसांच्या कल्पनेनं बाहू कसे स्फुरण पावत असतात ! या चिरपरिचित पृथ्वीची नूतन सौंदर्यरूपं मनात साठवण्यासाठी, तिला न्याहाळण्यासाठी डोळे आतुरतात ! नवी क्षितिजं कवेत घेण्यासाठी मन कसं आसावतं ! आणि या अशाश्वत जीवनातील शाश्वत, चिरंतन मूल्यांच्या शोधात निघतो मागच्या यात्रेच्या प्रसादाच्या आधारावर पुढच्या सादेवर विसंबून ! एखाद्या अश्वत्थाम्यासारखा, मस्तकावर भळाळती जखम घेऊन चिरंजीवत्वाचा वर मिरवत !

शेवटी मी आहे आनंदयात्री ! या अमर्याद विश्वमालेच्या एका छोटयाशा सृष्टीतला एक अतिक्षुद्र मर्त्य मानव ! मी शोध घेतो; कोणी माझ्या या जीवनपेल्यात भरला हा अत्यानंद ? कोणी ओतले त्यात दुःखाचे हलाहल ? कोणत्या उःशापासाठी ही पृथ्वी अशी एकाकी अवस्थेत खिन्नपणे मान खाली घालून स्वतःभोवती फिरत राहिली आहे ? चैतन्याचे आणि जीवनानंदाचे चिमुकले ओघळ या पृथ्वीवरच नेमके कसे सांडले ? काळाला अंत नाही, विश्वाला मर्यादा नाही, चराचरांत जिकडे पहावे तिकडे अनंत, अगाध

आणि अमर्याद ! मग याच जीवसृष्टीच्या भाळी, ललाटी तेवढा हा मृत्यू का म्हणून ? तरी पण जगात सगळीकडे आनंद भरलेला आहे, यावर या आनंदयात्रीचा प्रगाढ विश्वास आहे. म्हणूनच तो निर्भय आहे, यात्रेकरू आहे. वेड्यांनो, या, तुम्ही पण या, आपल्या इवल्याशा जीवनात एकाच ठिकाणी राहून त्याच त्याच सुखदु:खाच्या संकुचित कोषात जगणाऱ्या क्षुद्र किड्यांनो; जरा या अफाट पृथ्वीत किती उदात्त, उज्ज्वल गोष्टी आहेत हे जरा नीट डोळे उघडून पाहा.

'आनंदयात्रा' हा एक न संपणारा शोध आहे! त्या अज्ञात परब्रह्माचा शोध ! पण तो शोध कसा ? अनेक अनुभव घेत, मनाला, बुद्धीला प्रगल्भ करत ! जीवन कृतार्थ करत ! ही यात्रा संपते ! केव्हा, कुठे, कशी ? ठाऊक नाही मला ! पण एवढं माहीत आहे की आदितत्वांचा साक्षात्कार झाल्यावर आपण यात्रेकरू उरतच नाही ! आपली अवस्था उरते, ती फक्त चैतन्यानुभवाची !

ही चिरपरिचित पृथ्वीच चिरनूतन रूपातून चिरंतन सत्याचा साक्षात्कार घडवीत असते, आनंदाचा आविष्कार घडवत ! म्हणूनच पाडगांवकर आठवतात,

अखंड नूतन मला ही धरित्री
आनंदयात्री मी आनंदयात्री.

---

## शंभरातील पंच्च्यांणव

राजेंद्र सखदेव
द्वि. व. साहित्य

कॉलेज ! कॉलेज ! !
प्रवेश मिळेल का नाही ?
हव्या त्या कॉलेजात प्रवेश मिळेल ?
न मिळाल्यास पुढे काय ?
कुठे जावे लागेल ?
काय करावे लागेल ?
ताण ! ताण ! !
कित्येकदा इच्छेविरुद्ध शिक्षण,
नाईलाजाने स्वीकार.
अभ्यासाकडे दुर्लक्ष
कॉलेजच्या वेळात मॅटिनी
परिक्षेत कमी गुण
कॉलेजात प्रोफेसरांची
आणि घरी आई वडिलांची बोलणी
त्याना दु:ख होते
त्याचेही वाईट वाटते !
फिया ! पोषाखीपणा ! पॉकेट मनी !
फॅशन्स अगदी आपल्याला आवडत आणि परवडत
नसल्या तरीही कराव्या लागतात पण पुढे
त्याचाही कंटाळा.
न पुरणारा पॉकेट मनी !
बारीक सारीक कारणांवरून पालकांशी होणारे
वाद, खटके.
चेष्टेवरून, टिंगलीवरून मित्रांशी होणारी भांडणे.
समजुती, गैरसमजुती, वर्तणूक यामुळे कॉलेजातील प्रोफेसरांशी बिघडलेले संबंध, आईवडिलांशी बिघडलेले आणि स्वत:शी बिघडलेले संबंध. एखाद्या नाजुक प्रकरणावरून निर्माण झालेले अनेक प्रश्न.
आपल्याला आपली चूक कळून होणारा
पश्चात्ताप.
कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्यात क्षुल्लक कारणांवरून निर्माण होणारी खुन्नस.
त्यातून निर्माण होणारी वैराची भावना.
कधी कळत, कधी न कळत
एकटेपणा !
क्वचित अवचित येणारी जाण . . . .
सदासर्वदा राहू दे !

# भारताचे अंदाजपत्रक कसे तयार केले जाते ?

**उषा नाईक**
तृ. व. साहित्य

भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात अर्थप्रशासन हे शासनाचे महत्त्वाचे अंग मानले जाते. सरकारच्या प्रत्येक कृतीसाठी वित्ताची आवश्यकता असते. याखेरीज देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या आर्थिक योजना आखल्या जातात, त्या कार्यान्वित करण्यासाठी प्रचंड पैसा लागतो. त्या दृष्टीने अर्थप्रशासन एक महत्त्वाचे साधन म्हणून त्याचा उपयोग करून घ्यावा लागतो. अर्थप्रशासनाचे महत्त्व हे दिवसेंदिवस वाढतच असलेले दिसते.

'अंदाजपत्रक' हा अर्थप्रशासनाचा गाभा मानला जातो. अंदाजपत्रकाबद्दल सर्वसामान्य नागरिकापासून ते बड्या उद्योगपतींपर्यंत एक कुतूहल मिश्रित नाते असते. अंदाजपत्रकाचा व्यक्तीच्या खाजगी जीवनावर जसा परिणाम होतो, तसेच देशाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावरही ह्याचे अत्यंत दूरगामी स्वरूपाचे परिणाम होत असतात. आपल्याला ज्या पद्धतीचा समाज निर्माण करायचा आहे त्याचे एक साधन म्हणून आपल्या देशात अंदाजपत्रकाकडे पाहिले जाते. उद्योगधंद्यांना संरक्षण आणि विशेष सवलती देऊन उत्पादनक्षमता वाढवणे, आर्थिक उत्पन्नावर अधिक कर लादून संपत्तीमधील विषमता कमी करणे, विकासप्रकल्प उभे करून नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देणे, तसेच करातून मिळणारा पैसा समाजकल्याणार्थ खर्च करणे अशा विविध दृष्टिकोनातून अंदाजपत्रक महत्त्वाचे मानले जाते.

अंदाजपत्रकाचे महत्त्व अनेक मार्गांनी सिद्ध होते. अंदाजपत्रक केवळ संभाव्य जमाखर्चाचा पुढील वर्षासाठी घेतलेला अंदाज असत नाही. अंदाजपत्रक शासनाच्या नियोजित कार्यक्रमाचा आराखडा असतो. लोकप्रशासनातील विविध खात्यांमध्ये व घटकामध्ये समन्वय साधण्याचे ते एक महत्त्वाचे हत्यार आहे. कार्यक्षम अर्थप्रशासनाचा अंदाजपत्रक हा पाया आहे. अंदाजपत्रक हे राजकीय-पक्षीय धोरण किंवा परराष्ट्रीय धोरण याचा एक दस्तऐवज मानले जाते. सारांश, राष्ट्राची राजकीय–आर्थिक–सामाजिक प्रकृती कशा प्रकारची आहे हे थोडक्यात अंदाजपत्रकात प्रतिबिंबित झालेले असते.

आपल्या देशात अंदाजपत्रक अथवा अर्थसंकल्प आर्थिक वर्षाच्या प्रारंभापूर्वी प्रसिद्ध केला जातो. आर्थिक वर्ष १ एप्रिलला सुरू होऊन त्याची समाप्ती ही पुढील वर्षाच्या ३१ मार्चला होते. भारताच्या कृषिप्रधान व्यवस्थेचा विचार करून ब्रिटिशांनी १ एप्रिल ते ३१ मार्च हे भारताचे आर्थिक वर्ष ठरविले. इतर देशांमध्ये आर्थिक वर्षाची सुरुवात ही वेगवेगळी असते. भारतात अंदाजपत्रकाला 'अंदाजपत्रक' ( Budget ) न म्हणता 'वार्षिक अर्थविधान' ( Annual Financial Statement ) असे म्हटले जाते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या देशात संपूर्ण देशाचे एकच अंदाजपत्रक तयार न करता प्रतिवर्षी दोन अंदाजपत्रके तयार केली जातात. (१) सर्वसाधारण अंदाजपत्रक (२) रेल्वे अंदाजपत्रक. या दोन्ही अंदाजपत्रकाचे मिळून 'राष्ट्रीय अंदाजपत्रक' बनते. या राष्ट्रीय अंदाजपत्रकासच वार्षिक अर्थविधान असे म्हणतात. अर्थसंकल्प प्रसिद्ध करण्यापूर्वी सर्वसाधारण नागरिकांच्या समस्या विचारात घेतल्या जातात. तसेच परिस्थितीचाही विचार केला जातो. उदा. या वर्षाचे अंदाजपत्रक प्रसिद्ध करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून घेतलेली कर्जे, त्यांची परतफेड, वाढती महागाई, आगामी निवडणुका, औद्योगिक उत्पादनातील चढ–उतार, आजारी उद्योगधंदे, कामगारांचे हित इत्यादी अनेक गोष्टी विचाराधीन होत्या. त्यामुळेच अर्थसंकल्प कसा असेल याबाबत नेहमीच मोठी उत्सुकता निर्माण होते.

अर्थसंकल्पाची प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीची असते. ती प्रक्रिया प्रामुख्याने तीन भागांत विभागली जाते. (१) अर्थसंकल्प तयार करणे (२) संसदेची अर्थसंकल्पास मान्यता मिळविणे (३) अर्थसंकल्प कार्यान्वित करणे.

(१) **अर्थसंकल्प निर्मिती** – भारतात अर्थसंकल्पीय अनुमान हे आगामी आर्थिक वर्षाच्या ७/८ महिने

अगोदरपासून तयार करावयास घेतले जाते. अर्थसंकल्पाची रूपरेखा तयार करण्याची जबाबदारी अर्थमंत्रालयाची असली तरी त्यामध्ये प्रशासकीय मंत्रालय, नियोजन मंडळ तसेच भारताचा महालेखपरीक्षक यांचा सहभाग असतो, यापैकी प्रशासकीय मंत्रालय आणि त्याच्या आधीन कार्यालयाकडून अर्थमंत्रालयाला प्रसासकीय आवश्यकतेसंबंधी माहिती पुरविली जाते. नियोजन मंडळ योजनेच्या अग्रस्थानासबंधी सल्ला देते. आणि महालेखापरीक्षक अनुमान तयार करण्यासाठी लेखाकौशल्य उपलब्ध करून देतो.

सर्वसाधारणपणे जुलै–ऑगस्टमध्ये अर्थमंत्रालयाकडून प्रशासकीय मंत्रालयाकडे, तसेच त्यांच्या विभाग–प्रमुखांकडे संभाव्य खर्चासंबंधी अनुमान तयार करण्यासाठी फॉर्म पाठवले जातात. विभाग प्रमुख स्थानिक कार्यालयाकडे हे फॉर्म पाठवतात. या फार्मचे स्वरूप खालील प्रमाणे असते.

१) पूर्वीच्या वर्षाचा झालेला प्रत्यक्ष खर्च.

२) चालू वर्षाचा मंजूर झालेला संकल्पित खर्च.

३) चालू वर्षाचा सुधारित अंदाज.

४) पुढील वर्षाचे संकल्पित अंदाज.

५) अंदाजपत्रक तयार करते वेळी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि त्याच कार्यासाठी झालेला मागील वर्षातील खर्च, स्थानिक कार्यालयांनी तयार केलेली ही अनुमाने विभाग प्रमुखांकडे दोन भागांत पाठविली जातात.

१) स्थायी खर्च २) अ–निरंतर चालणाऱ्या विषयांचा समावेश ब–पूर्णतः नवीन विषय.

स्थानिक कार्यालयाकडून आलेली ही अनुमाने विभाग प्रमुखांकडे पाठवून तिथे त्यांचे विवेचन आणि योग्य ते बदल केले जातात. विभाग प्रमुख ही अनुमाने प्रशासकीय मंत्रालयाकडे पाठवते. प्रशासकीय मंत्रालय त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करून नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत सर्व अनुमाने अर्थमंत्रालयाकडे पाठविते. प्रत्येक विभाग आपल्या अनुमानांची एक प्रत भारताच्या महालेखापालाकडे पाठवतो. महालेखापाल अनुमानांचे सूक्ष्म निरीक्षण करून ते अर्थ मंत्रालयाकडे पाठवितात.

अर्थ मंत्रालयाकडून निरनिराळ्या खात्यांकडून आलेल्या अंदाजांची छाननी केली जाते. ही छाननी आर्थिक दृष्टिकोनातून होते. सरकारी तिजोरीतील एकूण पैसा, नवे निधी, व्यावहारिक शक्यता, बचत इत्यादी बाबींचा विचार केला जातो, तसेच अर्थमंत्रालय हे प्रशासकीय मंत्रालयाच्या खर्चाची तरतूद करण्यासाठी साधने व उपाय यांचा शोध घेत असते. याचा उपयोग सरकारचे एकंदर उत्पन्न निश्चित करण्यासाठी होतो.

जानेवारीमध्ये अर्थमंत्री पंतप्रधानांसमोर अर्थसंकल्प मांडतात. त्यावर चर्चा होऊन आवश्यक ते बदल केले जातात. नंतर या अर्थसंकल्पाच्या मसुद्यावर मंत्रिमंडळाची संमती घेतली जाते आणि मंत्रिमंडळाच्या संमतीनंतर अर्थसंकल्प संसदेकडे पाठविला जातो.

२) **संसदेची अर्थसंकल्पास मान्यता**–अर्थसंकल्पास संसदेची मान्यता ही महत्त्वाची मानली जाते. यामध्ये प्रामुख्याने पाच टप्प्यांचा समावेश होतो.

१) **अर्थसंकल्पाचा विधिमंडळात प्रस्ताव**–भारतीय राज्यघटनेच्या कलम ११२ नुसार राष्ट्रपतींद्वारे संसदेसमोर अर्थसंकल्पाचा मसुदा मांडला जातो. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या कार्य दिवशी अर्थसंकल्प लोकसभेसमोर मांडून अर्थमंत्री अर्थसंकल्पीय भाषण करतात. या दिवशी अर्थसंकल्पावर कोणत्याही प्रकारची चर्चा होत नाही. अथवा कोणतेही प्रस्ताव मांडले जात नाहीत. तथापि अर्थमंत्र्यांचे भाषणास खूप महत्त्व दिले जाते. त्यांच्या भाषणातून शासनाचे सर्वगामी धोरण स्पष्ट होत असते. त्यामुळे संबंधित उद्योगपतींपासून ते विदेशी प्रतिनिधींपर्यंत अनेक गट या वेळी कटाक्षाने उपस्थित राहतात.

२) **अर्थसंकल्पावरील सामान्य चर्चा**–आठ दिवसांच्या अवधीनंतर अर्थसंकल्पावर सामान्य चर्चा घडवून आणली जाते. ती ३–४ दिवस चालते. या वेळी अंतर्भूत तत्त्वांसंबंधी चर्चा केली जाते; परंतु विवरणाबाबत चर्चा होत नाही. अर्थमंत्र्यांकडून चर्चेतील प्रश्नांना उत्तर दिले जाते. या प्रसंगी शासनाच्या धोरणावर कडक टीका करण्याची संधी विरोधकांना मिळते.

३) **अनुदान मागण्यांवर मतदान**–अनुदानासंबंधी मागण्या मंत्रालयाच्या वा खात्याच्या क्रमानुसार प्रस्तुत केल्या जातात. लोकसभेत या मागण्यांवर मतदान होते. प्रत्येक मागणी ही प्रस्तावाच्या स्वरूपात असून संबंधित मंत्री त्यावर छोटेसे भाषण करतो. या वेळी विरोधी पक्षाकडून सरकारवर व संबंधित मंत्र्यावर प्रखर टीका केली जाते. कपात प्रस्ताव सादर करून चर्चेला उत्तेजन दिले जाते. कपात प्रस्ताव पुढील प्रकारे मांडले जातातः–

अ) धोरणनीतीसंबंधी कपात–या प्रस्तावात 'मागणी केलेल्या रकमेत १ रुपया कमी केला जावा' असे सुचविले जाते; परंतु याचा मुख्य उद्देश हा सरकारच्या किंवा विशेष विभागाच्या धोरणावर प्रखर टीका करून असंमती दर्शविण्याचा असतो, तर काही वेळा विशिष्ट विषयावर सविस्तर चर्चा घडवून आणणे हाही असतो.

ब) काटकसर कपात– 'मागणी केलेल्या रकमेतून काही रक्कम कमी केली जावी' असे सुचविले जाते. प्रमुख उद्देश हा सरकारी खर्चात योग्य ती काटकसर करणे हा असतो.

सरकारचे या प्रस्तावाबाबतचे धोरण समर्थनीय असते तेव्हा प्रस्तावांवर संबंधित मंत्री उत्तरे देऊन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती करतात. विरोधी पक्षांकडून अशावेळी प्रस्ताव मागे घेतला जातो. महत्त्वाचा भाग म्हणजे संसदेला अनुदानाच्या रकमेत वाढ करण्या संबंधी सूचना देता येत नाही. संसद मागण्या नाकारू शकते अथवा कपात करू शकते. परंतु सत्तारूढ पक्षाचे बहुमत असल्यामुळे अडचणीचे प्रसंग फारसे येत नाहीत. यानंतर मागणीवर मतदान होऊन बहुमताने मागणी स्वीकारली जाते व मागणीचे रूपांतर अनुदानात होते. यासाठी २७ दिवसांचा अवधी दिला जातो. शेवटच्या दिवशी राहिलेल्या सर्व मागण्यांवर मतदान घेतले जाते व मागण्या मान्य केल्या जातात.

क) विनियोग विधेयकावर चर्चा– मागण्यांच्या मान्यतेनंतर लोकसभा विनियोग विधेयक मंजूर करते. या विधेयकाद्वारे मागण्यांना कायदेशीर स्वरूप देऊन संचित निधीतून सरकारला खर्च करण्याचा अधिकार दिला जातो. यावेळी विधेयकाच्या धोरणासंबंधी चर्चा केली जाते. लोकसभेच्या मंजुरीनंतर हे विधेयक राज्यसभेकडे पाठविले जाते. राज्यसभेचे काम केवळ औपचारिक स्वरूपाचे म्हणजे मान्यता देण्याचे असते. यासाठी राज्यसभेला १४ दिवसांचा अवधी दिला जातो या काळात राज्यसभा शिफारशी लोकसभेकडे पाठवते, नाहीतर राज्यसभेची मंजुरी गृहीत धरली जाते. मग लोकसभा हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवते. राष्ट्रपतींची संमती ही नाममात्र असते.

ड) करविधेयकास मान्यता – चौथ्या टप्प्यानंतर वास्तविक अर्थसंकल्प मंजूर झालेला असतो तथापि हा स्वतंत्र आणि महत्त्वाचा टप्पा मानला जातो. स्थायी स्वरुपाच्या करांना कायद्याचा आधार नसला तरी चालतो; परंतु आगामी वर्षात कर लावण्यासंबंधीचे जे प्रस्ताव असतात, त्यांना विधिनियमांचे स्वरूप देणे महत्त्वाचे ठरते. याला वित्तविधेयक असेही म्हटले जाते. सर्वसाधारणपणे विधिनियमांसाठी उपयोगात आणली जाणारी प्रक्रिया वित्तविधेयक मंजूर करताना वापरली जाते. वित्तविधेयकाला राष्ट्रपतींनी संमती दिल्यावर त्याचे कायद्यात रुपांतर होते.

अर्थसंकल्पात आगामी वर्षासाठी मंजूर केलेला एकूण वित्तखर्च हा अनेकदा अपुरा असतो. अशावेळी वेगवेगळ्या स्वरुपात अनुदान दिले जाते. अनुदाने अनेक प्रकारची असतात व ती सरकारला गरजेनुसार उपलब्ध करून दिली जातात. उदा. लेखानुदान, पूरक अनुदान इत्यादी.

३) **अर्थसंकल्पाची अंमलबजावणी**– संसदेकडून अर्थसंकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर उपलब्ध साधनांद्वारे निश्चित स्वरुपाचे कार्यक्रम पूर्ण करण्यास सुरुवात केली जाते. अर्थसंकल्पाची अंमलबजावणी म्हणजे विविध योजना व कार्यक्रम प्रत्यक्ष राबवणे असते. ही वर्षभर चालणारी प्रक्रिया असते. सार्वजनिक खर्चावर नियंत्रण प्रामुख्याने संसदेकडून ठेवले जाते व त्यासाठी दोन समित्यांची स्थापना केली जाते.

१) सार्वजनिक लेखा समिती २) अनुमान समिती.

अर्थसंकल्पाचे तीन प्रकार पाडले जातात:

१) शिलकी अंदाजपत्रक २) समतोल अंदाजपत्रक. ३) तुटीचे अंदाजपत्रक. यापैकी भारताची बहुतेक अंदाजपत्रके तुटीचीच राहिली आहेत. अंदाजपत्रकाच्या या प्रकारांमुळे सरकारची आर्थिक बाजू पटकन लक्षात येते. वास्तविक तुटीचे अंदाजपत्रक हे योग्य मानले जात नाही; परंतु भांडवलशाही समाजात वेळोवेळी ज्या आर्थिक समस्या व विपत्ती उत्पन्न होतात, त्यांचा मुकाबला करण्याचे साधन म्हणून तुटीच्या अंदाजपत्रकाकडे बघितले जाते. आर्थिक मंदी, व्यक्तींच्या क्रयशक्तीतील घट, बेकारी असे अनेक दोष नाहीसे करून सार्वजनिक कार्यांवर खर्च होणारा पैसा तुटीच्या अंदाजपत्रकाद्वारे पुरवला जातो.

एकंदरीत भारतातील अंदाजपत्रकाचा विचार करता अंदाजपत्रक हे राष्ट्राच्या एकूण आर्थिक प्रकृतीचे प्रतिबिंब असते, असे मानावयास हरकत नाही. तसेच अंदाजपत्रक तयार करण्यासाठी व त्याला मान्यता देण्यासाठी वापरली जाणारी पद्धत ही लोकशाहीला पूरक अशीच आहे

# इलेक्ट्रॉनिक्स–जग व भारत

**जयंत मेहेंदळे, मिलिंद केळकर**
तृ. व. शास्त्र

जगातील इलेक्ट्रॉनिक्सची स्थिती व भारतातील इलेक्ट्रॉनिक्सची स्थिती ह्या बाबत पुण्यातील इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर्स व इलेक्ट्रॉनिक इंडस्ट्रिआलिस्ट ह्यांच्याशी आम्ही चर्चा केली. ह्या चर्चेतून निष्पन्न झालेली माहिती येथे थोडक्यात देण्याचा हा प्रयत्न.

दळणवळण यंत्रणा, संरक्षक त्याचप्रमाणे शैक्षणिक यंत्रणा, कारखानदारी, करमणूक ह्या यंत्रणांमध्ये इलेक्ट्रॉनिक्सनी क्रांतीच केली आहे.

दळणवळण यंत्रणेत आपल्याकडे नुकतीच इलेक्ट्रॉनिक दूरध्वनी केंद्रे उभी केली आहेत. मुंबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता यासारख्या प्रमुख शहरांत त्यांची वाढ झपाट्याने होत आहे. हे तंत्रज्ञान भारतात नवेच आहे, पण जपान व पाश्चिमात्य देशांत हे तंत्रज्ञान १० ते १५ वर्षांपूर्वीच वापरले गेले आहे. पुण्यात हे तंत्रज्ञान संपूर्णपणे अजून वापरात आलेले नाही. भारतातील बहुसंख्य केंद्रे ही अजूनही मानवासच चालवावी लागतात. उदाहरणार्थ, एखाद्या कारखान्यात केलेला दूरध्वनी प्रथम तेथील प्रमुख केंद्रात जातो व तेथील ऑपरेटरद्वारा तो कारखान्यातील माणसास मिळतो. आपल्याकडे ऑपरेटर हा मनुष्यच असतो. पाश्चात्य देशात ते काम गणकयंत्रच करते. गाडीतील दूरध्वनी (कार फोन) ही कल्पना भारतात पूर्ण नवीनच असून ती लक्षातही घेतलेली नाही. पारदर्शक काचतंतूद्वारा आवाज व बोलणाऱ्याची प्रतिमा प्रक्षेपित करण्याचे तंत्र अजून भारतात प्रायोगिक अवस्थेत आहे. मात्र जपानमध्ये याच तंत्राने ६००० ते ६५०० दूरध्वनी संदेश केसाएवढ्या काचतंतूतून पाठवण्याचे तंत्र यशस्वीरित्या हाताळले आहे. दूरध्वनी परिसंवादाची सोय (फोन कॉन्फरन्स) नुकतीच भारतात अस्तित्वात आली आहे.

संरक्षण व्यवस्थेत भारताने इन्सॅट–१–बी नुकताच प्रक्षेपित केला आहे. पाश्चात्यांच्यांत उपग्रह हे हेरगिरीचे महत्त्वाचे साधन आहे. ह्या उपग्रहात पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक्सचा वापर केला जातो. गणकयंत्रांकित विमाने (सी–हॅरिअर्स) भारताने नुकतीच विकत घेतली आहेत व ती भारतातील पहिली गणकयंत्रांकित विमाने आहेत. परंतु परदेशात अनेक विमाने गणकयंत्रांचा वापर करतात (मिग–२३ व एफ्–१६). इलेक्ट्रॉनिक्सच्या मदतीने जमिनीवरून विमानवेधी शस्त्रांना (मिसाईल्स) दिशा देण्याचे तंत्र व यंत्र भारतात अजून वापरात आलेले नाही. परदेशात आता तेच तंत्र प्रामुख्याने वापरतात. अनेक उपग्रह व कोलंबियासारखी परत वापरता येणारी याने परदेशात केवळ संरक्षणाच्या दृष्टिकोनातून वापरली जातात. पाश्चात्य देशात राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यालयाच्या आत जाण्यासाठी असणारी व्यवस्था संपूर्ण इलेक्ट्रॉनिक असते. (काही ठराविक पद्धतीनेच बटने दाबणे किंवा गणकयंत्रात विशिष्ठ पत्रा घालणे) अशा पद्धतीने संरक्षणव्यवस्था कडक केलेली असते.

भारतात करमणुकीच्या साधनांत दूरदर्शन महत्त्वाचा भाग आहे. रंगीत दूरदर्शन सेवा भारतात १९८२ साली सुरू झाली. त्यानंतर लगेचच व्हिडिओ कॅसेटस्, रेकॉर्डर्स आणि रेकॉर्डस् व प्लेअर्स बाजारात आले आहेत. परदेशात हे गेली १० वर्षे वापरले जात आहेत. नुकतेच भारतात दुसरे दूरदर्शन चॅनल चालू केले आहे, तर अमेरिकेत व पाश्चात्यांच्यांत उपग्रहाद्वारे दूरदर्शन सेवा अष्टौप्रहर चालू असते. ह्या सर्वच क्षेत्रांत भारत ५ ते १५ वर्षे मागे आहे.

शैक्षणिक दृष्टिकोनातून भारतात २ ते ३ वर्षांपूर्वी दूरचित्रवाणीचा वापर केला गेला. गणकयंत्राचा वापर भारतात शिक्षण क्षेत्रात खूपच कमी आहे.

घरगुती वापरासाठी गणकयंत्राचा वापर भारतात अजून फारसा केला जात नाही. परदेशात पर्सनल कॉम्प्युटर, किचन कॉम्प्युटर, व्हिडिओ गेम्स सर्रास वापरले जातात. त्यांच्याकडे ती एक दैनंदिन गरज होऊन बसली आहे.

सर्व कारखाना गणकयंत्र व यंत्रमानव यांच्या मदतीने चालवण्याचा प्रयोग जपान आणि पाश्चिमात्यांत यशस्वीपणे केला गेला आहे. जपानमध्ये एका बुटाच्या कारखान्यात सर्व यंत्रमानवच काम करतात. रशियामध्ये तर पिकाच्या पेरणीपासून ते पीक कापून मळणी करून

पोत्यात भरण्यापर्यंतची सर्व कामे गणकयंत्राकडून केली जातात. पाश्चिमात्य देशांत आता तर यंत्रमानव तयार करण्याच्या कारखान्यातही यंत्रमानवाने महत्त्वाची कामे बजावण्यास सुरुवात केली आहे. परंतु भारतातील एकाही कारखान्यात फक्त गणकयंत्र आणि यंत्रमानव ह्यांच्या मदतीने उत्पादन चालू झालेले नाही. पाश्चात्य देशांत आणि जपानमध्ये अनेक बँका, सहकारी पतपेढ्या ह्या पूर्णपणे गणकयंत्रावरच चालतात.

भारतात इलेक्ट्रॉनिक्स व इतर स्वयंचलित यंत्रणांचा वापर करण्याचे प्रमाण वाढत आहे, परंतु बेकारीच्या संकटाच्या भीतीमुळे तो वादाचा मुद्दा झाला आहे.

---

## काय वसलंय ?

कविता नेरकर
तृ. व. वाणिज्य

सुराच्या तानात
तानाच्या सुरात
माझ्या मनात
काय वसलय ?

पक्षांच्या गानात
केवडयाच्या वनात
भ्रमराच्या मनात
काय वसलय ?

संध्येच्या सोन्यात
कोवळया उन्हात
मेघांच्या मनात
काय वसलय ?

मोत्याच्या खळयात
जलदाच्या जलात
सागराच्या मनात
काय वसलय ?

सांगतेस का ग कानात
*हिरव्या गार वनात*
तुझ्या तनमनात
काय वसलय ?

## काय हे विचार ?

म. वा. प्रभुणे
तृ. व. साहित्य

काय हे विचार येतात सारखे मनी ?
धनीच जणू काही शोभतात
सारखे डोक्याला सतावतात
वाटते कशाला आपल्याला फसवतात ?

एक विचार जातो
तो दुसरा मनी येतो
दुसरा विचार जातो
तो तिसरा मनी येतो

काय हे विचार येतात सारखे मनी ?
दोन्यातले मणीच जणूकाही शोभतात
चांगले वाईट विचार
ना त्याला कशाचा आधार

सारे काही डगमगते
असतात खरे फोलच ते
एक ना दोन, अगणित विचार

मग काय करावा त्यांचा आचार
काय हे विचार येतात सारखे मनी ?
उद्योग नसल्यावेळीच कडमडतात
शोभतात कधी ?

# मिथेल आयसोसायनेट

**शेखर वैद्य**
एम्. एस्सी

भोपाळ शहरातील युनियन कार्बाईडच्या कीटकनाशक बनविणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीच्या कारखान्यातील दुर्घटनेमुळे उडालेल्या हाहा:काराच्या संदर्भात मी हा लेख लिहिला आहे. या कारखान्यातील एका टाकीतील गळतीमुळे हा अपघात घडून आला. या टाकीत कार्बारिल हे कीटकनाशक बनविण्यासाठी लागणारे मिथील आयसोसायनेट हे रसायन द्रवरूपात साठवून ठेवले होते. टाकीतील तपमान वाढल्यामुळे त्याचे वायूत रुपांतर झाले. हा वायू वातावरणात पसरल्यामुळे हजारो लोक मृत्यू पावले. शेकडो जखमी झाले व अनेक अजूनही उपचार घेत आहेत. या वायूबरोबरच पसरलेल्या फॉसजीन या वायूने अनेक माणसांचा बळी घेतला. पाळीव जनावरे व पक्षीही त्यातून सुटले नाहीत.

हे वायू का व कसे धोकादायक असावेत हे जाणून घ्यायची आवश्यकता आहे. फॉसजीन हा वायू कार्बन मोनॉक्साईड (Co) व क्लोरीन ($Cl_2$) यांच्यांतील अभिक्रियेने १८११ साली प्रथम बनविण्यात आला. या वायूचे रासायनिक नाव कार्बोनील क्लोराईड ($COCl_2$) असे असून, या वायूची मेथिल अमाईन ($CH_3NH_2$) या रसायनाबरोबर अभिक्रिया घडवून मिथील आयसोसायनेट हे रसायन तयार केले जाते.

कीटकनाशकाबरोबरच फॉसजीन खते, रंग, प्लॅस्टिक इ. विविध उत्पादने तयार करण्यास हा उपयोगी पडतो. हा अत्यंत विषारी, रंगहीन व उग्रवास असलेला वायू आहे. याचे हवेतील १ पी. पी. एम (हवेच्या एक दशलक्षांश भागाइतके) पेक्षा जास्ती प्रमाण धोकादायक ठरू शकते. हा वायू श्वसनाबरोबर आत घेतल्यामुळे फुप्फुसाना गंभीर प्रकारची इजा होऊ शकते. या वायूचे २४ तासांनंतर दुष्परिणाम जाणवू लागतात. खोकला येणे, उलट्या होणे, डोळ्यांची तसेच घश्याची जळजळ होणे, ही लक्षणे दिसतात. फुप्फुसात पाणी साठून व श्वास कोंडल्यामुळे माणसाचा मृत्यू ओढवतो.

मिथील आयसोसायनेट हे सर्वसाधारण (23°c) तपमानात द्रवरुपात आढळून येते. द्रवरुपात असताना फॉसजीनच्या तुलनेत ते कमी विषारी असते; परंतु त्याचे वायूत रुपांतर झाल्यानंतर ते फॉसजीनपेक्षाही जास्त धोकादायक ठरू शकते. मिथील आयसोसायनेट ($CH_3NCO$) हे रंगहीन व अत्यंत ज्वालाग्रही व विषारी रसायन आहे. याचे ०.०२ पी. पी. एम पेक्षा जास्ती प्रमाण धोकादायक ठरू शकते. या रसायनाची अल्फा नॅप्थॉल या रसायनाशी अभिक्रिया घडवून कार्बारिल, (रासायनिक नाव १ नॅप्थील एन मेथील कार्बामेट) हे कीटकनाशक तयार केले जाते.

पाण्याशी अभिक्रिया घडल्याने मेथील अमाईन व कार्बन डायॉक्साईडमध्ये याचे विघटन (Decomposition) होते.

$$CH_3NCO + H_2O \rightarrow CH_3NH_2 + CO_2 \uparrow$$

नेमक्या याच गुणधर्माचा उपयोग करून अनेक माणसांचे प्राण वाचले असते. या वायूची बाधा झालेल्या व्यक्तीच्या नाकाशी ओले फडके गुंडाळून त्यांचे प्राण वाचले असते.

मात्र या दुर्घटनेतून डास, अनेक प्रकारचे कीटक, कोंबड्या सहीसलामत वाचले. कोंबड्याचे शारीरिक तपमान जास्ती असल्याने हे घडले असावे असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

या दुर्घटनेमुळे अधिक धोके असणारे मोठे मोठे प्रकल्प उभारण्याचा नाद सोडून देणे आवश्यक आहे. या उद्योगात धोक्याची सूचना देणारी यंत्रणा तरी कार्यान्वित असणे आवश्यक आहे. विषारी रसायनांचा वापर दक्षतेने करावयास हवा. बर्नार्ड शॉने म्हटल्याप्रमाणे 'Science never solves the problem without creating to more' म्हणजे कुठलेही शास्त्र एखादा प्रश्न सोडविताना जास्ती गुंतागुंतीचे नवे प्रश्न निर्माण करते हे निदान भोपाळ घटनेबाबतीत दुर्दैवाने खरे ठरले आहे.

# दुःख मापक यंत्र

**ज्योती कुलकर्णी**
प्र. व. शास्त्र

' दुःखमापक यंत्र ' हे नाव वाचून आश्चर्याचा धक्का बसला ना ? आणि अशा या यंत्राचा शोध तरी कुणी लावला असा तुम्हाला प्रश्न पडेल.

या दुःखमापक यंत्राचा शोध अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. हार्डी व डॉ. वोल्फ यांनी लावला. पण त्यासाठी त्यांनी स्वतः अतिशय त्रास सहन केला. सर्वसामान्य माणसापेक्षा तिप्पट शारीरिक दुःखे त्यांनी स्वतः सहन केली.

एखाद्याचे दुःख किंवा वेदना किती आहेत, हे या यंत्राने समजण्यासाठी त्यांनी प्रयोग करून वेगवेगळ्या दुःख व वेदनांचा दुःखांक काढला. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे देता येईल.

**दुःखांक तक्ता**

| क्रमांक | वेदनांचे प्रकार | दुःखांक |
|---|---|---|
| १ | परमावधीच्या प्रसूती वेदना | १०½ |
| २ | निखारा शरीराला लागल्यावर | १० |
| ३ | हृदयातील कळा | ९ |
| ४ | मेंदूतील गळू | ८ |
| ५ | सामान्यतः याहून अधिक वेदना | ७ |
| | क्वचित होतात. | ६ |
| ६ | पोटातील कळा | ५ |
| ७ | कॅन्सरच्या कळा | ४ |
| ८ | दाढ दुखीच्या वेदना | ३ |
| ९ | संधिवातातील दुःख | २ |
| १० | प्रथम झळ सुरू होणे | १ |
| | | ० |

निरनिराळे दुःखांक ठरवताना त्यांनी जे संशोधन केले ते असे की दुःख, वेदनेला कमाल मर्यादा असते. त्याहूनही जर अधिक दुःख झाले तर त्याची जाणीव मात्र आपल्याला होत नाही. सर्वसाधारणतः शारीरिक दुःखे ही या कमाल मर्यादेच्या फार अलीकडची असतात. या संशोधनासाठी त्यांनी जो यशस्वी प्रयोग केला तो भाजल्यामुळे होणाऱ्या शारीरिक वेदनेवर.

त्यासाठी त्यांनी एक मोठा विजेचा दिवा घेतला. भिंगाच्या सहाय्याने प्रकाश एकत्रित करून, ज्या व्यक्तीच्या दुःखाचे मापन करायचे असेल, त्याच्या कपाळावर शाईचा डाग पाडून प्रकाश बरोबर त्या ठिपक्यावर पडेल अशी रचना करायची. यासाठी कपाळावरच ठिपका का पाडावा ? अशी शंका सहजच तुमच्या मनात येईल; पण आपल्या इतर अवयवांपेक्षा सामान्यतः कपाळाचे तपमान हे स्थिर असते.

तेव्हा असा प्रकाश कपाळावर टाकल्यानंतर प्रथम ती व्यक्ती निश्चल असते. पण थोड्याच वेळात ती व्यक्ती ' नको नको ' असे म्हणत उठण्याचा प्रयत्न करू लागते. त्यावेळी दुःखाची तीव्रता, व वेळेची नोंद **' डोलोरो मीटर '** या यंत्रावर नोंदवली जाते. ' डोलोर' हा लॅटिन शब्द आहे. त्याचा अर्थ दुःख असा होतो. यावरून त्या यंत्राला ' डोलोरोमीटर ' हे नाव दिले आहे.

या प्रयोगात असे आढळले की ठराविक मर्यादेपर्यंत दुःखाचा अनुभव येत नाही. पण ११३° तपमानाला त्याची जाणीव होते. एरवी ते तपमान ९८° इतके असते. पोट दुखणे, खरचटणे, प्रसूतीवेदना इ. वेदनांचा देखील त्यांनी अभ्यास केला. आता ' ज्याचं दुःख त्यालाच ठाऊक ' असं म्हणता येणार नाही, नाही का? एखाद्याच्या वेदना किती क्लेषकारक आहेत हे डोलोरोमीटर तुम्हाला लगेच दाखवेल. इतकेच नव्हे तर एखाद्या अत्यंत आजारी रुग्णाला विचारण्या अगोदरच डॉक्टर त्याचे दुःख, वेदना किती दुःखांक आहे हे समजू शकतील. व दुःखाची तीव्रताही त्यांना डोलारोमीटरमुळे समजू शकेल. आणि त्यामुळे रोग्याच्या वेदना कमी करण्यास या यंत्राचा चांगला उपयोग होईल.

तेंव्हा आजच्या या यंत्रयुगातील ' दुःखमापक यंत्राचा शोध म्हणजे एक वरदानच नव्हे का ?

# मी आणि टेबलटेनिस

**सुजाता बापट**
तृ. व. शास्त्र

तो दिवसच मुळी खूप उत्साहाचा होता. आसाममध्ये गोहत्ती येथे भरविण्यात आलेल्या शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा महाराष्ट्र विरुद्ध आसाम हा अंतिम-फेरीचा सामना सुरू होण्याला थोडाच अवधी बाकी होता. स्टेडियम खच्चून भरलेले होते. खुद्द आसामचे मुख्यमंत्री चीफ गेस्ट म्हणून हजर होते. दोन्ही संघांतील टेबलटेनिस खेळाडूंची ओळख करून देण्यात आली. माझ्याकडे संघाचे नेतृत्व असल्याने थोड्या दडपणाखालीच मॅच सुरू झाली; पण यशाचे पारडे पहिल्यापासूनच महाराष्ट्राकडे झुकू लागले. आसामचा संघ पराभूत होणार हे स्पष्टच झाल्याने शेवटचा खेळ चालू होतो न होतो तोच आसामच्या प्रेक्षकांनी प्रचंड गोंधळ केला. पहिल्यांदा खुर्च्यांची फेकाफेकी, मग दगड, काचा आम्हाला मारायला सुरुवात केली. सोडावॉटरची बाटली तर माझ्यासमोरच फुटली. प्रेक्षकांमधील क्रीडारसिकताच लुप्त झाली. आत्तापर्यंत 'दंगल' हा शब्द ऐकून असलेल्या मला आसाममध्ये प्रत्ययाला आला. हा सर्वच अनुभव मला खूप शिकवून गेला.

मुळात खेळ खेळावा खिलाडूवृत्तीसाठी, त्यातून मिळणाऱ्या आनंदासाठी आणि व्यायामासाठीही. परंतु विद्यार्थी जसा परीक्षार्थी बनतो तसा खेळाडूदेखील फक्त स्पर्धक बनतो. मीही त्यातलीच एक. टेबलटेनिस हा फारसा लोकप्रिय खेळ नव्हे; पण माझा आवडता म्हणून खेळायला लागले. आवड जोपासण्याची व वाढवायची पण संधी मिळाली. मग मी नकळतच रोज सराव करू लागले. स्पर्धांत भाग घेतला. शाळेच्या आणि खुल्या स्पर्धांत सतत चार वर्षे विजेतेपदाची मानकरी ठरले. मग आकांक्षा आणि स्पर्धेच्या कक्षाही रुंदावत गेल्या. राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड झाली. अर्थात खूप कष्टही घ्यावे लागले कारण इथेही सर्वच क्षेत्रांप्रमाणे जीवघेणी स्पर्धा असते. कष्टाचं चीजही झाले. अनेक सुवर्णपदके मिळाली. बंगलोरच्या खुल्या आंतरराज्य स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी आमचा महाराष्ट्र संघ ठरला. वृत्तपत्रांनी भरभरून कौतुक आणि प्रसिद्धी दिली. सत्कारही करण्यात आला.

मग ज्युनियर आंतरराष्ट्रीय स्पर्धा (सेऊल) च्या तयारीसाठी एक कोचिंग कॅम्प पतियाळा येथे राष्ट्रीय क्रीडा संस्थेत घेण्यात आला. भारतातल्या दहा मुला-मुलींची निवड केली गेली व त्यातून भारताचा संघ निवडण्यात आला. ती माझी संधी जरी गेली तरी पण या कोचिंग कॅम्पमध्ये कोरियन कोच पाक् यू गील यांनी तंत्रशुद्ध खेळायला शिकवले. पहाटे पाचपासून रात्री आठपर्यंत रनिंग, ३००० दोरीच्या उड्या इतर शारीरिक व्यायाम व टेबलवरची प्रॅक्टिस यात सर्व वेळ जात असे. कोरियन व चायनीज खेळाडू हे आंतरराष्ट्रीय स्पर्धात अग्रगण्य असतात. त्यांचे तंत्र फारच आधुनिक असून शारीरिक व्यायामावर त्यांचा भर जास्त असतो. मला त्या तंत्राचे आकर्षण वाटले. चायनीज खेळाडूंची या क्षेत्रातील मक्तेदारी जर मोडून काढायची असेल तर किती कष्टांची गरज आहे याची जाणीव झाली.

तेव्हाचे दिवस फारच धामधुमीचे होते. श्रीनगर ते केरळ एवढा प्रवास झाला. अभ्यासही करायला हवा होता; पण मनाचा गोंधळ कधीच झाला नाही. खेळ आणि अभ्यास अशी सांगड घालावीच लागली. परंतु त्यामुळे मला 'मे' हा खास दंगा करण्याचा महिना, पण अभ्यास करावा लागला. मैत्रिणींबरोबर एखाद्या हॉटेलात बसून कॉफी पीत गप्पा मारायचा मोह टाळावा लागला. या खेळाच्या प्रेमाखातर खूप गोष्टी करायच्या राहिल्या. सतार शिकायची होती, गाणं वाढवायचं होतं, एका ना दोन, अशा अनेक मोहांना विसरावं लागलं. ह्याच अजिबात वाईट वाटत नाही, कारण खेळाने मला जिद्द दिली, आत्मविश्वास दिला, जयाबरोबरच पराजयही सहन करण्याची ताकद दिली. म्हणूनच खेळ आणि त्यामुळे आलेल्या रंगीबेरंगी अनुभवांचा उपयोग मला पुढील आयुष्यात कोणताही मार्ग चोखाळायला होईल, हे खचित.

# अर्भक मृत्यू – सामाजिक समस्या

**कांचन झाडबुके**
एम्. ए. भाग – २

मृत्यू होणे ही केंव्हाही दुःखद बाब आहे; परंतु मृत्यू कोणत्या वयात होतो त्यावर त्याचे सामाजिक व आर्थिक परिणाम अवलंबून असतात. वेगवेगळ्या वयोगटांत होणारे मृत्यू हे भिन्न कारणांमुळे होतात. वैद्यकीय भूगोलाच्या दृष्टीने या लेखात अर्भक मृत्यूची कारणे व त्याचे होणारे परिणाम, तसेच अर्भक मृत्यू टाळण्यासाठी उपाययोजना यांचा विचार केला आहे.

एका वर्षाच्या आतील मुलास Infant असे म्हणतात. Infant Mortality किंवा अर्भक मृत्यू म्हणजे दरवर्षी जन्मणाऱ्या एकूण मुलांपैकी एका वर्षाच्या आतील मुलांचे मृत्यू.

आज समाजात अर्भक मृत्यू ही मोठी समस्या आहे. अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त असते तेंव्हा कुटुंबनियोजनात कमी यश येते. अर्भक मृत्यूचे प्रमाण विकसित देशात दरहजारी २० पेक्षा कमी. उदा. जपानमध्ये ते दरहजारी ८ ( १९७९ मध्ये ) तर अविकसित आणि विकसनशील देशात उदा. भारतात १९७८ मध्ये दर हजारी १२५ होते. अशा अविकसित आणि विकसनशील देशांत प्रामुख्याने मोठे कुटुंब आढळते. कुटुंबाचा आकार मोठा असल्याने दरडोई उत्पन्न कमी असते. गरिबीमुळे मुलांच्या अन्न, वस्त्र व आरोग्य ह्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. ही गरीब कुटुंबे लहान खोल्यांमधून अथवा गलिच्छ वस्त्यांत रहातात. अशा ठिकाणी आरोग्याला विघातक वातावरण आणि वैद्यकीय सेवेचा अभाव दिसतो. पुरेसा व योग्य प्रमाणात आहार न मिळाल्याने मुले कुपोषण, क्षय यासारख्या रोगांनी ग्रस्त होतात. आजारपणात वेळच्यावेळी उपचार न झाल्याने मुले मृत्युमुखी पडतात. अशा तऱ्हेने एक दुष्ट चक्र सुरू होते.

लोकसंख्येचा अभ्यास करताना अर्भक मृत्यूला महत्त्व देण्याचे कारण म्हणजे लोकसंख्येच्या एकूण मृत्युसंख्येपैकी अर्भक मृत्युसंख्येचे प्रमाण खूप आहे. अर्भकांचे मृत्यू ज्या विशिष्ट कारणांनी होतात ती कारणे सहसा प्रौढ किंवा तरुणांच्या मृत्यूबाबत आढळत नाहीत. अर्भकांचे मृत्यू होणे ही देशाची हानी आहे. कारण अर्भके ही भावी पिढीतील अर्थार्जन करणाऱ्या व्यक्ती असून त्यांच्या कामगिरीवरच देशाची प्रगती अवलंबून असते.

काही विशिष्ट कारणांमुळे अर्भकांचे मृत्यू होतात. ती खालीलप्रमाणे होत :– १. वैद्यकीय कारणे २. जैविक कारणे ३. सामाजिक व आर्थिक कारणे.

१) वैद्यकीय कारणे – बाळ जन्मल्यापासून एक महिन्याचे होईपर्यंतचा जो काळ त्याला Neonatal Period असे म्हणतात. या काळात होणारे अर्भक मृत्यू खालील कारणांमुळे होतात: १. अपुऱ्या दिवसाची मुले. २. जन्म होताना इजा किंवा जखम होणे. ३. गुदमरणे. ४. जन्मतः असणाऱ्या विकृती. ५. रक्ताच्या संबंधित आजार. ६. पोटाचे विकार उदा. जुलाब. ७. श्वसन संस्थेशी संबंधित संसर्गजन्य रोग. ८. नाळेचे ( Plecenta ) रोग. अर्भक मृत्यूतील ४५ टक्के मृत्यू या काळात होतात. या ४५ टक्क्यातील ९० टक्के पहिल्या आठवड्यात होतात.

बाळ एक महिन्याचे झाल्यावर १२ महिने पूर्ण होईपर्यंतचा काळ म्हणजे Post Neonatal Period होय. या काळात ज्या कारणांमुळे अर्भकांचे मृत्यू होतात ती आपण टाळू शकतो किंवा त्यावर नियंत्रण आणू शकतो. ती कारणे खालीलप्रमाणे :–

१. जुलाब व अतिसार २. श्वसनसंस्थेशी संबंधित संसर्गजन्य रोग. ३. इतर संसर्गजन्य रोग. – उदा. न्युमोनिया, क्षय, डांग्या खोकला. ४. कुपोषण. ५. अपघात. ६. जन्मजात शारीरिक विकृती. ५५ टक्के अर्भक मृत्यू हे Post Neonatal Period मध्ये होतात.

२) जैविक कारणांचा विचार करता खालील गोष्टींचा अर्भक मृत्यूशी संबंध आहे.

१. कमी वजनाची मुले – २ किलोपेक्षा कमी वजन असलेल्या अर्भकांचे मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते.

२. आईचे वय व अर्भक मृत्यू यांचा जवळचा संबंध आहे. पहिल्या प्रसूतीच्या वेळेस आईचे वय २० पेक्षा कमी असेल तर तिची शारीरिक व मानसिक वाढ

पूर्ण झालेली नसते. जर तिचे वय ३० पेक्षा जास्त असेल तर स्नायूंच्या ताठरपणामुळे नॉर्मल डिलिव्हरी होणे शक्य नसते.

आईचे वय – वर्षे

३. कुटुंबाचा आकार – मोठ्या कुटुंबात अर्भक मृत्यूचे प्रमाण छोट्या कुटुंबाच्या तुलनेने अधिक असते. पहिल्या मुलाच्या वेळी अर्भकमृत्यूची भीती दुसऱ्या मुलापेक्षा जास्त असते आणि तिसऱ्या मुलानंतर हा धोका वाढत जातो. दोन मुलांमध्ये अंतर कमी असले तर हा धोका वाढत जातो. मोठ्या कुटुंबात बाळाची काळजी योग्य रीतीने घेतली जात नाही.

४. एका बाळापेक्षा (Single birth) जुळ्या किंवा तिळ्या बाळांमध्ये मृत्यू होण्याची शक्यता अधिक असते.

५. प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रात मोठा प्रजोत्पादन काळ किंवा High Fertility असल्याने बाळंतपणे जास्त होण्याची शक्यता व त्याबरोबरच अर्भकमृत्यू होण्याची शक्यता वाढत जाते.

६. प्रसूतीच्या वेळेस मातेचे वजन जर ४२ कि. ग्रॅ. पेक्षा कमी असेल व उंची १४५ सेंमी. पेक्षा कमी असेल तर सुलभ प्रसूती होणे अवघड असते.

७. मातेच्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण ८.५ पेक्षा कमी असेल तर रक्तक्षयामुळे बाळ कोणत्याही आजाराला सहज बळी पडू शकते.

८. जर आईचा रक्तगट Rh निगेटीव्ह आणि वडिलांचा रक्तगट Rh पॉझिटीव्ह असेल तर दुसऱ्या प्रसूतीच्या वेळेस बाळाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

(३) आर्थिक कारणांचा विचार करता ९० टक्के अर्भकमृत्यू गरीब कुटुंबात आढळतात. गरीब कुटुंबात रहाणीमानाचा दर्जा खालच्या पातळीचा असतो व दरडोई उत्पन्न कमी असते. कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर आहार, वैद्यकीय मदत, बाळाची काळजी ह्या गोष्टी अवलंबून असतात. गरीब कुटुंबात मुलांना कुपोषणामुळे मुडदूस, बेरीबेरी हे रोग होऊ शकतात. कित्येक वेळेस आजारी माता हे बाळाच्या आजाराचे कारण असल्याने औषधोपचाराचा बाळावर परिणाम होऊ शकत नाही.

सांस्कृतिक व सामाजिक कारणे –

१. भारतात अर्भकमृत्यूचे प्रमाण ख्रिश्चन लोकांत सर्वात कमी तर हिंदू व मुस्लिम लोकांत अधिक असते. निरक्षर कुटुंबात साक्षर कुटुंबाच्या मानाने अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक असलेले दिसते. प्रत्येक जातीतील रहाणीमान, स्वच्छतेच्या सवयी, जेवण व पोशाखाच्या पद्धती व बाळाची घेतली जाणारी काळजी यांच्या भिन्नतेमुळे अर्भकमृत्यूचे प्रमाण जातीपरत्वे कमी जास्त असलेले दिसते.

२. पालकांचे अज्ञान व गैरसमजूत यामुळे बाळाची काळजी योग्य रीतीने न घेतल्यामुळे अर्भकांचे मृत्यू होऊ शकतात.

३. लग्नानंतर एक किंवा दोन मुले झाल्यानंतर घटस्फोट घेतलेल्या कुटुंबात मानसिक दबाव, आर्थिक ताण यामुळे अर्भकमृत्यूचे प्रमाण वाढलेले दिसते.

४. आपल्या समाजात मुलगी होणे ही काही आनंददायी बाब समजली जात नाही. त्यामुळेच आजारपणाच्या काळातदेखील तिच्या प्रकृतीची हेळसांड होते. परंतु निसर्गतःच मुलींमध्ये रोगप्रतिकारक शक्ती मुलांपेक्षा अधिक असल्याने मुली जगू शकतात. त्यामुळेच मुलींपेक्षा मुलांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त दिसते.

५ अनौरस किंवा अनाथ बालकांकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच समाजातील वाईट सवयी उदा. विकसित राष्ट्रात बायकांनी सतत धूम्रपान किंवा मद्यपान करणे अर्भकमृत्युला कारणीभूत होतात.

बाळ जन्मल्यानंतर त्याच्या नाळेला शेण लावण्यामुळे धनुर्वात होऊन बाळ मृत्यूमुखी पडते. अशास्त्रीय खाण्यापिण्याच्या सवयी, लवकर स्तनपान बंद करणे यामुळेसुद्धा बाळाला आजार होऊ शकतात.

६. विकसनशील व अविकसित देशांत बहुतांशी प्रसूती घरी होतात. अशा वेळी सहज उपलब्ध होणारी दाई निरक्षर, प्रसूती व आरोग्याचे विशेष ज्ञान नसलेली असल्याने तिचे सहाय्य धोकादायक असते. प्रसूतीच्या वेळेस निर्जंतुक न केलेल्या साधनाचा वापर केल्याने धनुर्वाताचा धोका निर्माण होतो.

७. दूषित पर्यावरण, स्वच्छतेचा अभाव, सांडपाण्याच्या सोयीचा अभाव तसेच पिण्याच्या पाण्याच्या सोयीचा अभाव या गोष्टीसुद्धा अर्भकमृत्यूस कारणीभूत होतात.

एकूण अर्भकमृत्यूंपैकी १५ टक्के बाळाची वाढ पूर्ण न झाल्यामुळे, ३० टक्के अतिसार जुलाब, १५ टक्के श्वसनसंस्थेशी संबंधित आजार, १० टक्के गुदमरणे, १० टक्के कुपोषण व उरलेले २० टक्के अर्भकमृत्यू

इतर कारणांमुळे होतात.

अर्भकमृत्यूचे परिणाम – अर्भकमृत्यूमुळे आयुर्मर्यादा कमी होते. आईच्या शारीरिक व मानसिक प्रकृतीला अपाय होतो. अर्भकमृत्यूमुळे पालकांनी बाळासाठी खर्च केलेला वेळ, पैसा व प्रेम या गोष्टी वाया जातात.

जगात गेल्या ५० ते ६० वर्षात रहाणीमानात सुधारणा, संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण, वैद्यकीय सोयी या कारणांमुळे अनेक मृत्यूंचे प्रमाण कमी होत आहे. भारताचा विचार करता १९७८ मध्ये अर्भक मृत्यूचे प्रमाण दर हजारी १२५ होते, त्यापैकी शहरात ते दर हजारी ७० आणि खेड्यांमध्ये दरहजारी १३६ होते.

औद्योगीकरण व कारखान्यांची वाढ यामुळे गलिच्छ वस्त्यांची वाढ, पाणी व हवा यांचे प्रदूषण, संसर्गजन्य रोगांचा प्रसार उदा. क्षय व अपघात या कारणांमुळे अर्भक मृत्यू होतात. पुणे शहरातील अभ्यासात असे आढळले की अर्भक मृत्यूचे प्रमाण झोपडपट्ट्यांत १५० (दरहजारी) पर्यंत जाते तर सुशिक्षित, सुखवस्तू कुटुंबे असलेल्या उदा. सदाशिव पेठ, डेक्कन जिमखाना व कँप विभाग येथे कमी आहे.

अर्भक मृत्यूचे प्रमाण आपल्याला जर कमी करावयाचे असेल किंवा अर्भक मृत्यू टाळावयाचे असतील तर खालील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

१. सर्वात प्रथम लग्नानंतर मातेची शारीरिक व मानसिक तसेच पित्याची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन मगच मूल जन्माला घालावे. व त्यानंतर त्याचे शास्त्रीय दृष्टिकोनातून संगोपन करावे. बाळाचे संगोपन कसे करावे याबद्दल माहिती देणारी पुस्तके हल्ली बाजारात उपलब्ध आहेत.

२. गरोदरपणात मातेने सकस व समतोल आहार घेणे तसेच धनुर्वात विरोधी लस टोचून घेणे आवश्यक आहे.

३. कुटुंब नियोजनाला आपल्या देशाच्या पंचवार्षिक योजनेत फार महत्त्व दिले आहे. वेगवेगळ्या साधनांचा वापर करून कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

४. मुलांना संसर्गजन्य रोगांपासून वाचविण्यासाठी क्षय, डांग्या खोकला, घटसर्प, धनुर्वात, गोवर व पोलिओ विरोधी लस टोचणे आवश्यक आहे.

५. जुलाब व अतिसार हे अर्भक मृत्यूचे कारण नसून शरीरात निर्माण होणारी पाण्याची व क्षाराची कमतरता (dehydration) हे होय. बाळाला योग्य प्रमाणात मीठ व साखर घातलेले पाणी पाजून ही कमतरता भरून काढता येते.

६. विकास तक्त्याचा उपयोग करून बाळाच्या वजनावर नजर ठेवता येते व त्याला कुपोषणापासून वाचविता येते.

७. स्तनपान हे आरोग्यवर्धक आणि पोषक असते तसेच त्याची रोग प्रतिबंधक शक्ती इतर कोणाच्याही दुधापेक्षा अधिक असते. यामुळे स्तनपान केव्हाही योग्यच. बाळाला बाटलीने दूध पाजणे टाळावे.

८. रहाणीमानात सुधारणा, सकस आहार, स्वच्छ हवेशीर घर, सांडपाण्याच्या तसेच पिण्याच्या पाण्याच्या सोयी, कीटक प्रतिबंध, आरोग्याचे ज्ञान या गोष्टी प्रत्येक कुटुंबाला मिळणे आवश्यक आहे. तसेच विवाहाचे वय वाढविणे, कुटुंब नियोजन कार्यक्रम यांची आवश्यता आहे.

कित्येकांना असे वाटेल की अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी झाले तर देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढेल पण जेव्हा आपली होणारी मुले जिवंत रहातील असा विश्वास जनतेत निर्माण होईल तेव्हाच लोक कुटुंब नियोजनाकडे वळतील.

*With Best Compliments*

**UNIVERSAL BOOK SERVICE**

27, Budhwar Peth, PUNE–411 002 : Phone : 35188

**Suppliers of Educational & Technical Books**

# एका लघुउद्योजकाची मुलाखत

**मकरंद कुलकर्णी**
तृ. व. शास्त्र

आजच्या काळात Bussiness वर्तुळात येणाऱ्यांची आणि यशस्वी होणाऱ्यांची संख्या वाढत आहे. या गोष्टीचे सर्वांप्रमाणेच आपल्यालाही कुतूहल असेलच. तेव्हा याचे ' रहस्य ' काय ? हे आपल्याच महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी विश्वेश कुलकर्णी यांच्याकडून थोडक्यात जाणून घेऊ. यांची राजूरी तालुका पुरंदर येथे ' महाराष्ट्र केमिकल कॉर्पोरेशन ' नावाची ब्लिचिंग पावडरची फॅक्टरी आहे.

प्रश्न– व्यवसायात पडावं असं तुला कधी, का व कसं वाटलं ?

उत्तर– खरं म्हणजे व्यवसाय आपण का करावा हे कळलंच नाही. त्याचं असं झालं की, आपल्याला नोकरी मिळेल का नाही ही शंका होती, त्यातच ' कमलेश दवे ' सारखा मार्गदर्शक मित्र भेटला, ज्यानी आयुष्यात स्वतः काहीतरी करण्याची प्रेरणा दिली. निरंजन परदेशींनी उडी मारायला शिकवली. बस ! पाण्यात पडलं की आपोआप पोहता येतं, तसा व्यवसायात पडलो, पूर्ण जिद्दीने प्रचंड आत्मविश्वासाने.

प्रश्न– व्यावसायिक क्षेत्रात पदार्पण करताना कोणत्या स्वरुपाच्या अडचणी आल्या ?

उत्तर– व्यावसायिक क्षेत्रात पडायचं ठरलं की पहिली अडचण म्हणजे व्यवसायाचे स्वरुप, बाजारपेठ, जागा आणि मुख्य म्हणजे पैसा !

प्रश्न– त्यावर तू मात कशी केलीस ?

उत्तर– ह्याबाबतीत बरेचसे श्रेय आपल्या महाविद्यालयाला जाते. उदा. माझा वर्गमित्र व आपला माजी विद्यार्थी ' धनंजय साने ' ह्याने मला Product दिला व त्या अनुषंगाने सर्व मदत केली. जागेबाबतही आपला विद्यार्थी व माझा मित्र ' विजय भगत ' ह्याने स्वतःच्या गावी जागा देऊन सक्रीय मदत केली. आता राहिला पैसा, तो महावित्त व बँकेकडून मिळवला. ह्यात देखील आपल्या कॉलेजचा माजी विद्यार्थी 'हेमंत बर्गे ' व त्याच्या मोठ्या भावाचे अमोल मार्गदर्शन मला लाभले. म्हणूनच या सर्व अडचणींवर मी यशस्वी मात करू शकलो. एवढंच नाही तर आज माझा संपूर्ण व्यवसाय सांभाळणारा आपला कॉलेजचा माजी विद्यार्थी ' पवार ' हा आहे.

प्रश्न– मालासाठी बाजारपेठ, स्पर्धा, दर्जा ह्या बाबतीत काय केले ?

उत्तर– आपण उत्पादन करत असलेल्या मालाची संपूर्ण प्रक्रिया व सखोल ज्ञान आधी मिळवले. बाजारपेठेचा आभ्यास करून, बाजारपेठेत आपल्या मालाबद्दल विश्वास निर्माण केला व दर्जा सतत चांगला राहील ह्यासाठी वेगवेगळ्या चाचण्या घेतल्या. ह्या तिन्ही गोष्टींवर मी सतत लक्ष ठेवतो.

प्रश्न– व्यवसायासाठी सरकारी मार्गदर्शन, मदत कोणत्या कोणत्या स्वरुपाची असते ? तुला वैयक्तिक काय अनुभव आला ?

उत्तर– खरोखरीच ज्यांना व्यवसाय काढावयाचा आहे अशा कोणालाही व्यवसायासाठी तसे सरकारचे मार्गदर्शन मिळत नाही. व्यवसायासाठी महावित्त ७५% ते ८०% कर्ज देते. तसेच सुशिक्षित बेरोजगार योजनेखाली १०% ते १५% बीज भांडवल मिळते. M.S.S.I.D.C. कडून बाजारपेठेसंबंधी सक्रिय मार्गदर्शन मिळते.

प्रश्न– तू स्वतः खेडेगावात जाऊन फॅक्टरी सुरू केली आहेस, तेव्हा लोकांनी खेडेगावात उद्योग न्यावेत ह्यासाठी सरकारी योजना राबविल्या जात आहेत. ह्या संदर्भात काही माहिती देऊ शकशील का ?

उत्तर– सरकारच्या सर्व योजना अत्यंत कमकुवत आहेत. त्या कागदोपत्री जरी चांगल्या असल्या तरीही प्रत्यक्षात खेडेगावातील विचित्र अनुभव, मालाची ने–आण, देखरेख ह्या गोष्टींचा विचार केला तर दळणवळणाची कमी साधने, केंद्रित बाजारपेठ ह्यामुळे बरेच व्यावसायिक फसतात.

प्रश्न– व्यवसायात पडताना तुझ्या भावना काय होत्या ?

उत्तर– व्यवसायात पडताना प्रत्येकालाच आपण टाटा बिर्ला, व्हावं असं वाटतं, तेव्हा मलाही तसंच वाटलं. तसेच आपल्या मित्रमैत्रिणीत एक आदरणीय व्हावं असंही वाटलं होतं.

प्रश्न– मग आता काय वाटतंय ?

उत्तर– व्यवसायाच्या फेऱ्यात आता असा अडकलोय की वरील सर्व भावना मागे पडल्या आहेत. आपण काहीतरी निर्माण केलंय व आपल्याला त्यात प्रगती करायची आहे, एवढी एकच भावना शिल्लक राहिली आहे.

प्रश्न– ह्या शिवाय तू आणखी काही....

उत्तर– ह्या शिवाय मी पुण्यात लोकमान्यनगरमध्ये 'यशस्वी पर्सोनल सर्व्हिसेस' ह्या नावाचे नोकरी मार्गदर्शन केंद्र सुरू केलं आहे. ज्यामधून सर्व थरांतील, कोणत्याही वयातील, लोकांना मार्गदर्शन करतो. ह्याशिवाय 'यशस्वी इंडस्ट्रियल कन्सलटन्सी' मधून प्रोजेक्ट रिपोर्ट, कर्ज मंजूरी, बाजारपेठेसंबंधी सविस्तर मार्गदर्शन करतो.

प्रश्न– आता एक शेवटचा प्रश्न. व्यवसायात पडू इच्छिणाऱ्या तरुणांना कोणते मार्गदर्शन करशील ?

उत्तर– तसा व्यवसायात माझा अनुभव छोटा आहे. तरी सुद्धा अशा तरुणांना सांगू इच्छितो की, व्यवसायात पडताना अंगात जिद्द, आत्मविश्वास व सहनशक्ती न गमविण्याची तयारी अंगी बाणविली पाहिजे. आपण करणार असलेल्या मालाबाबत आपणास संपूर्ण माहिती पाहिजे. दर्जा नियंत्रण हे अत्यंत काटेकोरपणे पाळले पाहिजे. बाजारपेठेतील चढाओढ व हालचालींवर सतत लक्ष ठेवले पाहिजे व योग्य मार्गदर्शन घेतले पाहिजे, तरच व्यवसायात यश लाभू शकते.

---

## 'देवाशपथ'

शशी वाघ
एम्. ए. ( मानसशास्त्र ) प्रथम वर्ष.

भाषणांचा सूर ज्यांना गवसला
त्यांनाच राजकारण गाता आलं
आणि, इथल्या रसिकांनाही
नेमकं तेच रुचलं
पण बऱ्याच उशिरा कळलं
यात कोणताच सूर नव्हता
पण येथपर्यंत–
बक्षिस समारंभही आटोपला होता.
–तरीही एकवार फेरविचार घेऊन
परिक्षकांनी निर्णय बदलला
तेव्हा, इथले पुतळेही ओरडले . . .
देवाशपथ, यातलं एकही तत्त्व आमचं नव्हतं !

# साथ हवी मज नृत्याची

**जयश्री पाटणकर**
प्र. व. शास्त्र

मध्यंतरी दूरदर्शनवर श्रीमती रोहिणी भाटे यांची मुलाखत झाली. थोडेच दिवसांनी पुण्यामध्ये त्यांचा कार्यक्रम झाला. त्यानंतर माझी पहिली प्रतिक्रिया काय झाली असेल तर ती ही की, नृत्य ही आपली करियर करावयाचा विचार देखील मनात आणावयाचा नाही अशी मी मनाशी पक्की निरगाठ बांधून ठेवली. त्याच दिवशी कशाला, प्रत्येक कार्यक्रमानंतर ही निरगाठ अधिकच पक्की होत आहे.

मी जेव्हा नृत्य शिकावयास सुरुवात केली तेंव्हा माझा नृत्याकडे फार कल होता किंवा मला त्याची भलतीच आवड होती अशातला कुठलाही भाग नव्हता. घरीच माझी मामी ( सौ. शरदिनी गोळे ) नृत्याचे वर्ग घेते. त्यामुळे मी देखील नृत्य शिकू लागले. त्यानंतर बरेच दिवसांनी मला त्यात गोडी वाटू लागली. दोन–तीनदा नृत्याच्या स्पर्धांमध्ये मी पहिला दुसरा क्रमांक मिळविला. त्यावरच मी हुरळून गेले आणि ठरवून टाकलं की, नृत्य हीच माझी करियर निवडणार. जे कलाकार म्हणूनच जन्माला येतात त्यांना स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षीस मिळवावं लागतच नाही; पण ते कळण्याचं त्यावेळी माझं वय नव्हतं. आता मात्र हा विचार किती बालिश आहे हे मला पूर्ण कळलं आहे.

कुठलीही कला असो, त्यामध्ये जसं खोल जावं तशी ती गोष्ट आपल्यासारख्याचं काम नव्हे, याचीच जाणीव अधिक बळावते. ती आत्मसात करण्यासाठी स्वतःची ओरिजिनॅलिटी लागते, प्रतिभा असावी लागते. गुरूंनी शिकवलं, आपण तंतोतंत करून दाखविलं, गंधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा दिल्या यावर आपण खूश असलो तरी लोक खूश नसतात. कारण प्रेक्षकांचं मनोरंजन करण्याची पात्रता आपल्यात असावी लागते. पाठांतर करून, पेपर लिहून मार्क मिळविण्याएवढी ती सोपी गोष्ट नसते. ' नृत्य विशारद ' या पदवीपेक्षा नृत्य येण्याला अधिक किंमत असते. कलाकार होण्यासाठी जितकी मेहनत लागते, तितक्याच अनेक गोष्टी उपजत याव्या लागतात. नृत्यामध्ये ग्रेस घेतली तर आपल्या गुरूंचे संस्कार आपल्यावर नक्की होतात. तुम्ही एका ठराविक लेव्हलपर्यंत नक्की पोहोचू शकता; परंतु त्या लेव्हलच्या पुढे जाण्यासाठी तुम्ही नॅचरली ग्रेसफुल असावे लागते. शिकविलेली गोष्ट सुंदर करता आली तरी वेगवेगळी कॉंबिनेशन्स सुचणं हे प्रतिभेचंच काम असतं. नृत्यामध्ये अभिनय, लय, साहित्य, गाणं, वक्तृत्व या सर्वांचीच चांगली समज असावी लागते. अभिनय करताना ठुमरी, दोहा, भजन या सर्वांचाच अर्थ समजावा लागतो; पण माझं दुर्दैवं असं की, ' बाळाचे पाय पाळण्यात दिसतात. '

पं. बिरजूमहाराज हे कथ्थक सम्राट; परंतु ते तबला पखावज, पेटी उत्तम वाजवतात. रंगतदार गातात. अनेक बंदिशी स्वतः रचतात. श्रीमती रोहिणी भाटे देखील लेखिका, कवयित्री, गायिका आहेत. नृत्याबद्दल तर ' पूछो मत ' आणि या सर्वांमुळेच कलाकार म्हणून त्यांची योग्यता फार मोठी आहे.

' या सर्व कलांची आवड असणारी मी ' ही माझी एकच क्वॉलिफिकेशन असताना मी अजून नृत्य का करते हा प्रश्न अनेक वेळा माझ्या मनात आला आहे. शिकत असताना एखादी गोष्ट मला जमली नाही तर मला इतकं वाईट का वाटतं ? कुणाचीही रंगलेली मैफल पाहून मला रडू का येतं ? कारण माझं नृत्यावर मनापासून प्रेम आहे. ( असं प्रेम Chemistry वर असतं तर ) नृत्यच कशाला गायन, वादन, साहित्य या सर्वच कलांबद्दल मला आकर्षण आहे. म्हणूनच ९९ टक्के **परस्पिरेशन** करण्याची माझी तयारी आहे. यासाठीच ' नृत्य ही माझी करियर होणार असेल तरच मी पुढे नृत्य शिकावं असं मला वाटत नाही. कुठलीही कला असो, ती शिकण्यामागे नामवंत कलाकार व्हावं एवढाच उद्देश का असावा ? मला नृत्य करण्यातून आनंद मिळतो म्हणून मी नृत्य करते.

नृत्याने खरोखरच माझ्या आनंदात भरपूर भर टाकली आहे. नृत्याच्या कार्यक्रमांच्यावेळी कानावर पडणाऱ्या तबल्याने मिला मोहात पाडलं. पुण्यातील सवाई गंधर्व उत्सवास नृत्याच्याच निमित्ताने मी जात असे. तिथे मला नृत्याबरोबर गायन, वादन यातही

गोडी लागली. रात्रीची रंगलेली मैफल हवीहवीशी वाटू लागली.

माझ्या आवडी-निवडी देखील फार बदलल्या. पहिल्यांदा मला गाणं बिलकूल आवडत नसे आणि आता 'सवाई गंधर्व उत्सव' जवळ आला आहे याची देखील मला धुंदी चढते. सिनेसंगीतापेक्षा शास्त्रोक्त संगीत आवडू लागलं. सिनेसंगीत काय, भावगीत काय, ती गाणी एकदोनदा ऐकण्यास बरी वाटतात; पण एकदा त्यातील नावीन्य संपलं, आपल्याला त्यातील ठराविक जागा माहीत झाल्या किंवा एकापुढे एक काय आहे ते कळलं की, त्यात फारशी उत्सुकता वाटत नाही. उलट शास्त्रीय संगीतात कल्पकतेला, नावीन्याला इतका वाव असतो की, वसंतरावांचं आजचं गाणं आणि उद्याचं गाणं यात तेवढीच टवटवी असते. त्यात विविधता असते म्हणून ते ॲप्रिशिएट होतं. एकावेळी २७ चक्कर मारून लोकांवर इंप्रेशन पाडणाऱ्या गोपीकृष्णाचेच नृत्य मला आवडे. आता मात्र माझ्याच आवडीची मला कमाल वाटते. लहान असताना नृत्य करताना माझी मामी मला नेहमी सांगे, 'अगं, चेहरा हसरा ठेव.' आता मात्र चेहरा आपोआपच मनातलं बोलतो.

किती तरी लोकांचा असा गोड गैरसमज आहे की, नृत्य काय, गाणं काय, चार पाच वर्षं तुम्ही त्यावर घालवली की, तुम्हाला या कला सहज साध्य होण्यासारख्या आहेत. त्याला फारशी हुशारी लागत नाही. हे लोक खरोखरच सुखी आहेत. ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केल्याशिवाय आपलं अज्ञान केवढं विशाल आहे हे कळावयास काय मार्ग ? थोडीशी इकडे वाट वाकडी केली तर त्यांच्यावरही माझ्यासारखीच झुरण्याची पाळी येईल. अजून मी नृत्य नेटाने शिकत असल्याने माझं अज्ञान 'क्षणोक्षणी अधिकची उघडे' अशी वेळ आहे. सुखद गोष्ट एवढीच आहे की, मी आता 'अंड्यातलं पिल्लू' राहिलेली नाही.

सर्वच कलांबद्दल मला आकर्षण असताना मी शास्त्र शाखा कशी निवडली याचं इतरांना आश्चर्य वाटत असलं,- तरी मला आता वाटत नाही. त्यावेळी काही फार विचार करून मी शास्त्र निवडल नव्हतं; पण आता मात्र नक्की असं वाटतं की, शास्त्र आणि कला यांचा छत्तीसाचा आकडा मानणं म्हणजेच वेडेपणा आहे. या सर्वच कलांवर इलेक्ट्रॉनिक्सचे केवढेतरी उपकार आहेत. टी. व्ही., सिनेमा, व्हिडिओ यामुळेच तर नृत्याला संधी निर्माण झाली आहे. वसंतरावांचं गाणं त्यांच्याबरोबरच पुसून गेलं असतं. आज मात्र ती अजरामर कलाकृती बनली आहे. भौतिक, गणित हे विषय देखील मला मनापासून आवडतात. मार्कांशी जरी माझं तितकंसं बरं नसलं तरी विषयांशी मात्र मन जुळलेलं आहे आणि या शास्त्र व कला यांच्या तारा अखंड जुळलेल्या ठेवणं माझ्याच हातात आहे.

ज्या नृत्याची अखंड साथीदार होण्याच्या मी प्रयत्नात आहे, त्या नृत्यानी मला साथ द्यावी, मला त्याचा सहवास द्यावा. यातच मी तृप्त आहे. ⊟


हार्दिक शुभेच्छा !

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड**

स्थापना : १९३६ ) ( शेड्युल्ड बँक

**आपुलकीनं वागणारी माणसं !**

# मोफत स्त्रीशिक्षण : एक चर्चा

**रोहिणी पाटील / नीलम फुले / भारती आपटे**
(अकरावी साहित्य)
संयोजन व शब्दांकन
**शुभदा सिद्धपाठक**
तृ. व. साहित्य

मध्यंतरी, बारावीपर्यंत मुलींना शिक्षण मोफत मिळणार अशी महाराष्ट्र शासनाने घोषणा केली. या निर्णयाने काहींना सुखद धक्का बसला खरा; पण बारकावे लक्षात घेतले तर ही योजना फक्त स्तुत्य नाही. त्यात त्रुटी आहेत. तिचे दूरगामी परिणाम फारसे चांगले पहायला मिळतीलच याबद्दल एकमत नाही. यावर आपल्या काही विद्यार्थिनींनी परिसंवाद आयोजित केला. त्यातून पुढे आलेल्या मतांचे हे संकलन आहे.

उत्तम समाज घडविण्यात स्त्रियांचा वाटा महत्त्वाचा आहे. लहान मुलांवर होणाऱ्या संस्कारांची सुरुवात आईपासून होते. त्यामुळे समाजाचा स्त्री हा घटकच अशिक्षित, वैचारिक दृष्टया कमकुवत असेल तर पुढील पिढीचे चित्र फारसे चांगले दिसणार नाही.

भारतात असंख्य लोक अशिक्षित आहेत. त्यात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने बारावीपर्यंत शिक्षण मोफत करून एक छोटे का होईना पण प्रगतीचे पाऊल उचलले आहे.

या योजनेचा काही तरी अटी घालून खेळखंडोबा करू नये. उदा. फक्त मुलींच्या महाविद्यालयातील मुलींनाच केवळ शिक्षण मोफत यासारखे एखादे खुसपट काढू नये. (मध्ये असा सूर कानावर येत होता.) दहावीपर्यंत मुलींना शिक्षण मोफत अशी एक योजना मध्यंतरी पुढे आली होती. शाळांमध्ये मुलींकडून त्याप्रमाणे शुल्क घेतले नाही; पण सरकारने दोन अटी नंतर स्पष्ट केल्या.

१) १५ ( पंधरा ) वर्षापासून त्या मुलींच्या पालकांचे वास्तव्य महाराष्ट्रात असावे.

२) ती मुलगी अपत्यातील चौथ्या किंवा त्यापुढील क्रमांकाची नसावी. काही मुलींचे पालक सलग पंधरा वर्षे महाराष्ट्राचे रहिवासी नसल्यामुळे त्यांना फी–माफीचा लाभ झाला नाही. खेडेगावात शाळेतील बऱ्याच मुली अपत्यातील चौथ्या क्रमांकाच्या किंवा त्यापुढील क्रमांकाच्याच असतात. परिणामी बहुसंख्य मुलींना सहामाहीनंतर संपूर्ण वर्षाची फी एकदम बोकाडी बसली.

समाजातील परंपरागत गैरसमजांमुळे, रूढीप्रियतेमुळे बुद्धीची कुवत असूनही चूल आणि मूल या मर्यादित विश्वातच मुलींना खितपत पडावे लागते. स्त्री शिक्षणाचा प्रसार होऊनही दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या खर्चाच्या बोजामुळे मुलींचे शिक्षण मुलांच्या तुलनेत मागे पडते. त्यातून मार्ग काढण्याचा एक टप्पा म्हणून हा उपक्रम स्तुत्य वाटतो.

खेड्यात मुलींच्या शिक्षणासंबंधी आजही अनास्था आहे. लहान वयातच मुलींवर घरकामाचा बोजा पडतो. मग त्यांना शिकविण्याचा वेडेपणा कोण करणार ? मुलीला शिकवले आणि तिने इतरांवर वर्चस्व गाजवले तर ? जास्त शिकल्यानंतर लग्नात अडथळे आले तर ? जास्त हुंडा द्यावा लागला तर ? यासारख्या कित्येक भ्रामक कल्पनांमुळे खेड्यात आणि काही शहरातील कुटुंबातही मुलींच्या शिक्षणाची आबाळ होते. या समजुती बदलण्याचे कार्य काही अशा एखाद्या योजनेने पूर्ण होईल असे नाही.

फक्त शुल्क माफ करून हा प्रश्न कसा सुटेल ? वह्या, पुस्तके, गणवेष यांचा खर्च काय थोडा असतो ? त्यामुळे अधिकाधिक मुलींचे पालक या घोषणेने मुलींना शिकवायला उद्युक्त होतीलच असे नाही. अशी काही योजना आहे याची खबर काही थरापर्यंतच पसरते. फक्त दूरदर्शन आकाशवाणीवर एकदा जाहीर करून किंवा काही वर्तमानपत्रात बातमी येऊन चालणार नाही. सरकारने या योजनेचा खेडोपाडी जाऊन पुन्हापुन्हा विविध मार्गांनी प्रचार केला पाहिजे. बिकट परिस्थितीमध्ये शिक्षण मुलींना आपल्या पायावर उभे करू शकते, हात देऊ शकते, हे स्वतः मुलींना व पालकांना पटवून दिले पाहिजे. यासाठी पुढचा टप्पा केरळ सरकारप्रमाणे 'पदवीपर्यंत शिक्षण फुकट' हे पाऊल गाठायला सरकारला जड नाही.

कर्व्यांनी पुरस्कारिलेले व्यावसायिक शिक्षणही यात

समाविष्ट करावे. मुलीसुद्धा लघुउद्योग करू शकतील. यासाठी एखादे धोरण आखले पाहिजे. मुलींना ज्युदो, कराटेसारखे स्वसंरक्षण करणारे शिक्षण देण्याचीही आवश्यकता आहे. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण थोडे तरी कमी होईल. बारावीपर्यंत शिक्षण मोफत करून आपण फार मोठे काही पाऊल उचलेले किंवा स्त्री शिक्षणासंबंधीची आपली जबाबदारी पार पाडली, असे सरकारने समजू नये. केवळ नांदी म्हणूनच सरकारची ही घोषणा असेल तर तिचे स्वागत सर्वजण करतील.

शिकलेल्या मुली जर स्वतंत्र विचार करू लागल्या, तर तेही समाजाने उदार आणि सहज दृष्टिकोनाने स्वीकारले पाहिजे. आज शिकलेल्या स्त्रियांची जी कोंडी होत आहे, त्याच रूळलेल्या वाटेवरून आम्ही जाणार असू तर, बारावीपर्यंत त्यांना शिक्षण देऊन काय फायदा? त्यांचा शिक्षणाचा फायदा करून घ्यायचा असेल तरच ही योजना करण्यात, अंमलात आणण्यात 'राम' आहे. नाही तर सार्थ योजनेपेक्षा अनेक उंची घोषणांसारखी ती फक्त एक उंची पण पोकळ घोषणा होईल.


*With Best Wishes To :*

" PARSHURAMIANS "

*From :*

**M/s. BUTALA - DADHE ASSOCIATES**

**Promoters and Builders**

" YESHWANT APARTMENTS "
1032, Tilak Road,
Pune - 411 002

Phone : 449620

*With Best Compliments From :*

**N. S. DATE**
**Photo Studio**

209 / 1, New Sadashiv Peth,
Pune - 411 030

Phone : 444096

# बातचीत एका वधुपित्याशी

**राजश्री काणे**
प्र. व. वाणिज्य

'लग्न' म्हणजे प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या आयुष्यातला 'टर्निंग पॉईंट' असतो. दोन व्यक्तीच नाही तर दोन कुटुंब ह्यात जोडली जातात. अशीच एकदा बाबांच्या मित्राच्या मुलीच्या लग्नात गेलेली असताना मला देणं-घेणं, मानपान ह्याची चर्चा ऐकू येत होती. आपल्या लग्नव्यवस्थेतील मोठा प्रश्न म्हणजे हुंडा. ह्याच्याबद्दल जरा खोलात शिरायचं ठरवलं आणि प्रत्यक्ष काकांनाच गाठलं. तेही मोकळेपणाने माझ्याशी बोलू लागले. ताईच्या लग्नात कसा आणि किती खर्च आला तेही त्यांनी सांगितलं.

मी झटकन् विचारलं, 'काय हे काका, तुम्हीच तर अगदी सगळ्यांना मोठ्या तोंडानी हुंडा देणार नाही म्हणून सांगत होतात. मग हे कसे काय ?'

'बेटा, स्वतःवर वेळ येत नाही तोपर्यंत म्हणायला व दुसऱ्याला सांगायला काही वाटत नाही; पण स्वतः-वरच बेतलं की, मग कल्पना येते. जावयाला हुंडा नाई-लाज म्हणूनच दिला. प्रथम मुलीला स्थळ पहायचं ठरवलं, तेव्हा हुंडा द्यायचा नाही असंच ठरवून हुंडा न घेणारी स्थळं पहायचा प्रयत्न केला. वधु-वर सूचक मंडळातही नाव नोंदवलं; पण हुंडा न घेणारी अशी एक-दोनच स्थळं सापडली. पण कधी मुलाला मुलगी पसंत नव्हती, तर कधी शोभाला मुलगा चांगला वाटला नाही. अशा एक नि दोन कारणांवरून त्यांच्याशी जमलं नाही. काही स्थळं आमच्यापेक्षा फारच हाय लेव्हलची होती. त्यांना समाजातल्या स्वतःच्या इमेज किंवा प्रेस्टीजसाठी हुंडा घ्यायचा नव्हता; पण या ना त्या नात्याने द्यावं अशी इच्छा होती. हुंड्याऐवजी वर-दक्षिणा, वीस तोळे सोनं, शिवाय आते मामे बहिणीं-पासून सगळ्यांचे मानपान करून द्यायला हवं होतं. अशी स्थळं आम्हाला परवडणारी नव्हती. शोभाचंही वय वाढत चाललं होतं. लग्न ठरत नाही तेव्हा काही तरी भानगड दिसतेय, असंही लोक बोलू लागले. आपल्या मुलीबद्दल असे लोकांचे शब्द ऐकवेनात म्हणून शेवटी तत्व सोडून दिली. काही झालं तरी भावना तत्त्वापेक्षा श्रेष्ठ ठरली, निदान माझ्या बाबतीत तरी.'

शेवटी सांगताना तर त्यांच्या डोळ्यात पाणीच आलं. मलाही फार वाईट वाटलं. ताई या सर्व प्रका-राला तोंड देऊनसुद्धा लग्नाच्या बाबतीत किती खेळकर असायची हे आठवून मनोमन तिचा अभिमान वाटला.

काही वेळ तसाच शांततेत गेला. समाजाबद्दलचा राग काकांच्या नजरेत मला स्पष्ट दिसत होता.

थोड्या वेळानी मी विचारलं, 'ताईच्या लग्नात हुंडा द्यावा लागेल असं गृहीत धरून पूर्वी तुम्ही त्यासाठी काही तरतूद करून ठेवली होती का ?'

'आपला समाज अनेक क्षेत्रात इतर देशांबरोबर किंबहुना आघाडीवर आहे; पण तरीही मुलगा आणि मुलगी यातला फरक अजूनही समाजात चालूच आहे. पूर्वी मुलगी झाली की, लोकांना दुःख होत असे. मला तसं काही वाटलं नाही. मुलगी लहान असल्यापासूनच तिच्या लग्नासाठी थोडाफार पैसा प्रत्येकजण जमा करत असतो. तसा मीही केला. मुलीच्या लग्नाला खर्च करावा लागेल हे गृहीत धरलं होत; पण हुंडा द्यावा लागणार नाही असंही वाटायचं. तर कधी असंही वाटलं की, महागाई दिवसेंदिवस वाढतेय हुंडा व लग्नखर्चही, वाढेल; पण विचार केल्यावर वाटायचं आज हुंडा घेण्याची पद्धत आहे; पण मुलं मोठी होतील तेव्हा समाजातील जास्तीतजास्त लोक सुशिक्षित होतील. नवरा-नवरीही विचार करू शकतील. त्याचप्रमाणे मुली नोकऱ्या करतील, त्यामुळे लग्नानंतरचा सर्व पगार त्यांच्या सासरीच जाणार. तेव्हा हुंड्याची प्रथा बंद पडेल, पण आज चित्र बरोबर उलटच दिसतंय. जितका मुलगा जास्त शिकलेला, पगारदार तितका हुडा जास्त. आजकाल तरुण मुलांना मी हुंड्याबद्दल विचारलं तर अनेक जणांनी ते गंभीरपणे न घेताच एक कोटी करून टाकली. 'हुंडा नको फक्त होंडा द्या.'

आमच्या पिढीवर केली गेलेली ही टीका ऐकवत नव्हती, पण त्यात खोटं काहीच नसल्यामुळे मला बोलायला काहीच जागा नव्हती. त्यामुळे मी पुढचा प्रश्न विचारला,

'पूर्वीची तुमची तरतूद पुरली का ? पूर्वी त्यासाठी

काही तडजोड करावी लागली का? की कर्ज काढलंत? ते कुठून मिळवलंत? नातेवाईकांकडून काही मदत झाली का?'

'पूर्वीची तरतूद अगदीच तोकडी पडली नसली तरी पुरली नाहीच. तडजोड अशी फारशी करावी लागली नाही. कारण पगार बेताचा असूनसुद्धा स्वस्ताई होती आणि दुसरं म्हणजे आमच्या गरजाही आजच्या मानानी कमी होत्या. त्यात हिची खूपच मदत झाली. तिच्या काटकसरीमुळे खूपच बचत झाली. पण तरीही कर्ज काढावंच लागलं. नातेवाईकांनी कानावर हात ठेवले. सणासमारंभाला सगळे येतील पण मदतीला कोणी येत नाही. तुझा आनंददादा बँकेत असल्यामुळे त्याला कर्ज लवकर मिळालं. आपल्या मुलीसाठी त्याला हात पसरायला लावायला नको वाटत होतं, पण आलिया भोगासी.'

माझा लगेच पुढचा प्रश्न. 'ताईचं लग्न माझ्या मते समाधानकारक झालं, पण तुम्हाला मानसिक समाधान आहे का? हुंडा देऊनसुद्धा सासरी मुलगी खूष राहील याची खात्री वाटते का?

'मानसिक त्रास, अग त्यापेक्षा दुसरा जहाल शब्द असेल तर तो वापर. कधीकधी तर मन बंड करून उठतं की, या हुंडा घेणाऱ्यांशी मुलींनी लग्नच करू नये. पण मग लक्षात येत की, काही झालं तरी आपली संस्कृति पुरुषप्रधान आहे. मानसिक समाधानापेक्षा आयुष्यातल्या एका कर्तव्यातून सुटलो असं वाटतं. कितीही केलं तरी स्वखुशीनं देण आणि मागून घेणं यात फरक पडतोच ना. तिच्या खुषीबद्दल विचारशील तर माझ्या मते ती खूष असेल कारण हा मुलगा पाहिल्यावर केलं तर याच्याशीच असं तिने ठरवल्यामुळे त्यांना वाटेल तेवढ्याला हो म्हणावच लागलं आणि आतापर्यंतच्या त्यांच्या वागण्यावरून मुलीच्या खुषीबद्दल खात्री देता येईल.'

हे ऐकून जरा बरं वाटलं. कारण कितीही दिल तरी सासरकडच्यांची तोंड वाकडीच, परत मुलीला मारहाण केल्याच्या, टाकून बोलल्याची, प्रसंगी जिवे मारल्याची कितीतरी उदाहरणं रोज आपण वाचतो, ऐकतो.

'काका, कर्ज फेडण्याची तुम्हाला आर्थिक झीज सोसावी लागेल का?'

'आर्थिक झीज अशी फारशी सोसावी लागेल असं नाही. कारण कर्ज तसं फार मोठं नाहीये. आनंदला मी ह्याची झळ पोहचू देणार नाही. माझ्या पेन्शनला आता थोडीच वर्षं उरली आहेत. पगारातून हप्ते फेडणार आहे; पण त्यासाठी माझी नाटकाची हौस कमी करावी लागेल. शिल्लक आता बहुधा काही उरणारच नाही.

'काका, मानलं की मुलींच्या लग्नात नाईलाज म्हणून हुंडा दिलात; पण मग दादाच्या लग्नात हुंडा घेणार की नाही?'

'छे, छे! अग त्याच्या लग्नात हुंडा हा शब्द मी कोणाला काढू देणार नाही. मुलीच्या वडिलांना आर्थिक व मानसिक किती त्रास होतो याचा पुरेपूर अनुभव मी घेतलाय. आणखी कोणाला त्रास द्यायची मला इच्छा नाही. आणि मुलगाही माझ्या विचारांशी सहमत आहे.'

'आता शेवटचा प्रश्न. यानंतर हुंडाबंदीसाठी तुम्ही काय प्रयत्न कराल? सरकारनेही अजून काय करायला पाहिजे अस तुमचं मत आहे?'

'अग, आता नोकरीच्या बरोबरीने हे समाजकार्यही करणार आहे. आता मुलापासूनच शुभारंभ करतोय. पेन्शननंतर चकाट्या पिटण्यापेक्षा आयुष्यातले काही क्षण तरी समाजकार्याच्या उपयोगी पडलं, तर तेवढंच सार्थकी लागेल. सरकारनी जरी हुंडाबंदी कायदा केला, तरीही समाजात ही पद्धत राजरोसपणे चालू आहे. फक्त नावं वरदक्षिणा किंवा सोनं, मानपान वगैरे. कायदा गाढव असतो व सरकार काही करत नाही हे ठामपणे माहीत असल्यामुळे लोक या कायद्याला अजिबात भीक घालत नाहीत. सरकारनी काहीतरी ॲक्टिव्हपणा दाखवला पाहिजे. आपल्या सरकारची अशी समजूत आहे, कायदा केला की झालं आपलं काम. तुम्ही आजची तरुण पिढी; तुम्हीही जरा मनावर घ्यायला पाहिजे. मुलींनी हुंडा घेणाऱ्यांशी लग्न करायला साफ इन्कार करावा. खरं तर मुलाना हुंडा घेण्यात कमीपणा वाटला पाहिजे. सासऱ्याकडून हुंडा घेणं म्हणजे स्वतःच्यात तेवढं कमवायची धमक नाही असं उघडपणे सांगण्यासारखच आहे. त्यांचा नामर्दपणाच यातून दिसतो. आईवडिलाना असं दुःखदारिद्र्यात लोटून सुखात सासरी रहायला तुम्हाला तरी बरं वाटेल का? लग्न म्हणजे मंगलकार्य आपण मानतो. दोन तरुण मनं उत्साहात, एकत्रपणे जीवनाच्या मार्गावर चालणार असतात. अशा आयुष्यातल्या मनोहर प्रसंगाला या हुंड्यामुळे आपण पैशाच्या कठोर व्यवहाराचं रूप आणतो व दोन्हीकडच्या माणसांना सुखापासून दूर नेतो, असं नाही तुला वाटत? मला वाटतं. फारच मोठं लेक्चर झालं ना, बोअर नाहीना झालीस?'

'छे! तुमचे विचार मला अगदी मनोमन पटले.' काकांच्या या विचारांशी माझ्याप्रमाणे तुम्हीही सहमत व्हाल, अशी मी आशा करते.

# जाहिरात व संख्याशास्त्र

**सुबोध श्रीराम दांडेकर**
द्वि. व. शास्त्र.

जाहिरात क्षेत्रात संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करता येतो, हे एका पुस्तकात वाचले तेव्हा थोडे आश्चर्यच वाटले. ते पुस्तक व नंतर त्यासंबंधित माहिती आधारे ज्या गोष्टी कळल्या, त्यापैकी काही तुमच्यापुढे ठेवत आहे.

'बोलणाऱ्याची अंबाडी खपते, न बोलणाऱ्याचे गहूदेखील खपत नाहीत,' अशी म्हण आहे. मतितार्थ असा की, आपला माल कितीही चांगला असला, तरी तो खपवण्यासाठी थोडी फार जाहिरात करावी लागतेच. साहजिकच त्याचा परिणाम म्हणून जाहिरात करण्याची प्रवृत्ती खूपच वाढत आहे. त्यामुळे सध्याचे युग हे जाहिरातीचे युग आहे असे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही.

बऱ्याच कंपन्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात त्यावर्षी जाहिरातींवर किती खर्च करायचा हे ठरवलेले असते. त्यानुसार केलेल्या जाहिराती जास्तीत जास्त आकर्षक व परिणामकारक कशा होतील हे पहावे लागते. जाहिरात करावी लागत नाही, असा धंदा क्वचितच असेल. अर्थातच उद्देश हा असतो की कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचेल व अपेक्षित (किंबहुना जास्तीत जास्त) परिणाम साधणे हा जाहिरातीचा उद्देश असतो.

संख्याशास्त्रीय तंत्राचा आधार घेऊन याबाबतीत सर्वसाधारण निष्कर्ष काढता येतात. उदाहरणार्थ एखादी जाहिरात, एकूण लोकसंख्येपैकी किती लोक वाचतात याच्या प्रमाणाला संख्याशास्त्रीय परिभाषेत संभाव्यतेचा अंदाज म्हणता येईल. (ही किंमत नेहमी शून्य ते एकच्या दरम्यान असते.)

उदाहरणार्थ एखाद्या वर्तमानपत्रातील जाहिरातींची पाने २०% लोक वाचतात म्हणजेच असे म्हणता येईल की, सरासरी, दर पाच माणसांमागे एक माणूस ती जाहिरात वाचतो. एखाद्या दुसऱ्या वर्तमानपत्रात अगर मासिकात तीच जाहिरात छापली आहे. ती जाहिरात माणसापर्यंत पोहोचण्याचा संभाव्यतेचा अंदाजही समजा पाचात एक असाच आहे. यावरून असे म्हणता येईल की, एखाद्याने दोन्हीही जाहिराती वाचण्याच्या संभाव्यतेचा अंदाज १/२५ म्हणजेच ०·०४ असा आहे. म्हणजे ही संभाव्यता पुष्कळच कमी आहे. पण या दोनपैकी एकतरी जाहिरात पाहण्याची संभाव्यता किती आहे हे पहाणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्याला वाटेल की पाचात दोनजण म्हणजेच पंचवीसात दहाजण वाचतील; पण प्रत्यक्षात ही किंमत पंचवीसात नऊ येते. एखाद्याने दोनऐवजी तीन ठिकाणी जाहिरात दिली तर तिन्ही जाहिराती बघण्याची शक्यता १/१२५, तर दोन बघण्याची शक्यता १३/१२५ आणि एकच जाहिरात बघण्याची शक्यता ६१/१२५ असते. म्हणून जास्त परिणामकारकतेकरता एकच जाहिरात एकाच ठिकाणी न देता २–३ ठिकाणी देणे अधिक श्रेयस्कर.

फार पूर्वीपासून कृष्णधवल चित्रापेक्षा रंगीत चित्राचे जास्त आकर्षण असते. या निष्कर्षाला शास्त्रशुद्ध आधार देण्यासाठी काही महिन्यांपूर्वी एका कंपनीकरता, ४–५ संख्याशास्त्रज्ञांनी एक प्रयोग केला होता. तो म्हणजे त्यांनी वेगवेगळ्या प्रदेशातील अनेक गावे निवडली होती. त्या गावातील लोकांच्या आद्याक्षरानुसार दोन याद्या केल्या होत्या. एका गटाला कृष्णधवल तर दुसऱ्या गटाला रंगीत जाहिराती दिल्या होत्या. दोन्ही गटांकडून आलेल्या प्रतिसादांची यादी केल्यावर असे दिसून आले की रंगीत जाहिरातीला १५% जास्त प्रतिसाद मिळाला. म्हणजे दर १०० कृष्णधवल जाहिरातींमागे ११५ रंगीत जाहिरातींना प्रतिसाद मिळाला. या प्रयोगांत संख्याशास्त्रातील 'टेस्टिंग ऑफ हायपोथेसिस' (Testing of Hypothesis) या तंत्राचा वापर करून सर्वसामान्य निष्कर्ष काढता येणे शक्य आहे.

अमेरिकेत केलेल्या आणखी एका सर्वेक्षणात ३ समान गट केलेले होते ते असे– १) उच्चशिक्षित, २) मध्यमशिक्षित, ३) अल्पशिक्षित. त्यांना एकाच उत्पादनाच्या वेगवेगळ्या जाहिराती दाखविल्या. त्यातील काही अतिशय शांत व गंभीर होत्या तर काही भडक

व कर्कश्श संगीत असलेल्या होत्या. नंतर निकाल गोळा केल्यावर असे आढळून आले की, सर्वसामान्यरीत्या गट १ मधील बहुसंख्यांना शांत प्रकारच्या जाहिराती आवडल्या, तर गट २ मधील ६०% लोकांना भडक प्रकारच्या व ३ ऱ्या गटातील बहुसंख्य लोकांना भडक जाहिराती आवडल्या होत्या. त्या सर्वेक्षणात असेही दिसून आले की, ज्या जाहिरातींमध्ये उत्पादनाचे नाव सतत कानावर येते ती जाहिरात मनावर जास्त ठसते. असे सर्वसाधारण निष्कर्ष काढण्यासाठी संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करता येणे शक्य आहे. त्यामुळे जाहिरातींचा अधिक परिणामकारकतेचा उद्देश सफल करता येईल.

वेगळ्या शब्दात असेही म्हणता येईल की आपण जे प्रयोग काही लोकांवर करतो व त्यावरून जे तत्त्व येईल ते तत्त्व संपूर्ण समाजाकरता लावू नये. संख्याशास्त्रीय तंत्रानुसार निष्कर्ष काढले तरच ते अधिक भरवश्याचे ठरेल. कारण संख्याशास्त्रीय तंत्रे सर्वसामान्य निष्कर्ष काढण्यास मदत करतात किंबहुना या तंत्राशिवाय इतर तंत्रे यासाठी उपलब्ध आहेत.

संख्याशास्त्रातील आधुनिक तंत्रांचा वापर करून जाहिराती अप्रत्यक्षरित्या जास्तीत जास्त परिणामकारक करता येतात. त्यामुळे जाहिरात क्षेत्रात संख्याशास्त्राच्या उपयोगाला खूपच वाव आहे.


*Manufacturers of Machinery for :*

1 ) Minicement plants of 20 T. P. D. to 200 T. P. D.
2 ) Super phosphate plants
3 ) *Sugar* paint and Chemical plants

**Indage Plants and Equipments Pvt. Ltd.**

74, BHOSARI, IND. ESTATE,
PUNE – 411 026

हार्दिक शुभेच्छा !



# उत्कर्ष मंडप

हरिभुवन मंगल कार्यालय
४३७, नारायण पेठ, पुणे ३०

●

चालक
श्री. बाळासाहेब दाते
श्री. हेमचंद्र दाते



**शिवानंद कौशिक**



**आमोद वैद्य**



**सुहासिनी पेठे**

**– राष्ट्रीय प्रज्ञा शिष्यवृत्ती –**



**सुधा म्हैसूरकर**
M. Sc. (Chemistry)
विद्यापीठात प्रथम



**सुजाता सुदामे**
B. Sc. Botany
विद्यापीठात पाचवी



**जयश्री जोशी**
१२ वी बोर्डात
दुसरी



**उदय बेल्हे**
जहाजप्रतिकृति स्पर्धा
द्वितिय क्रमांक



**विलास जाधव**
राष्ट्रीय छात्रसेना नौदल :
प्रगत नेतृत्वशिबीर



**जयवंत मंत्री**
जनरल लीडर



**रावसाहेब पिंगळे**
सुवर्णमहोत्सव निधिनिष्ठ
पारितोषिक



**संजय हट्टंगडी**
आदर्श विद्यार्थी



**मंजिरी भट**
विद्यार्थिनी प्रमुख

**–– राष्ट्रीय सेवा योजना ––**



सोनोपंत दांडेकर व्याख्यानमाला
डॉ. श्री. वा. काळे भाषण करताना



सौ. सुधा भिडे हॉल उद्घाटन
मा. मोहनराव गवंडी यांच्या हस्ते



प्रा. मराठे यांचे व्याख्यान
शास्त्रमंडळाच्या उद्घाटन प्रसंगी



कौशिक व्याख्यानमाला : डॉ. पळसुळे



कबड्डी – कनिष्ठ महाविद्यालय विजयी संघ – महाराष्ट्र राज्यपातळी उपविजेता



कबड्डी संघ – आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सतत तिसऱ्यांदा अजिंक्यपद



खो खो – आंतर महाविद्यालयीन विजेता संघ ( वरिष्ठ )



सी. के. नायडू ट्रॉफी, कनिष्ठ महाविद्यालय – विजयी संघ



वरिष्ठ महाविद्यालय खो खो जिल्हा स्पर्धा – विजयी संघ



आंतर–महाविद्यालयीन (वरिष्ठ) अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद

# महागाई : कारणे व उपाय

**सुहास र. कुलकर्णी**
प्रथम वर्ष साहित्य

या देशातल्या सर्वसामान्य माणसाच्या मानगुटीला बसून अनेक भूते त्याला जीव नकोसा करून टाकत आहेत. बेकारी, भ्रष्टाचार, जातीय दंगली, रोगराई, दुष्काळ, भाववाढ इत्यादी. जगण्यासाठी पैसा मिळवणे व पैसा देऊन गरजेच्या वस्तू विकत घेणे हाच इथे एकमेव मार्ग असतो. वस्तूंचे भाव वाढले की, सामान्य माणसाची क्रयशक्ती कमी होते व जीवनावश्यक वस्तूंच्या अभावामुळे कुपोषण, त्यातून रोगराई दारिद्र्य आणि असंतोष वाढत जातो. म्हणूनच, महागाई हा येथील मोठा राष्ट्रीय प्रश्न आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

'महागाई' वाढणे म्हणजे शारीरिक, बौद्धिक श्रम करणारे कामगार, शेतमजूर, कर्मचारी, राबणारे शेतकरी, मध्यमवर्गीय व्यावसायिक यांचे आर्थिक शोषण होणे आणि औद्योगिक भांडवलदार, काळाबाजारवाले, साठेबाज, व्यापारी, मोठे दलाल आणि सत्तासंपत्तिधाऱ्यांच्या संपत्तीत भर पडणे.

महागाई कशी वाढत गेली आहे हे 1960 हे पायाभूत वर्ष धरून किमतीच्या निर्देशांकात किती वाढ झाली ह्यावरून पाहता येईल.

| | | |
|---|---|---|
| 1960 | – | 100% |
| 1970 | – | 184% |
| 1980 | – | 390% |
| 1983 | – | 514% |

('महागाईचे भूत गाडलेच पाहिजे' या पुस्तकावरून) म्हणजेच, 1960 च्या तुलनेत आज किंमती *पाचपटींहून* वाढल्या आहेत. गेल्या काही वर्षांत सर्वसामान्य जनतेला महागाईने अगदीच मेटाकुटीला आणले आहे. सर्वसामान्य माणसांना आंबे वगैरे तर जाऊच द्या, केळी घेतानासुद्धा आपल्या खिशाला परवडेल का ह्याचा विचार करावा लागतो. रोज आठ-आठ तास खर्डेघाशी करून वा बारा-बारा तास शेतात राबूनही जीवनावश्यक वस्तूंसाठी धावपळ करावी लागते. रेशनच्या दुकानांसमोर रांगा लावाव्या लागतात आणि भाजीवाल्याशीही किंमतीवरून घासाघीस करावी लागते. अर्थात एवढे करूनही पुरेशा वस्तू पाहिजेत तेव्हा मिळत नाहीत त्या नाहीतच.

देशात निर्माण होणारी टंचाई, बेकारी यांची वरवरची व प्रसंगी फसवीही कारणे येथील राजकारणी देत असतात. 'लोकसंख्या वाढली म्हणून पुरवठ्यापेक्षा मागणी वाढली म्हणून महागाई वाढली.' 'लोकांच्या हातात पैसा आला म्हणून महागाई वाढली.' अशी विधाने केली जातात, जी सामान्य जनतेला खरी वाटतात. लोकसंख्या वाढली हे जितके खरे आहे, तितकी शिक्षण घेणारी डोकी वाढली नसतीलही; परंतु श्रम करणारे हात तर वाढले आहेत! लोकांच्या हातात जादा पैसा आला असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा हेही लक्षात ठेवले पाहिजे की, देशातील 68% लोक दारिद्र्यरेषेखाली रहातात व ज्यांच्याजवळ पैसा आहे असे फक्त 32% लोक आहेत. काही नेते सतत सांगत असतात की, 'भाववाढ हे आर्थिक विकासाचे लक्षण आहे.' विकास होत असताना भाववाढ होणे अटळ आहे; परंतु 100–150 वर्षांच्या काळात थोडीथोडी भाववाढ होणे हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा अपरिहार्य भाग असला, तरी अल्पकाळात दुपटीपेक्षा अधिक झालेली भाववाढ समर्थनीय मानता येणार नाही.

ज्या समाजात उत्पादन हे गरजेसाठी नसून नफ्यासाठी केले जाते, अशा सर्व भांडवली देशांमध्ये महागाई भडकलेली दिसते. भारताच्या औद्योगिक संपत्तीतील 25% हून अधिक संपत्ती 12 बड्या घराण्यांमध्ये विभागली गेली आहे. एकूण लोकसंख्येपैकी 70% खेड्यांत रहाणाऱ्या लोकांपैकी बहुसंख्य लोक शेतीच्या छोट्या तुकड्यावर वा मोलमजुरीवर केवळ एक वेळचं जेवण मिळवू शकतात. एका बाजूला हे चित्र दिसत असताना दुसरीकडे, 1951 साली एका बड्या घराण्याची सरकारी मोजणीनुसार 116 कोटी रुपये असलेली मालमत्ता आज 1840 कोटी रुपयांपर्यंत गेलेली, अशी दुसऱ्या टोकाची परिस्थिती दिसून येते.

राष्ट्रीय संपत्तीचा विचार करताना जरा खोलात जाऊन बघितले तर असे दिसून येते की, दरवर्षी अर्थ-

संकल्पातील तूट भरून काढण्यासाठी जी करवाढ करण्यात येते ती बहुश: सर्वसामान्य जनतेच्या रोजच्या गरजांवर केली जाते. जनतेवर मुख्यत्वेकरून दोन प्रकारचे कर लादले जातात, प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर ! प्रत्यक्ष कर हे उच्चमध्यमवर्गीय व श्रीमंतांच्या उत्पन्न व मालमत्तेवर, तर अप्रत्यक्ष कर हे आयातकर अबकारी कर व विक्रीकर यामार्फत जमवले जातात. जे काड्यापेटीपासून रॉकेलपर्यंत सर्व जीवनावश्यक वस्तूंवर असतात. विक्रीकर हा जीवनावश्यक वस्तू व चैनीच्या वस्तूंवर आकारला जातो, जो जनतेकडून व्यापारी वसूल करतो. भांडवलदार व श्रीमंतांनाही अप्रत्यक्ष कर भरावा लागतो; पण त्यांच्यासाठी तो अत्यंत क्षुल्लक असतो. अप्रत्यक्ष कर हा सामान्य जनतेकडून मिळवला जात असल्यामुळे व गेल्या काही वर्षांत त्यात भयंकर वाढ झाल्यामुळे सामान्य जनता पिचते. आपल्या देशात गेल्या 34 वर्षांत ( 1950 ते 1984 ) प्रत्यक्ष कर 22% नी कमी झाला आहे, तर अप्रत्यक्ष करांमध्ये 50 पटींनी वाढ झाली आहे. सर्वसामान्य व गरीब जनता जीवनावश्यक वस्तूंपासून कशी वंचित होत चालली आहे व कोणत्या स्तरातील लोकांवर करांचा बोजा पडतोय हे खाली दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट दिसेल.

| जीवनावश्यक वस्तू | कर | चैनीच्या वस्तू | कर |
|---|---|---|---|
| साखर | 56% | ग्रामोफोन | 15% |
| रॉकेल | 52% | स्कूटर | 20% |
| काड्यापेटी | 25% | टेलिव्हिजन | 15 ते 20% |

दुसऱ्या बाजूला, मालमत्तादारांवरच आकारले जाणारे प्रत्यक्ष कर हे अप्रत्यक्ष करांच्या प्रमाणात शुल्लक आहेत आणि त्यासाठी सरकारने ठरवून दिलेल्या नियमांत इतक्या पळवाटा आहेत की, उच्चभ्रू लोक त्यातून सहज सुटू शकतात. बडे भांडवलदार, व्यापारी, राजकारणी सत्ताधारी आणि ज्यांवर आपण 'जान कुर्बान' करायला तयार असतो असे चित्रपट अभिनेते, अभिनेत्री ह्यांच्याकडे करांची प्रचंड थकबाकी असतानाही त्यावर ठोस उपाययोजना होताना दिसत नाही. प्रचंड प्रमाणात दडवल्या गेलेल्या काळ्या पैशाची एक समांतर अर्थव्यवस्थाच ह्या देशात असल्याचे आपण वाचतोच. याला कारण सरकारी यंत्रणेतला गलथानपणा आणि सर्व पातळींवरचा भ्रष्टाचार !

स्वातंत्र्यानंतर हरितक्रांती, श्वेतक्रांती आणि इतर अनेक योजनांमुळे शेतीसाधनांमध्ये व पद्धतींमध्ये फरक पडला, पण ती साधने पोचली फक्त श्रीमंत शेतकऱ्यांपर्यंत ! 1950 साली शेतकऱ्यांकडून 7% कर आकारला गेला होता, तर 1980 त तो 1% हूनही कमी होता. कायद्यातल्या पळवाटा सधन शेतकऱ्यांना फायद्याच्या ठरतात त्या अशा. अशा रीतीने साठेबाज, काळाबाजारवाले आणि बडे शेतकरी हे महागाईचा राक्षस पोसला जायला कारणीभूत ठरत असतात.

सरकार सतत तुटीची अंदाजपत्रके दाखवीत असते. ही तूट नवीन नोटा, व नाणी छापून भरून काढली जाते. सहाजिकच, त्या प्रमाणात उत्पादन वाढले नाही तर 'कमी वस्तू व जादा पैसा' बाजारात आल्याने महागाई वाढते आपल्या देशात चलनफुगवटा अतिशय वेगाने होत आहे. याच प्रमाणात तो होत राहिला तर देशाच्या आर्थिक परिस्थितीवर वाईट परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. सतत विरोध झालेले एशियाड, राष्ट्रकुल परिषद, अलिप्त राष्ट्र परिषद इत्यादींच्या निमित्ताने शेकडो कोटी रुपये खर्च केले जातात, आणि आर्थिक परिस्थितीत समतोल आणण्यासाठी चलनवाढ होते, जिचा आपल्यासारख्या गरीब देशाच्या आर्थिक परिस्थितीवर विपरित परिणाम होतो. 1950–1951 व 1967–68 ह्या काळात वित्तपुरवठ्याचे प्रमाण 2.5 पटींनी वाढले होते. 1951 सालचा वित्तपुरवठा रु. 2020 कोटी होता. तो 1967–68 मध्ये रु. 5351 कोटी, तर 1969–70 त 6000 कोटी झाला. (आकडेवारी ( साप्ता. जनवाणी ) 28–7–70) ह्याच प्रमाणात वित्तपुरवठा सतत वाढत आहे.

अनुत्पादक, अनावश्यक खर्चातील प्रचंड वाढ हेही अर्थव्यवस्थेवर ताण पडण्याचे एक कारण ! इतक्यात खूपच महत्त्व देण्यात आलेले सैन्य व पोलीस अशांसारख्या बाबींवर प्रचंड खर्च केला जातो. 1960 च्या अंदाजपत्रकात सैन्यावरील खर्च 300 कोटी होता, तर 1984 च्या अंदाजपत्रकात तो 5171 कोटी रुपये इतका झाला होता. अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्यासाठी चलनवाढीचे प्रमाण अपरिहार्यपणे वाढते, व त्यामुळे महागाईही.

आत्तापर्यंत आपण महागाई वाढण्यास कारणीभूत असणाऱ्या आर्थिक विषमता, कर, भ्रष्ट यंत्रणा, चलन फुगवटा, अनावश्यक अनुत्पादक खर्च इत्यादी घटकांचा

विचार केला. यावर तातडीची उपाययोजना काय ?

भारतातील काही सामाजिक संघटनांनी सुचवलेले काही महत्त्वाचे उपाय असे–

१) रॉकेल, सुती कापड, साबण, चहा, साखर इत्यादी नित्योपयोगी वस्तूंवरील अबकारी कर रद्द करून विक्रीवर व आयातकरांमध्ये मोडणाऱ्या वस्तूंवरील कर वाढवणे, जणू करून श्रीमंत वर्गाकडून राष्ट्रहितासाठी व विकासासाठी पैसा उपलब्ध होऊ शकेल.

२) पोलीस, सैन्य व इतर अनुत्पादक बाबींवर सरकार जो प्रचंड खर्च करीत आहे तो कमी करणे.

३) चलनवाढ थांबवणे वा ज्या प्रमाणात चलनवाढ होते त्याच प्रमाणात उत्पादन वाढवणे.

४) शेतकऱ्यांना धान्याचा रास्त भाव देऊन, गरीब व मध्यम शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबवणे.

५) ग्रामीण भागात, जेथे बहुसंख्य गरीब शेतकरी वास्तव्य करीत असतात. तेथे रास्त दराची दुकाने उघडणे, जेणेकरून जास्तीत जास्त जनतेला, कमीत कमी दराने, किमान रास्त भावात जीवनावश्यक वस्तू मिळू शकतील.

६) केवळ जागतिक प्रतिष्ठेसाठी वेळोवेळी जे समारंभ, मेळावे, परिषदा भरवल्या जातात, ज्यांवर आपल्या देशाला परवडणार नाही इतका पैसा उधळला जातो तो थांबवणे.

७) महागाई निर्देशांकाची पुनर्रचना करणे.

महागाईला आळा घालण्यास हे उपाय काही प्रमाणात उपयुक्त ठरू शकतील. बेकारी, टंचाई, दारिद्र्य, विषमता, भ्रष्टाचार, शोषण, राजकीय दडपणूक व लोकशाही हक्कांची गळचेपी या साऱ्या प्रश्नांबरोबरच महागाईलाही कायमचे गाडून टाकण्यासाठी पर्यायी अशा क्रांतिकारक आर्थिक, राजकीय, कार्यक्रमांचा विचार होणे आवश्यक आहे. आणि हे केवळ उभरत्या पिढीचेच काम होय.

---

## यादे

वृंदा गुपचूप
तृ. व. साहित्य

मालूम नही मुझे
कैसे कट गये दिन
तुम्हें याद करते करते
पता नहीं मुझे
कैसे बितायीं रातें
हर रात रोते रोते
आज बहार याद आयी
तुम्हारे सपने देखते देखते
कुछ भुला हुआ सा याद आया
आज तुम्हें देखते देखते–

## क्या है यह जिंदगी

वैशाली गोडबोले
१२ वी शास्त्र

कैसे अजीब मोडपर पहुँच गयी है ये जिंदगी,
कि धूपछाँव में कुछ फर्कही
नही करता है ये दिल ।
हरतरफ उदासी सी छा गयी है,
कि अपने गमपें भी रोना
भूल गया है ये दिल ।
जितनी आसान करना चाहते हैं,
उतनीही तेढी होती जा रही है ये जिंदगी ।
उलझनों और रस्मोंरिवाजोंसे छुटते छुटते,
उनमेंही फिर बँधी जाती है ये जिंदगी ।

# इये मराठीचिये नगरी

**अश्विनी सुरेश कोंजळे**
१२ वी, अ. ' विज्ञान ' विभाग

सुमारे एक हजार वर्षापूर्वी श्रवणबेळगोळ (कर्नाटक) येथे इंद्रगिरी पर्वतावर, गोमटेश्वराच्या भव्य मूर्तीच्या पायथ्याशी, ' श्री चामुंडराय करवियले, गंगराये सुत्ताले करवियले ' ही मराठी भाषेतील पहिली शिलालिखित ओळ कोरली गेली आणि मराठी भाषेचा श्रीगणेशा झाला.

यापूर्वी संस्कृत ही देवांची भाषा मानली जात असे. संस्कृत भाषेला राजाश्रय मिळाला होता. सामान्यांच्या दृष्टीने जे भूदेव, उच्चकुलीन ब्राह्मण समजले जात त्यांची संपर्क भाषासुद्धा संस्कृतच होती आणि यानंतरही शतकानुशतके संस्कृतच्या आधारानेच मराठीचा वेलू गगनावरी गेला; परंतु सामान्यांची बोलीभाषा मात्र मराठीच होती. सारे ज्ञान, वेद संस्कृतमध्येच असल्याने हा बहुजनसमाज ज्ञानापासून वंचित राहिला.

याच काळात म्हणजे सुमारे ७०० वर्षापूर्वी एका संन्याश्याच्या पोराने क्रांतीची मशाल पेटविली आणि संस्कृतचे अगणित ज्ञानभांडार लुटून मराठीचा खजिना समृद्ध केला. ज्ञानेश्वरांनी मराठीची पताका खांद्यावर घेतली आणि गीतेचं ज्ञानेश्वरीत रूपांतर केलं, अमृतानुभव लिहिला आणि भोळ्याभाबड्या मराठी मनात भक्तीची ज्योत पेटविली. एकनाथांची भारुडं, एकनाथी भागवत, नामदेव, जनाबाईच्या ओव्या मराठीच्या पदरात हिरे मोतियांचे दान देत होती. चक्रधरांची लळितं सामान्यांच्या घराघरांतून मोठ्या आवडीनं वाचली जात होती आणि नंतरही शेकडो वर्षे ही परंपरा चालू ठेवली तुकारामांच्या अभंगांनी, रामदासांच्या श्लोकांनी आणि अनेक शाहिरांच्या पोवाड्यांनी.

संस्कृतचे वर्चस्व हळूहळू कमी व्हायला लागले. या भूमीवरील परक्यांची आक्रमणे वाढू लागली. हिंदूंची भूमी यावनी अधिसत्तेने पादाक्रांत केली आणि हिंदू संस्कृती मोगलांच्या कचाट्यात सापडली.

त्यावेळी मातृभूमीच्या, मातृभाषेच्या संरक्षणासाठी हाती शस्त्र घेतलं शिवाजीमहाराजांनी. स्वराज्य प्राप्तीसाठी किती कष्ट घेतले, कित्येक जिवामोलाचे मोहरे गमावले आणि अखेर मराठी भूमीतून मोगलांना हुसकावून लावीत श्रींचे राज्य निर्माण केले. स्वराज्य उभारले, सुराज्य केले. या काळात मराठीला सोनियाचे दिवस आले.

सम्राट रामदेवरायानंतर जवळजवळ ३०० वर्षांनी प्रथमच अशी वेळ येत होती की, राजा, राजभाषा आणि बोलीभाषा एकच म्हणजेच मराठी होती. महाराजांनी मराठीला दरबारी मानाचे पान दिले. मराठी राजभाषा झाली. तरीही भाषेवर थोडाफार इतर भाषांचा प्रभाव होताच. महाराजांनी मराठीच्या विकासासाठी आणि राज्यकारभाराच्या सुलभतेसाठी ' राज्यव्यवहारकोष ' निर्माण केला. मराठीच्या विकासासाठी दूरदर्शीपणे हेतूतः केला गेलेला हा पहिलाच प्रयत्न. या काळात मराठीची लिपी होती मोडी. बाळबोध किंवा देवनागरी लिपीपेक्षा सारा व्यवहार मोडीत करण्याकडे लोकांचा कल होता.

असे हे मराठीचे सुवर्णयुग जवळजवळ दीड शतक अखंड चालले. तुकाराम, रामदास, चोखा, सावता अशा अनेक संतकवींनी मराठीला समृद्ध केले. याला हातभार लावला होनाजी–बाळा, रामजोशींच्या लावण्यांनी मोरोपंतांच्या आर्यांनी, वामनाच्या श्लोकांनी, शाहिरांच्या पोवाड्यांनी आणि मराठीच्या अनेक मानकऱ्यांच्या साहित्यानी. लावण्या, पोवाडे, शाहिरी कवनं, आणि भजनं यांनी सारा मराठी मुलूख भारून गेला होता. मुळा, मुठा, भीमा आणि पवनाकाठी नवनवीन ग्रंथसंपदा निर्माण होत होत्या.

याच काळात ज्याप्रमाणे स्वराज्यावर पोर्तुगीज, इंग्रज अशा अनेक परकीयांचे आक्रमण होत होते त्याचप्रमाणे मराठीदेखील इंग्रजी, पोर्तुगीज यांच्या संपर्कात येत होती. नवनवीन शब्द, वाक्यरचना स्वीकारीत होती, समृद्ध होत होती. स्थिर शासनामुळे साहित्य, संस्कृती, कला यांचा विकास होतो. समर्थ शासकांच्या स्वराज्यात मराठीदेखील अशीच फुलत होती. हळूहळू वास्को–द–गामाच्या पांढऱ्या पावलांनी आलेली परकीय राजसत्ता आपले काळे कर्तृत्व दाखवू लागली आणि

पुन्हा एकदा मराठीच्या दाराशी अमावस्येचा कराल काळरात्र खदखदा हासत उभी राहिली.

आता इंग्रजी राजभाषा झाली. ज्या भाषेला वाघिणीचं दूध म्हणतात अशा भाषेच्या संपर्कात मराठी आली होती. या काळात मराठीत अनेक स्थित्यंतरे झाली. अनेक आंग्लविद्याविभुषितांनी इंग्रजीचे ज्ञान मराठीत आणावयास सुरुवात केली. यात अनेक समाज. सुधारक आणि देशभक्त आघाडीवर होते. आतापर्यन्त भारतात वृत्तपत्रे सुरू झाली होती. मराठीदेखील यात मागे नव्हती. 'ज्ञानप्रकाश', 'प्रभाकर' इ. वृत्तपत्रांनी वृत्तपत्रीय मराठीची गुढी उभारली, आणि हीच परंपरा पुढे चालवली टिळक, आगरकर, फुले आणि कालकर्त्यांनी.

वृत्तपत्रांप्रमाणेच सामाजिक जाणिवा व्यक्त करणार लेखन महात्मा फुल्यांनी निर्माण केलं. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्याच परंपरेतील हे गद्यलेखन होते. यानंतर मराठी साहित्य शारदेच्या तारांगणात कितीएक नवीन तारे उगवले. त्यांपैकी एक होते राम गणेश गडकरी. गडकऱ्यांनी ललित लेखनाच्या प्रत्येक प्रांतात मुक्तपणे संचार करायला सुरुवात केली. मराठी साहित्यात प्रथमच गडकऱ्यांनी नाट्यमाध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडली. या भाषाप्रभूने मराठीला 'राजसंन्यास', 'पुण्यप्रभाव', 'एकच प्याला' अशा अनेक नाटकाची आणि महाराष्ट्राचे वैभव व्यक्त करणाऱ्या 'महाराष्ट्रगीतासारख्या अनेक गीतांची देणगी दिली. गडकऱ्यांप्रमाणेच देवल, किर्लोस्कर यांनी मराठी रंगदेवतेच्या शिरपेचात मानाचे तुरे खोवले.

या काळात मराठीत अनेक पाश्चात्यसाहित्य प्रकार सुनीत, लघुनिबंध प्रचलित झाले. झेंडूच्या फुलांसारख्या विडंबन कविता, नवकाव्य, असे अनेक प्रकार मराठीत निर्माण झाले. मराठीच्या विकासाला वऱ्हाडी आणि कोकणी या तिच्या बोलीभाषादेखील हातभार लावत होत्या. याचं उत्तम उदाहरण म्हणजे बहिणाबाई आणि बा. भ. बोरकर. अगदी अलिकडे दलित साहित्यानेही मोलाची भर घातली आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात, मराठी भाषिकांचा विजय झाला. आणि सुमारे दीडशे वर्षांनंतर पुन्हा एकदा मराठी राजभाषा झाली. मुंबई महाराष्ट्राची राजधानी म्हणून गणली जाऊ लागली; परंतु परप्रांतियांच्या आक्रमणामुळे मुंबईच्या मराठीपणालाच धोका पोहचू लागला आहे. यातच इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी दुबळी बनत चालली आहे. इंग्रजी भाषा अवगत असणे हे विद्वत्तेचे लक्षण मानले जाऊ लागले आहे. इंग्रजी येत नसलेल्या माणसांबद्दल आणि माणसांमध्ये कमीपणाची भावना निर्माण झाली आहे. मराठी भाषेला तुच्छ लेखून इंग्रजीचा पदर धरण्याची वृत्ती आजच्या पांढरपेशी समाजात बोकाळली आहे. स्वतःच्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याबद्दल सर्वच जण आग्रही होऊ लागले आहेत. इंग्रजीचं हे वेड तळागाळातल्या लोकांपर्यंत घुसलेलं आहे.

परंतु अचानक, मधूनच काही मराठीप्रेमी मनं उसळून येतात. मराठीच्या अभिमानाची थोरवी गाऊ लागतात. आणि जाणवतं की या लक्ष लक्ष मराठमोळ्या माणसांच्या मनात मराठी जिवंत आहे. आणि म्हणूनच माधव ज्यूलियन म्हणतात,

मराठी असे आमची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे,

नसे आज ऐश्वर्य या माऊलीला, यशाची पुढे दिव्य आशा असे.

# हिंदी चित्रपट संगीत : काही प्रश्न

**मिलिंद संगोराम**
प्र. व. वाणिज्य.

हिंदी चित्रपट संगीत हा आजचा एक लोकप्रिय संगीत–प्रकार आहे. संगीत हा आम हिंदी सिनेमाचा अटळ अवयव आहे.

हिंदी चित्रपट संगीतावर कुणाएकट्या संगीतकाराची मक्तेदारी नाही. अनेक संगीतकारांनी आपापल्या कुवतीनुसार चित्रपट संगीताला जास्तीतजास्त कलात्मक व चमकदार करण्याचा प्रयत्न केला. याचा एकूण परिणाम चित्रपट संगीताच्या दृष्टीने फार चांगला झाला. या संगीतप्रकारातील समृद्धी ही नौशाद, सी. रामचंद्र, सचिनदेव बर्मन, मदनमोहन सारख्या तालेवर संगीत दिग्दर्शकांच्या परिश्रमांचा एकत्रित परिणाम आहे. आमचं मराठी भावगीत आता कालबाह्य ठरू लागलं आहे. याचे कारण हिंदी चित्रपटसंगीतात आढळणारी सर्वसमावेशक वृत्ती मराठी भावगीतात नाही. हिंदी चित्रपटसंगीताला कुठलेच संगीत निषिद्ध नाही. त्यामुळे प्रत्येक प्रांतातील लोकांना ते आपलंच वाटत. शिवाय सोपेपणा हे हिंदी चित्रपट संगीताचे प्रमुख वैशिष्टच. गांभीर्यपूर्ण आशय सोप्या शब्दात अभिव्यक्त करून सामान्य प्रेक्षकांना आपल्याकडे आकर्षित करण्याची सिनेमावाल्यांची ही खेळी तशी जुनीच. या शब्दांना स्वरसाज चढवितानाही संगीतकाराच्या डोळ्यासमोर अतिसामान्य प्रेक्षकच असतो. त्यामुळे 'एकदा ऐकली तरी सहज लक्षात राहील' अशा तब्येतीच्या चाली तयार केल्या जातात.

पूर्वीची चित्रपटगीते ऐकली तर काव्य आणि संगीताची एकरूपता आपल्या चटकन मनात भरेल. आता 'परख' मधलं 'ओ सजना बरखा बहार आयी...' हे गाणं घ्या. शैलेंद्रचे शब्द आणि सलील चौधरींचं संगीत हे इतकं एकरूप झालंय की, तेच गाणं संगीतविरहित म्हणजे गद्यात म्हणणं आपल्याला फार त्रासाचं जाईल; परंतु आजच्या हिंदी चित्रपटसंगीताचं चित्र कालच्या हिंदी चित्रपटसंगीतापेक्षा फारच वेगळं आहे. पूर्वीच्या संगीतात स्वतःची अशी खास वैशिष्ठचे होती. आज आपण ज्यांना आघाडीचे संगीतकार म्हणतो ते अत्यंत सहजतेने संगीतचौर्य करताना दिसत आहेत. भारतीय संगीत आता अपुरं पडतंय हे याचं खरं कारण नव्हे. अजून कितीतरी लोकधुना अस्पर्शित आहेत. या चौर्यकर्माचं खरं कारण असं आहे की एखादी परदेशात लोकप्रिय असलेली टचुन जेव्हा हिंदी संगीतकार आपल्या गीतासाठी निवडतो तेव्हा बहुतेक सिनेरसिकांच्यात मनात पूर्वग्रहाचा पाया आधीच तयार झालेला असतो. मग त्याच्या हिंदी रूपाच्या लोकप्रियतेबाबत साशंक राहण्याचे संगीतकाराला कारण उरत नाही. थोडक्यात म्हणजे लोकप्रियता फक्त संक्रमित केली जाते. पूर्वी सचिनदेव बर्मननी सुद्धा पाश्चात्य धुनांचा वापर केला; पण त्यांनी त्या धुना आधी पचवल्या आणि मगच लोकांसमोर सादर केल्या. आज ही पचविण्याची क्रियाच फारशी आढळत नाही.

आजच्या चित्रपटगीताच्या प्रसंगांची आणि स्थानाचीही गोचीच झाली आहे. दोन प्रसंगांच्या कोंदणात गाणं चपखल बसावं वगैरे विचार करायचं कोणाच्याच लक्षात राहात नाही. कुठल्याही परिस्थितीत सहा गाणी असलीच पाहिजेत अशा प्रतिज्ञेनेच चित्रपट निर्माण केले जातात. मग कथेचा प्रवाह अडवून गाणी घुसडली जातात. बागेत नायक, नायिका असले की ती 'नाही–नाही' म्हणत असतानाही तो म्हणतो 'तुम्हे गाना ही पडेगा' आणि मग एकदम ती गायला लागते! गाण्याच्या असल्या सिच्युएशन्स असल्यावर कुठल्या गीतकाराला खऱ्या अर्थानं काव्य लिहिता येईल ?

खरे तर चित्रपटात गाणे असणे हाच कमालीचा अवास्तव प्रकार आहे. एखाद्या प्रसंगात त्या क्षणी उत्कृष्ठ काव्य रचना करून त्याला साजेसं संगीत देऊन अनपढ नायक जेव्हा सुरेल आवाजात गाऊ लागतो तेव्हा सबकॉन्शस लेव्हलवर 'हे अवास्तव आहे.' असं जाणवत असूनही आपण बिनदिक्कत ते सहन करतो. नुसतं सहनच करत नाही तर ते एंजॉय करतो. याला कारण काय ? तर संगीत ! संगीतावर आपण वेळोवेळी लुब्ध होत असतो. मग आपोआपच इतर गोष्टींकडे दुर्लक्ष होतें. हे आधीच मान्य केले आहे की, हिंदी

चित्रपट संगीताचे सांगितिक योगदान मोलाचे आहे. चित्रपटात जर पहिल्यापासूनच गाणी नसती तर आजच्या एवढ्या समृद्ध सिनेसंगीत जगताला आपण मुकलो असतो; पण शुद्ध कलाप्रेमी व्यक्तीला असा प्रश्न पडतो की, 'चित्रपटगीताने चित्रपटाला कलात्मक उंची गाठायला काही मदत केली आहे का?' याचे उत्तर मात्र नकारात्मकच घ्यावे लागेल.

पार्श्वसंगीत ही चित्रपटाची फार मोठी शक्ती आहे. चित्रपटात घडणाऱ्या विशिष्ट प्रसंगांना संगीतातून बोलकं करण्याचं, त्यांना अधोरेखित करण्याचे काम पार्श्वसंगीत करत असतं. चित्रपट हा तुकड्या-तुकड्यांनी बनत असतो; पण त्याचा परिणाम आपल्या मनावर पार्श्वसंगीतामुळेच एकसंध होत असतो. या सर्व गोष्टी ध्यानात घेता पार्श्वसंगीताचं चित्रपटातील आणि एकूणच सिनेसंगीतातील स्थान मानाचं! पूर्वीच्या संगीतकारांना या गोष्टीची जाणीव होती. त्यामुळे पार्श्वसंगीताचं काम क्षुल्लक मानून त्यांनी तें आपल्या सहाय्यकांवर सोपवलय असं फार क्वचित व्हायचं. आज सगळं चित्रंच पालटलंय. आर. डी. बर्मनसारखा प्रतिभावंत संगीतकारदेखील एखाद्या चित्रपटातील सहा गाण्यांना नुसतें 'मुखडे' दिले की, त्या चित्रपटापुरत आपलं काम संपलं असं मानून पार्श्वसंगीताकडे ढुंकूनही न पाहता तें 'बासु-मनोहरी' या आपल्या सहाय्यक द्वयीकडे सोपवून मोकळा होतो. आजच्या चित्रपटातील पार्श्वसंगीताची दारूण परिस्थिती अशा बेफिकिरीतूनच जन्माला आली आहे. अधूनमधून अजित बर्मन या तरुण संगीतकाराने 'अर्धसत्य' च्या पार्श्वसंगीतासाठी कंपोज केलेलें सरोद चे तुकडे आपल्याला अवाक् करून जातात; पण 'अर्धसत्य' हा आजच्या चित्रपटाचे प्रतिनिधित्व करू शकत नाही.

हिंदी चित्रपट संगीताबद्दल वारंवार घेण्यात येणारे वरील आक्षेप लक्षात घेता या संगीत प्रकाराची अधोगती किती वेगाने घडत आहे हे आपल्या लक्षात येईल. १९८५ च्या उंबरठ्यावर उभं राहून हिंदी चित्रपट संगीताच्या उण्यापुऱ्या ५२ वर्षांच्या संगीत संसाराकडे नजर टाकली तर असं जाणवतं की, मराठी संगीत नाटकांची जी गत झाली तीच चित्रपटसंगीताची होणार आहे. संगीतनाटकांपासून श्रीगणेशा करून आज मराठी नाटक गद्य नाटकांपर्यंत येऊन पोचलं आहे. या काळातील गाणी झडून जाण्याची क्रिया दखलपात्र आहे. हिंदी सिनेमात पूर्वी गाण्यांचा सुकाळ होता. एकेका चित्रपटात सोळा-सोळा गाणी असायची. आता त्यांची संख्या सरासरी पाच वर आली आहे. पुढं त्यात आणखीही काटछाट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज नाटक ज्या वास्तववादी मनोऱ्यापर्यंत पोहोचलं आहे तिथपर्यंत पोहोचायचं असेल तर हिंदी चित्रपटाला गाण्यांची संगत सोडावीच लागेल. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, २१ व्या शतकातील हिंदी चित्रपटांमध्ये गाणीच नसतील. गाणी जरूर असतील; पण ती चित्रपटाचा एक भाग म्हणूनच आपल्या समोर येतील. आपण त्या दिवसाची वाट पाहू या.

# स प. महाविद्यालय सेवक सहकारी पतपेढी मर्यादित

**स्थापना : ३–११–८०**

**रजिस्ट्रेशन नंबर पी. एन. ए. / बी. एन. के. / ३९४ सन ८०**

**वर्ग 'अ'**

## – आमची वैशिष्टये –

स. प. महाविद्यालयाच्या सेवेत कायम झालेल्या सेवकांसाठी ही पतपेढी आहे. सेवेत कायम झालेल्या कोणत्याही सेवकास रुपये ५१/– फक्त भरून पतपेढीचे सभासद होता येते. सभासद झाल्यानंतर आपणास मिळणारे फायदे .

- निर्वाह निधीप्रमाणे आपल्याला दरमहा कायम स्वरूपाची गुंतवणूक भाग-भाडवलाच्या स्वरूपात करता येते. अशा दरमहा जमा होणाऱ्या आपल्या रकमेचे दरवर्षी शेअर सर्टिफिकेट दिले जाते व दरवर्षी त्यावर डिव्हिडंड दिला जातो. सेवेतून निवृत्त होताना अथवा सेवेचा राजिनामा दिल्यास आपणास आपली सर्व जमा रक्कम त्वरित मिळण्याची सोय असते.
- १ वर्षापासून ५ वर्षांपर्यंत आपणास मुदत ठेव म्हणून रु. ५००/– व त्याच्या पटीत कितीही रक्कम ठेवता येते. त्यावर दर सहामाही व्याज दिले जाते.
- संचित बचत ठेव ( रिकरिंग ) योजना. या योजनेद्वारे आपणास १ वर्ष ते ५ वर्ष या मुदतीसाठी ठराविक रक्कम गुंतविता येते. मुदतीनंतर व्याजासहित रक्कम त्वरित दिली जाते. किमान रु. १०/– व त्याच्या पटीत कितीही रक्कम गुंतविता येते.
- कोणत्याही सभासदास रु. ५०००/– पर्यंत कर्ज दिले जाते. तसेच वैद्यकीय कारणासाठी रु. १००/– तातडीचे कर्ज दिले जाते.
- प्रत्येक सभासदास रु. १०,०००/– व वैद्यकीय कारणासाठी रु. ५००/– कर्ज आवश्यक तेवढे निधी उपलब्ध झाल्यानंतर देण्याचा संकल्प आहे.

| **सु. नी. गाडगीळ** | **म. रा. गायकवाड** | **श्री. वि. गोखले** |
|---|---|---|
| चिटणीस | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

कार्यकारी सभासद :

**श्री. का. वि. अहिरे** **श्री. श. दि. दातार**

**श्री. वि. रा. शिरगुरकर** **श्री. अ. गो. जुमडे**



कनिष्ठ महाविद्यालय व्हॉलीबॉल – विजयी संघ राज्यपातळी उपविजेता



व्हॉलीबॉल ( मुली ) वरिष्ठ – विजयी संघ



व्हॉलीबॉल ( वरिष्ठ ) – विजयी संघ



शारीरिक शिक्षण गटनायक



११ वी पहिल्या पांच क्रमांकातील मुले, प्रमुख पाहुणे – श्री. पुंड मे १९८४



१२ वी १९८४
H. S. C. बोर्डात पहिला
– मिलिंद पेंडसे



**सतीश कुलकर्णी**
विद्यापीठ प्रतिनिधी
बॉक्सिंग : आंतरविद्यापीठ
सुवर्णपदक



**राजेंद्र बोराटे**
जनरल सेक्रेटरी
१९८४–८५



**माधवी गवंडी**
आय. सी. एस्. आर.
क्रिकेट : विद्यापीठ
खेळाडू



**संजय आगरवाल**
आय. सी. एस्. आर.
खो खो : भाई नेरुरकर
चषक



**संजय कोपरकर**
जिमखाना जनरल सेक्रेटरी,
क्रिकेट : विद्यापीठ खेळाडू



**सुषमा सावंत**
कबड्डी : विद्यापीठ
खेळाडू



**सुजाता बापट**
टेबलटेनिस : विद्यापीठ
खेळाडू



**नरेंद्र टिकार**
ज्युदो : राज्यस्पर्धा



**अनिरुद्ध देशपांडे**
टेबलटेनिस : विद्यापीठ
खेळाडू



**जयंत कढे**
टेनिस विद्यापीठ
खेळाडू



**संजय पाटणकर**
खो खो : विद्यापीठ
खेळाडू



**श्रीनिवास जोशी**
पुरुषोत्तम करंडक :
सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी, लेखक

# विद्यापीठ खेळाडू



**अभय जोशी**
अ‍ॅथलेटिक्स व खो खो



**शिरीष पेंडसे**
बॉक्सिग



**वि. ना. राजमाचीकर**
जिम्नॅस्टिक्स



**शंतनु सुगवेकर**
क्रिकेट : रणजी संघात निवड



**विजय मांजरे**
व्हॉलीबॉल



**सुधीर गवळी**
बॉक्सिग



**रविंद्र पेठे**
मल्लखांब



**नरेंद्र सरस्वते**
जिम्नॅस्टिक्स



**राजेंद्र हरगुडकर**
जिम्नॅस्टिक्स



**शिरीष राणे**
खो खो



**प्रवीण कुलकर्णी**
खो खो



**अनिल वाल्हेकर**
क्रिकेट : रणजी संघात निवड

# संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

**रवींद्र इथापे**
द्वितीय वर्ष, साहित्य

महाराष्ट्राच्या स्थापनेला १९८५ या वर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरते.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ब्रिटिशांनी त्यांच्या राज्यकारभाराच्या सोयीसाठी म्हणून देशातील सर्व प्रांतांची रचना केली होती. त्यात काही प्रांत द्वैभाषिक होते तर काही बहुभाषिक होते त्या वेळी गुजरात व मुंबईसह मराठी भाषिक विभागांचे मिळून जे राज्य होते त्या प्रांताला मुंबई प्रांत हे नाव होते. महाराष्ट्रातील सध्याचे विदर्भ व मराठवाडा हे भाग त्यावेळच्या मुंबई प्रांतात समाविष्ट नव्हते. विदर्भ (वऱ्हाड) हा भाग त्या वेळेस जुन्या 'मध्यप्रांतात' समाविष्ट होता, तर मराठवाडा हा भाग त्यावेळच्या हैद्राबादच्या निझामी संस्थानात समाविष्ट होता. तसेच बेळगाव, कारवार हे मराठी भाषिक भाग देखील मुंबई प्रांतात होते; परंतु नंतर ते कर्नाटकाला जोडण्यात आले. तर गोवा हे पोर्तुगीज सत्तेच्या अमलाखाली होते.

एक भाषिक राज्याची मागणी ही भारतात ब्रिटिशांच्या कारकीर्दीतच सुरू झाली होती. तसेच महाराष्ट्राचीही मागणीही स्वातंत्र्यपूर्वकाळातच सुरू झाली. १ ऑक्टोबर १९३८ रोजी वऱ्हाडने मध्यप्रांतातून मुक्त होऊन स्वतंत्र वऱ्हाड प्रांताची मागणी विधिमंडळात केली. त्यानंतर बरोबर पंधरा दिवसांनी मुंबईत भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात प्रथमच संयुक्त महाराष्ट्राची मागणी सविस्तरपणे मांडण्यात आली. यामध्ये मुंबई, वऱ्हाड व मराठवाड्यासह सर्व मराठी भाषिक प्रदेश व पोर्तुगीज सत्ता लोप पावल्यावर गोमंतकाची मागणी करण्यात आली. वऱ्हाडला मध्यप्रांतातून वेगळे व्हायचे होते. महाराष्ट्रात सामील होण्यास त्याचा नकार नव्हता; परंतु भाषिक प्रांतरचनेच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास त्यावेळच्या ब्रिटिश सरकारला वेळ नव्हता. कारण त्यावेळी दुसरे महायुद्ध पेटले होते व तत्कालीन सरकार या युद्धाच्या गडबडीत गुंतलेले होते. दुसरीकडे सर्वच भारतीय जनता ही स्वातंत्र्यलढ्यात गुंतलेली होती आणि स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय इतर कोणत्याही गोष्टीकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितीत ही जनता नव्हती. त्यामुळे १९४२ च्या उत्तरार्धापासून १९४५ च्या अखेर पर्यंतच्या काळात संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न साहजिकच मागे पडला. त्यानंतर १२ मे १९४६ रोजी बेळगावात भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र ताबडतोब हवा अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर मुंबईत भरलेल्या परिषदेत (२८ जुलै १९४६) 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' ही स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आली.

स्वतंत्र भारताच्या घटना समितीने भारतातील घटक कसे असावेत याची चौकशी करून, अहवाल सादर करण्यासाठी १७ जून १९४७ रोजी एक कमिशन नेमले. हेच ते दार कमिशन होय. या कमिशनला आपली संयुक्त महाराष्ट्राची मागणी सादर करण्यासाठी वऱ्हाडसह महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी अकोला येथील बैठकीत एक करार घडवून आणला, तोच 'अकोला करार' म्हणून प्रसिद्ध झाला. डिसेंबर १९४८ मध्ये दार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात भाषिक प्रांताच्या मागणीला विरोध करण्यात आला. तसेच महाराष्ट्रात मुंबई घालू नये कारण ती सर्व प्रदेशीय असून बहुभाषिक आहे, असे सुचविले होते. महाराष्ट्रासह सर्वत्र अशा विक्षिप्त अहवालाविषयी निषेध व्यक्त करण्यात आला सरकारलाही असा विचित्र अहवाल मान्य करणे शक्य नव्हते. त्यानंतर प्रांतरचनेचा प्रश्न सोडविण्यासाठी पुन्हा जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारामय्या या तिघांची मिळून एक समिती नेमण्यात आली. या समितीनेही महाराष्ट्राला मुंबई जोडण्यात येऊ नये असे सांगितले. त्यामुळे मराठी जनता अधिकच संतप्त झाली. त्यानंतर काही दिवसांनी संयुक्त महाराष्ट्रात येऊ पहाणाऱ्या विभागांना समानत्वाचा दर्जा मिळेल व मागासलेल्या भागांच्या विकासाकडे लक्ष पुरवण्यात येईल, असे स्वच्छ आश्वासन देणारा एक करार सप्टेंबर

१९५३ मध्ये नागपूर येथे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या तीनही भागातील नेत्यांनी एकत्र येऊन केला आणि तत्पूर्वीचा 'अकोला करार' रद्द करण्यात आला. हा नवीन करार 'नागपूर करार' म्हणून प्रसिद्ध झाला व येथपासून पुढे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या तीनही विभागांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालू ठेवला.

२२ डिसेंबर १९५३ रोजी सरकारने राज्यांच्या पुनर्रचनेचा प्रश्न सोडविण्यासाठी फाजल अली कमिशन नेमले. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतर्फे निवेदने सादर करण्यात आली. मुंबईवर महाराष्ट्राचाच हक्क असल्याचे स्पष्ट निवेदन करण्यात आले होते. राज्यपुनर्रचनेचा अहवाल ऑक्टोबर १९५५ मध्ये प्रसिद्ध होऊन समितीने विदर्भाचे स्वतंत्र राज्य सुचवून, गुजराथी प्रदेशासह मराठवाडा धरून मुंबईच्या द्वैभाषिक राज्याची शिफारस केली. साऱ्या भारतात एक भाषी राज्ये सुचविली; पण महाराष्ट्रावर द्वैभाषिक लादून अन्याय करण्यात आला. या अन्यायाच्या विरूद्ध सर्व महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. मोठ्या प्रमाणावर संप, मोर्चे झाले. मुंबईत दंगली झाल्या. मुंबई महाराष्ट्रातच रहावी, अशी मराठी जनतेची मोठ्या प्रमाणावर मागणी होती; परंतु सरकारने मुंबई केंद्रशासित करून महाराष्ट्र व गुजरात यांची दोन स्वतंत्र राज्ये करावीत असे सुचविले. मराठी जनता तर मुंबई कोणत्याही अटीवर सोडण्यास तयार नव्हती. अशा परिस्थितीत मुंबई हातची गेली म्हणताच, मुंबईत दंगलीचा डोंब उसळला. सर्वत्र संप, मोर्चे होऊन बंद पुकारण्यात आला. १०५ लोक पोलिसांच्या गोळीबारात ठार झाले. मुंबईतील या प्रकाराने उभा महाराष्ट्र पेटला. त्यानंतर काही दिवसांनीच संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. ( ६ फेब्रुवारी १९५६ ) द्वैभाषिकाचा प्रयोग हाणून पाडण्याचा समितीने जोरदार प्रयत्न केला. त्याचबरोबर द्वैभाषिकाविरुद्ध लोकमताचा पाठिंबा सिद्ध करण्यासाठी समितीने आगामी सार्वत्रिक निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला.

ऑक्टोबर १९५६ मधील महत्त्वाची घटना म्हणजे मुख्यमंत्री श्री. मोरारजी देसाई यांची कारकीर्द संपुष्टात आली. त्यांच्या जागी श्री. यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्री बनविण्यात आले. १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला प्रचंड यश मिळाले. एक श्री. यशवंतराव चव्हाण सोडले तर काँग्रेसची बहुतेक सर्व मातब्बर मंडळी निवडणुकीत पराभूत झाली. लोकसभेत समितीला महाराष्ट्रातुन काँग्रेसपेक्षा जास्त जागा मिळाल्या; परंतु विधानसभेत काही थोड्या जागा कमी पडल्यामुळे समितीला शासन बनविता आले नाही. १९५८ व १९५९ ही दोन वर्षे समितीला अत्यंत जिकिरीची गेली. बेळगाव, कारवारचा प्रश्न दरबारी मांडण्यासाठी दिल्लीला मोर्चा नेण्यात आला. लढा तीव्र करण्यात आला. शेवटी भाषिक प्रांत रचनेचा प्रश्न विकोपाला गेलेला पाहून, तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी महाराष्ट्र व गुजराथची दोन अलग राज्ये करावीत असे पंतप्रधानांना सुचविले. महाद्वैभाषिकाचा प्रयत्न फसला असे सर्वच काँग्रेसजनांना मनापासून वाटत होते. अखेरीस काँग्रेस वर्किंग कमिटीने मुंबईसह महाराष्ट्र व गुजराथ अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा निर्णय घेतला. सरकारने त्वरित त्याची अंमलबजावणी करावी असे जाहीर केले. १४ मार्च १९६० रोजी मुंबई विधानसभेत द्वैभाषिकभंगाचा ठराव मांडला गेला व तो बहुमताने पास झाला. नव्या मराठी भाषिक राज्याचे नाव 'मुंबई' ऐवजी महाराष्ट्र असावे ही सूचना मान्य करण्यात आली. डांग हा मराठी भाषिक प्रांत गुजराथमध्ये घालण्यात आला. बेळगाव–कारवारचा प्रश्न मात्र लोंबकळत राहिला. गुजराथला काही भरपाईही द्यावी लागली. तरी ज्यासाठी मराठी जनतेने प्रचंड लढा दिला, प्रसंगी कित्येकांनी आपले प्राणार्पण केले, तो मंगल शुभदिन उजाडला. दि. १ मे १९६० रोजी श्रीछत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकारात संयुक्त महाराष्ट्र उदयाला आला. भारताच्या नकाशावर महाराष्ट्र झळकला. मुंबईसह विदर्भ व मराठवाडा यांचा महाराष्ट्रात समावेश झाला. सर्व मराठी भाषिकांचे एक राज्य असावे ही कल्पना अशा प्रकारे साकार झाली. त्यासाठी दीर्घकाळ चाललेल्या आंदोलनात महाराष्ट्रातील विविध पक्ष एकत्र आले. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये समाजवादी, साम्यवादी तसेच अनेक काँग्रेसपक्षीयही पक्षत्याग करून सामील झाले. ह्या चळवळीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे पांढरपेशा वर्ग, साहित्यिक, बुद्धिवंत यांनी या चळवळीत अत्यंत उत्साहाने पुढाकार घेतला. काँग्रेस पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने प्रथम या मागणीला विरोध केल्यामुळे अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांची अडचण झाली. १९५७ मध्ये

काँग्रेसच्या पराभवाचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या निर्मितीला काँग्रेसने पुरेसा पाठिंबा दिला नाही हे आहे. परंतु द्वैभाषिकांचे नेतृत्व करीत असतानाच यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेस नेत्यांना महाराष्ट्र निर्मितीची आवश्यकता पटवून दिली. या प्रश्नावर मतभेद झाल्याने चिंतामणराव देशमुखांनी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामाही दिला. म्हणजेच महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये तीव्र जनमत, विरोधी पक्षांची एकजूट आणि यशवंतराव चव्हाणांचे सौम्य, पण धोरणी प्रयत्न यांचा हातभार लागलेला दिसतो. मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या दक्ष व कार्यकुशल धोरणामुळे विरोध टिकूनच रहात नसे. विरोध वाढूच द्यायचा नाही. हे नीतिसूत्र त्यांनी या काळात अवलंबिले होते. द्वैभाषिकाविरोधी जनमत असताना ते मुख्यमंत्री झाले. अशा प्रतिकूल परिस्थितीतदेखील ते खंबीरपणे उभे राहिले. तसेच ग्रामीण विभाग व शेतकरी वर्गासाठी काही पुरोगामी स्वरूपाचे कायदे केले. त्याचबरोबर जनसंपर्क साधण्यात तत्परता दाखविली. संयुक्त महाराष्ट्र समितीने योजलेल्या हुतात्मा स्मारक पूर्ण करण्यात पुढाकार घेऊन तर त्यांनी आपल्या कारकीर्दीतील यशाचा कळसच गाठला. संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनीं ज्या धोरणांचीं पायाभरणी केली, त्यामुळे त्यांचा आधुनिक महाराष्ट्राचे एक शिल्पकार असा सार्थ गौरव करण्यात येतो.

महाराष्ट्राच्या राज्यकारभारात पश्चिम विभाग, विदर्भ व मराठवाडा या तीनही विभागांना समान नेतृत्वाची संधी मिळावी व मुख्यमंत्री पद प्रत्येक विभागाकडे आलटूनपालटून असावे असे त्यावेळेस ठरविण्यात आले होते. सुरुवातीला काही प्रमाणात हा नियम पाळला गेला. १९५६ ते १९६२ पर्यंत पश्चिम महाराष्ट्रातील श्री. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यानंतर विदर्भातील श्री. कन्नमवार हे १९६२ ते १९६४ पर्यंत मुख्यमत्री होते. त्यानंतर सर्वांत जास्त काळ म्हणजे १९६४ ते १९७५ पर्यंत मुख्यमंत्री म्हणन राहिलेले श्री. वसंतराव नाईक हेही विदर्भाचे. त्यानंतर मुख्यमंत्रीपद हे मराठवाड्याकडे गेल मराठवाड्यातील श्री. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री झाले. १९७८ नंतर पुन्हा मुख्यमंत्रीपद पश्चिम महाराष्ट्राकडेच राहिलेले दिसते. तसेच ह्या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद काहीसे अस्थिर झालेले दिसते. या काळात मुख्यमंत्रीपद फार काळ एका व्यक्तीकडे टिकून राहिलेले नाही. आतापर्यंत दोन अपवाद सोडले तर महाराष्ट्रात काँग्रेस पक्षालाच जनतेचा संपूर्ण पाठिंबा आहे असे दिसते. १९५७ ते १९७७ या दोन वेळेस महाराष्ट्रात काँग्रेसला पराभव पत्करावा लागला. १९५७ मध्ये जनता पक्षाने महाराष्ट्र काँग्रेसला पराभूत केले.

महाराष्ट्र स्थापनेनंतरच्या काळात महाराष्ट्राची मोठ्या प्रमाणावर भरभराट झालेली दिसते. औद्योगिक क्षेत्रात अनेक मूलभूत उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर वाढीस लागलेले आहेत. औद्योगिक क्षेत्रात सहकारी तत्त्वाचा स्वीकार करून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे उभारण्यात आले. त्यावेळी ग्रामीण भागातील लोकांच्या विकासास हातभार लागलेला आहे. त्याचबरोबर या सहकारी चळवळीतूनच मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्राच्या राजकारणात नेतृत्व उदयाला आलेले आपणास दिसते. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचा या विकासातील वाटा बराच मोठा आहे. त्यांनी ग्रामीण भागातील कल्याणकारी योजना, स्थानिक स्वराज्यसंस्थेची निर्मिती यासारख्या विकासाच्या गोष्टींना उत्तेजन देऊन विकासात भरच घातलेली दिसते. शेती व्यवसायातदेखील बरीच प्रगती झालेली दिसते; परंतु आजदेखील राज्यातील काही भाग दुष्काळी, कमी पाण्याचा आहे. महाराष्ट्र हे सामाजिक व राजकीयदृष्ट्या इतर राज्यांच्या मानाने विशेष प्रगत राज्य मानले गेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत; परंतु आज देखील काही महत्त्वाच्या समस्या महाराष्ट्रासमोर आहेत. उदा. शेतीचा पाणी पुरवठाप्रश्न, ग्रामीणभागातील वीजपुरवठा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हे प्रश्न आजही कित्येक खेड्यात दिसतात. हे प्रश्न तत्परतेने सोडविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील सर्व विभागांना विकासाची समान संधी उपलब्ध होत नाही अशी तक्रार ऐकू येते. तेव्हा सर्व विभागाच्या समतोल विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मागासलेल्या अविकसित भागाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. या गोष्टी साध्य झाल्या तर महाराष्ट्र हे राज्य आज जसे सामाजिक व राजकीयदृष्ट्या देशात एक प्रगत राज्य मानले जाते तसेच ते आर्थिकदृष्टयाही प्रगत राज्य होईल यात शंका नाहीं.

# Fiery Wheels

**Swanand R. Arole**
*S. Y. J. C. ( Science )*

Over the years, I have perceived that machines are more human than most people. They at least don't betray you. A machine is predictable, men are not, and better unpredictability increases the feeling of insecurity and you can not live a life with a nagging conscience, doubting the loyalty of the person next to you. Many people don't relish the prospect of being friendly with me, and I too am not so saintly as to go out of my way to make friends. To harbour radical ideas isnot exactly the doctor's prescription for being popular among your friends. So I love and adore and respect machines, particularly two wheelers. I have chosen a vocational subject ( scooter and motor-cycle servicing ) in college and though the teachers won't believe it. I love it.

I have tried to practise and experiment on our poor scooter. This particular chunk of machinery can be more appropriately termed as a moving junk, I admit. But what more can you expect when the pitiable soul has been swallowing nature's wrath for three years, without rotating shafts, only to be repaired by a brisk-brained amateur ? Still, the thing works and I call it ' Besty-II '

I enjoy riding my scooter and even though I am one and half years underage for a driving licence, I drive late at night or at dawn, when there are no fuzz. If I try fancy tricks on my schooter people say, I am showing off. For heavens' sake cannot they just admire skill and things in contradiction, in their hypocritic soul ? ( Mind you, no bragging. )

Sometimes I do a wheelee on it. It is an excellent machine and the moment I increase the revs, the front wheel defies all Newtonian laws and comes well over two feet clear of the ground.

I nearly got myself killed on many occasion while driving and skidding past bends in my favourite pastime. Ask my friends and they will say, I am out of my mind the way I drive. I was thinking of hitting the tracks but had to give up the idea in light of the vehement vetos from my parents. ( Didn't know they valued my neck so much. )

Pursuit of happiness is the prime aim of all our activities. Taking calculated risks is my hobby I am a loner and I do not want to live a life full of cares. I take my chances on the wheels, the sheer exuberance of pushing the vehicle beyond its limits to listen to the howl of the high revs and also watching people's wide eyes, spelling abject terror when a ' maniac ' is loose and too good to be treated for the dreary years of life. Only a fool or a liar says he is not afraid. At first I was a bit jittery; but how the novelty has died, and so has the fear. I pull a stunt at least once a day and bask in it for a couple of hours. This gets me through a very boring life.

People who fancy simulating Mr. Sherlock Holmes will discover that the above written is factual and this also is supported by the number of accidents I got involed in. But remarkably. I come through unscathed physically, if not financially. Pay me a visit any time and I'd love to find an audience. You'd think, I was out in the sun without my hat. I was mad enough without sunstroke.

# The Number 'e'

**Bhushan Bapat**
*F. Y. B. Sc.*

The number 'e' is defined to be the sum of the infinite series

$$1 + \frac{1}{1!} + \frac{1}{2!} + \frac{1}{3!} + \cdots\cdots \qquad [1]$$

and it is one of the fundamental constants of mathematics. Its value, correct upto 10 places of decimals, is

$$e = 2{\cdot}7182818285$$

The number e can be expressed in many ways. For example, it can be shown that

$$e = \lim_{n \to \infty} [1 + 1/n]^n \qquad [2]$$

$$e = \lim_{n \to \infty} \frac{n}{\sqrt[n]{n!}} \qquad [3]$$

$$e = \lim_{x \to 0} [1 + x]^{1/x} \qquad [4]$$

We also have an infinite continued fraction for e :

$$e = 2 + \cfrac{2}{2 + \cfrac{3}{3 + \cfrac{4}{4 + \cfrac{5}{5 + \cdots}}}} \qquad [5]$$

We are led to the number e by considering the following concrete problem :

Suppose a rupee is lent with compound interest at 100% per year. If interest is payable n times a year, the interest on 1 rupee for each interval is 1 / n and so the amount of 1 rupee is

$$A_n = \left[1 + \frac{1}{n}\right]^n$$

in n intervals; that is, in 1 year. Hence, if the interest is paid continuously, that is, if we let $n \to \infty$, the limiting value of the amount An is e = 2.72 Rs. at the end of 1 year, by the formula [2] quoted above.

[ The cruel money-lenders of the past used to lend money at 100% interest. Had they known the trick of continuous payment of interest, they would have gained 0.72 Rs more ! ]

The number e is irrational. In fact, it is a transcendental number, that is, e is not a root of any algebraic equation with rational coefficients. This fact was proved by the French mathematician Hermite in 1873.

The number e appears in Stirling's approximation for n ! which says that

$$n! \doteqdot n^{n+1/2} e^{-n} \sqrt{2\pi}$$

when n is very large. Logarithms to the base e are called natural logarithms. They are also called Naperian logarithms, although e was first used as a base in the logarithmic tables of John Speidell [ published in London in 1619 ].

Natural logarithms of numbers are easier to compute than logarithms to any other base. In theoretical considerations also, natural logarithms are always used because of the simplicity of the differentiation formula

$$\frac{d}{dx} \log_e x = \frac{1}{x}$$

For any general base 'a', the formula becomes

$$\frac{d}{dx} \log_a x = \frac{1}{x} \log_a e.$$

Finally, we mention the following relationship given by Euler

$$1 + e^{i\pi} = 0$$

which involves five most important constants in Mathematics. This relation was used by Lindemann in 1882 to prove the transcendental nature of $\pi$.

*References* :


1. Advanced Algebra
   by Barnard & Child.
2. Monographs on Topics of Modern Mathematics
   edited by J. W. A. Young.

# Anton Chekhov : Presonal Glimpses

Majiri Padiyar
*F. Y. B. A.*

" If I had lots of money I would build a sanitorium here for sick village – teachers. A building full of light, very light, with big windows and high ceiling. I would have a splendid library, all sorts of musical instruments, an apiary, a vegetable garden, an orchard."

This was the dream of Anton Pavlovich Chekhov, a genius that popped up in Russia at the turn of the 19th century. He was obviously a great lover of life, light and literature. Though he was a doctor by profession he became famous as a dramatist and a short-story writer. He once humorously remarked, 'Medicine is my lawful wife and literature my mistress.' Under the guise of humour he criticises the follies and the foibles that are commonly found not only among the Russians but in any man belonging to any culture. He is indeed a master artist who could inspire many writers ( G. B. Shaw was one ) in the world. This speaks for the universal appeal and a world-wide appreciation of his comedies, farces and short stories. Some of his one-act plays such as 'The Bear', 'A Marriage Proposal have been staged in India by a leading actor, director. Naseeruddin Shah and his group. My interest in Chekhov was aroused when I was called upon to read one of his shortstories and a play which formed a part of the syllabus. This article is a sincere effort to record my own impressions and share them with you.

It seems that Chekhov is a merciless judge of social injustice, helplessness, timidity, ficklemindedness, vulgarity and the growing materialism in the society. The problems that he raises are social-simple yet significant. The characters in his short-stories and plays do not seem to be far removed from us. The incidents in them seem to be taking place in the world around us, People like Julia ( A Nincompoop ) Police Inspector Ochumelov (Chameleon), Lomov ( A Marriage Proposal ) or Elena Popova a widow ( The Bear ) are not peculiar or unique in any sense. We feel that they are our neighbours, friends or our own selves. They communicate with us intimately, calling upon us to share their joys and sorrows. His pen cuts deep when he criticises man's inability to raise his voice against the oppression, exploitation and injustice (A Nincompoop) feeling of inferiority, guilt and helplessness (Vanlea) ficklemindedness (Chameleon) etc. Chekhov wants the people belonging to the down-trodden class to fight tooth and clows against the exploitation practised by the upper class. He doesn' want them to be spineless.

In 'The Death Of A Clerk' Chekhov points out how the equality based on consideration and understanding leads to healthy human relationships and inequality to tensions, guilt and harmful mental stress. This had been the cause of the clerk's strange death. In 'Chameleon' Chekhov criticises the ficklemindedness and levity of the police-Inspector Ochumelov, who changes its words as quickly as a chameleon changes his colours.

In stories such as 'The Bride', 'The Grasshopper', 'The Lady with The Dog' Chekhov seems to be concerned with human relations which are spoilt by an individual's inability to understand the

other fully and adequately. In the above-mentioned stories the lovers are separated because they either fail to understand each other or are very much concerned with themselves.

As one goes through Chekhov's short-stories one notice his optimism. Though at first sight, he appears to be a pessimist, it is only partially true. His characters sometimes appear sad, sullen, inactive. Life for them is meaningless. One may sense a trace of pessimism in the misfortunes they face. But underneath it lies the sigh of pure human heart looking forward hopefulls to a new life. It would be absurd to call him a pessimist. Everywhere in his writings he is found stressing one idea-that life is to be lived and it is worth living. This can be seen in his short-stories such as 'The Bride', 'The Grasshopper', 'The Lady with The Dog' etc. Here you find Chekhov the optimist. Though these stories end in a kind of melancholy, and gloomy mood, there also lies under the apparent gloom the hope and happiness of beginning a new life, simple and beautiful. Chekhov seems to focus upon a moment of transition from a complex, melancholy life to a more simple and beautiful life full of sunshine. He presents life in its diversity. While reading Chekhov, one feels that life is too long, too big, too quick and too varied for us to taste it in all its aspects,

The canvas of Chekhov's short-stories and plays contains not only the Russian cultural life but extends to other cultures as well. In his well-known force 'The Bear' we meet a young dimple-cheeked widow, Popova. The code of conduct prescribed for widows in Russian Society may not be as stringent as that in Indian Society. But Popova, a widow is seen observing a mourning period. She wears black and locks herself up in her house. But the reader knows that it is a pretence. She does not really love he husband who was unfaithful to her.

'A Marriage Proposal' brings to us a humorous character Lomov, a middle aged man suffering from a continual heart-palpitation. He has come to propose to his neighbour's daughter. However, he gets involved in a quarrel over property so much so that he forgets the purpose of his visit. In his attitude to marriage also he is quite practical. Money matters become so important for Lomov that love recedes in the background. In 'The Bear' the situation is exactly opposite. Smirnov has came to ask for money and ends up with love. However, we do not laugh at Lomov or Popova. We laugh with them, because we feel that they are very much real, as real as we are. They seem to be taken directly from life. Moreover, they appear to have a genuine interest in living. They do not look at life so much as a problem. Most of Chekhov's characters seem to be coucerned with happiness. Life attracts a widow like Popova as well as a bachelor of thirty five like Lomov. Chekhov seems to be aware of this universal need of happiness.

Chekhov was disgusted with the prosaic struggle for existence destroying the joy of life and creating apathy. In spite of the awareness of this drudgery and dreariness he could preserve a sense of humour and maintain his love for the simple things like shrubs and trees, orchards and buildings. He sincerely believed that man can do a lot to promote his happiness. He once said to Maxim Gorky.

Man inhabited the world, he will make it a good place for him to live in. He will.

This I think, is the affirmation of Chekhov's optimism.

# विविध क्रीडा नैपुण्य



अनुराधा कर्णिक
ज्युदो सुवर्ण पदक



नीता बेहेरे
अ‍ॅथलेटिक्स



स्वाती जोहोरे
अ‍ॅथलेटिक्स



सचीन देशमुख
क्रिकेट



मदन वाणी
बॉक्सींग



एम्. आर. दुधाळ
कुस्ती



राणी खेर
गिरिभ्रमण



राष्ट्रीय सेवा योजना



**वादसभा : अस्मिता दीक्षित व शुभदा गोडबोले**
वादविवादात जिंकलेल्या सांघिक करंडकासह



**वादसभा : ज्योत्स्ना आठवले, स्वाती सरदेसाई**



**कलामंडळ : ८४-८५**



**विभावरी देशपांडे**
प्रजासत्ताक–दिन संचलन, महाराष्ट्र प्रतिनिधी



**सुरेंद्र भावे**
क्रिकेट



**सार्जंट ज्योति पवार**
सर्वोत्कृष्ट होमगार्ड विद्यार्थीनी



**छात्रसेना व होमगार्ड – अधिकारी व विशेष निपुण छात्रसैनिक**



**जिमखाना डे. : अध्यक्ष – श्री. बाळासाहेब पंडित**
**प्रमुख पाहुणे : श्री. नंदन बाळ ( डेव्हिस कप – इंडियन प्लेअर )**



स्नेहसंमेलन समिती



विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ



वसतिगृह दिन–समरांभ

## Seek And You Will Find

**Naina Agarwal**
*F. Y. B. A.*

She is sitting on a hill
Looking down at me,
I am climbing
Higher and higher.
The road grows
Longer and longer.
The further I go
The further she recedes,
Stones and rocks blow down upon
me,
I am blinded
By the flying gravel
And......
I feel
There must be
A golden word, a golden book,
A talisman
Hidden on the peak.
Reaching it
I will have attained
Wisdom at last
But...can I?
Is it possible?
A word, a phrase
And darkness is no more.
But...what about the next day
And the day after?
I have nothing left to do
All that was attainable
Has been attained,
The world has been gained.
I am in search of new worlds
To toil and to conquer again,
And yet again
The cycle repeats itself.
My knowledge is not complete,
I am wiser
( But still not the wisest )
There are many more hills
Left for me to climb,
And many more valleys
All waiting for me to find.
My life is an
enchantment.
Every moment I climb
higher,
And the hill comes
closer,
But close enough–
never.

*With Best Compliments From :*

**Be a Champ
with
Champion Sports**

**Sports Goods Dealers**

Deccan Gymkhana
Pune 411 004

## जल रही है आज नारी

कालिंदी काळे,
बारावी वाणिज्य

जल रही है आज नारी दहेज की वेदीपर
हैरान है आज दुनिया इस अमानुष नीतीपर
दुल्हन बनकर आई वो दिल उमंगो भरा लिये
दिल में मस्ती भरी बहार खुशीयोंका संसार लिये
झुलस रहा है वो दिल इस अमानुष नीतीपर
जल रही है आज नारी दहेज की वेदीपर

मन ही मन माना उसने पती को सबकुछ अपना
क्या पता था डाल गले में फंदा.तोडना पडेगा
हर सपना
छुट रहीं हैं सांसे उसकी इस अमानुष नीतीपर
जल रही है आज नारी दहेज की वेदीपर

नौजवानों उठो प्रण करो ! नहीं दहेज लेंगे
नारीयों जागो बोलो–नहीं दहेज देंगे
शरमा रही है मानवता इस अमानुष नीतीपर
जल रही है आज नारी दहेज की वेदीपर

नारी है माया, ममता, प्यार और आधार
सामने उसके फिर क्यों है मौत का दरबार
लानत है जो सिर झुकाए इस अमानुष नीतीपर
जल रही है आज नारी दहेज की वेदीपर

बहके हुए हैं तो धन और जीवन की तुलना करे
उन्हें राह दिखाओ! क्यों हथियार उनपे व्यर्थ करें?
उठाओ हथियार लेकिन इस अमानुष नीतीपर
फिर न जलेगी नारी कभी दहेज की वेदीपर

**सेवासदन अमृतमहोत्सव काव्यस्पर्धा :**
**तृतीय क्रमांक**

*With Best Compliments From :*

# DADHE & RUIKAR

## Promoters and Builders

Dadhe–Ruikar House,
2007, Tilak Road,
Pune 411 030

TEL. : 32980, 34527

आमच्या हार्दिक शुभेच्छा !

सर्व प्रकारची स्टेशनरी, जर्नल्स, फाईल्स, कार्बन पेपर, टाइपिंग,
डुप्लिकेटिंग कागद, सौंदर्य प्रसाधने, साबण,
कन्फेक्शनरी, बनियन्स.

भांडाराचे सभासद व्हा व भांडाराचे विकासास
मदत करा.

**स. प. महाविद्यालय सहकारी ग्राहक भांडार**
**(मर्यादित), पुणे ३०**

उत्तम माल – वाजवी किंमत – विनम्र सेवा

| | | |
|---|---|---|
| श्री. चि. वि. लेले | डॉ. मा. अ. पेंडसे | प्रा. आ. गो. मोडक |
| कार्यवाह | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |

# महाविद्यालय वृत्त
## १९८४–८५

### १९८४–८५ या वर्षात महाविद्यालयात झालेले विविध उपक्रम

### संस्था भेटी। शैक्षणिक सहली

– ११ वी इतिहास विद्यार्थ्यांची भारत इतिहास संशोधन मंडळास भेट.
– संख्याशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची किर्लोस्कर कमिन्सच्या कॉम्प्युटर विभागाला भेट.
– प्राणिशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल– 'वाल्हेर' आंध्राच्या समुद्रकिनारी गेली.
– तांत्रिक विभागातून विद्यार्थ्यांचे एक पथक मुंबईचे 'इलेक्ट्रॉनिक्स उद्योग' पाहून आले व दुसरे अहमदनगरच्या 'यांत्रिकी उद्योगाती' पाहणी करून आले.
– वनस्पतीशास्त्र विभागाची अेम्प्रेस गार्डन, पुणे व मालवण किनाऱ्याला भेट.

### श्रमदान

